म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ८४६

REFBK-0019186

म. ग्रं. सं. ठाणे
पय निवंती
. नं. ८४५

REFBK-0019186

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे सन १८९०

वैदग्ध्य
किंवा ललितकला.

ललितकलानैपुण्य किंवा संस्कृतांत ज्यास वैदग्ध्य असें नांव दिलें आहे, हें सुधारणारूप वृक्षाचें पुष्पच होय, असें कांहीं विद्वानांचें मत आहे. आणि तें मत विचाराअंति खरें दिसतें. ज्या ज्या मानानें देशांत सुधारणा होत जाते त्या त्या मानानें ललितकलांची किंवा वैदग्ध्याची अभिवृद्धि होत जाते. गाणें, बजावणें, कविता करणें, चित्रें काढणें, खोदीव काम करणें, इत्यादि ललित विद्यांचा अभ्यास करण्यास व त्याचप्रमाणें त्यापासून होणाऱ्या सुखाचा उपभोग घेण्यास जी फुरसत लागते, किंवा जी मनाची स्वस्थता लागते, ती, याहून अधिक जरूरीचीं व महत्वाचीं कामें संपल्यानंतर मग प्राप्त होते. उघडच आहे क्षुधेनें व्याकुळ झालेल्या, किंवा थंडीनें कुडकुडत असलेल्या, अथवा उन्हाच्या प्रखर तापानें विव्हळ झालेल्या, मनुष्यास एखाद्या उत्कृष्ट गवय्याच्या मधुर कंठांतून निघणारी तान कशी गोड लागावी व तिजकडे त्याचें लक्ष तरी कसें पोंचावें. तात्पर्य काय कीं हे जे सुख प्राप्तीचे मार्ग आहेत ते निघण्यापूर्वी समाजाची सुसंस्था झाली पाहिजे. जीवितास अवश्य अशा वस्तूंचा पुरवठा झाल्यानंतरच रानटी मनुष्य निवळ करमणुकीच्या उपयोगीं पडणारे व्यवसाय करितो. साऱ्या दिवसभर कुणबी उन्हांत आपल्या शेतावर खपून अन्नसिद्धीचा व्यवसाय केल्यावर मग संध्याकाळीं घटकाभर आपल्या खोपटांत ह्मणा, किंवा गांवच्या चावडींत अथवा मारुतीच्या मेळांत ह्मणा, आपले संवगडी व आपले चार शेजारीपाजारी घेऊन तुणतुण्याची तार व डफ यांच्या साधनानें आपल्या श्रमाचा परिहार करून घेतो. आपलीं गुरें दिवसभर चारून संध्याकाळीं एखाद्या टेकडीवर बसून किंवा मध्यान्हीं एखाद्या झाडाच्या सांवलीचा आश्रय करून गुराखी आपला पावा वाजवीत करमणुक करून घेतो. वैदग्ध्याची ही आद्यस्थिति होय. केवळ मनोरंजनाच्या ज्या विद्या आहेत त्या ज्या ज्या मानानें समाजाची व्यवस्था चांगल्या प्रकारें लागत जाते, त्या त्या मानानें परिणत होत

जातात. अगदीं वन्यस्थितींत उत्तम नाट्यकार, उत्तम चित्रकार, उत्तम संगीताचे आचार्य अशीं माणसें उत्पन्न होणें अशक्य आहे, असें आह्मांस वाटतें. कारण, या ललित विद्यांचा जो मुख्य विषय, तो समाजाच्या अस्तित्वावर अवलंबून असतो. माणसामाणसांचा परस्पर अनेकविध व्यवहार वाढून समाज-विषयक जे मनोविकार किंवा अंतःकरणाचे धर्म व्यक्त होतात, त्यांवर या ललितकला अवलंबून असतात. ज्या कल्पना व जे मनोधर्म समाजांतच उत्पन्न व्हावयाचे, ज्यांचें आदिकारण व अधिष्ठान समाज होय, ते मनोधर्म किंवा त्या कल्पना अत्यन्त वन्यस्थितींत प्रकट व्हाव्या कशा? तेव्हां ललित कलांची अभिवृद्धि होण्यास समाज पाहिजे हें सिद्ध झालें.

असो, आतां आपण असा विचार करूं कीं, ह्या कला उत्तम प्रकारें शिकावयय्याच्या आहेत तर त्यास साधनें कोणतीं? या प्रश्नाचें उत्तर "शास्त्राभ्यास" हेंच आहे. दुसरें नाहीं "एखाद्या कलेमध्यें प्रवीणता मिळवावयाची असेल तर त्या कर्मास ज्या ज्या शास्त्राची अपेक्षा असेल त्या त्या शास्त्राचा अभ्यास उत्तम झालाच पाहिजे; शास्त्राभ्यासा शिवाय कोणताही मनुष्य कोणत्याही कलेंत प्रवीण होणार नाहीं. हा एक ठरीव सिद्धांत आहे. आतां कदाचित् या ह्मणण्यावर कोणी असा आक्षेप घेतील कीं, उत्तम कवि, उत्तम चित्रकार, जे झाले, त्या सर्वांनींच शास्त्राभ्यास केला होता कीं काय? या ह्मणण्यांत फारसा तथ्यांश नाहीं. कारण अंमळ सूक्ष्म विचार केला असतां ध्यानांत येईल कीं, कालीदास किंवा शेक्सपियर अशा सारखे जे उत्तम कवि होऊन गेले, त्यांचें सृष्ट्यवलोकन विशेष असल्या मुळें त्या त्या शास्त्रांच्या गोष्टी त्यांस सहज समजत गेल्या. शास्त्र ह्मणजे काय तर-सृष्टीच्या नियमांचें ज्ञान-आणि कला ह्मणजे-सृष्टीचें अनुकरण. उत्तम चित्रकार तो होय कीं,-जो सृष्टी किंवा संसारांत दिसणाऱ्या पदार्थांचें यथार्थ स्वरूप पुढें आणून दाखवितो तो. तीच गोष्ट कवित्वाची आणि तीच गोष्ट इतर सर्व कलांची आहे. असें जर आहे तर त्या त्या कारागिरास सृष्टीचे ते ते नियम कळणें अवश्य आहे, हें उघड होय.

संगमरवरी दगडांचे पुतळे किंवा मूर्ति बनविणें, अथवा पाषाणावर खोदीव काम करणें, या कामाचा जे अभ्यास करतील, त्यांना मनुष्यप्राण्यां

चीं हाडें, त्यांच्या शिरा, वगैरे अवयवांची रचना शरीरांत कसकशी केलेली असते, त्यांचें हलनचलन कसकसें होतें, या गोष्टींची माहिती असली पाहिजे; ही माहिती शास्त्रांतूनच मिळणारी आहे. ज्या मूर्तिकारास शारीरशास्त्राची माहिती नाहीं, त्याच्या कामांत पुष्कळच दोष आढळतात. ह्मणून हें काम शिकणाऱ्या लोकांस शारीरशास्त्राची माहिती असणें अवश्य आहे. त्याचप्रमाणें थोडीशी शिल्पशास्त्राचीही माहिती जरूर आहे. हेंही ज्ञान नसल्यामुळें कधीं कधीं फार मोठ्या चुका होतात. उदाहरण, एखादा उभा पुतळा केला तर, तो सुदृढ व्हावा ह्मणून, किंवा त्याची बैठक मजबूत असावी ह्मणून, त्या पुतळ्याच्या गुरुत्व मध्यापासून जो लंब किंवा ओळंब्याची रेषा ह्मणजे सरळ रेषा पडावयाची ती त्या पुतळ्याच्या पायांचें जें क्षेत्र त्या क्षेत्रांतच पडली पाहिजे, हा शिल्पशास्त्राचा नियम आहे. उदाहरण, मनुष्य सहज उभा राहिला ह्मणजे त्याचा एक पाय सरळ किंवा ताठ असून एक पाय ढिला व किंचित् वांकडा असतो. अशा वेळीं शरीराच्या गुरुत्वमध्यापासून पडणारा लंब, जो त्याचा पाय ताठ किंवा सरळ असतो त्यांतच पडतो. ज्या कारागिरांना अंग सांवरून किंवा तोलून धरणें याचें शास्त्र काय आहे हें ठाऊक नसतें, ते अशा प्रसंगीं अशी चूक करितात कीं, ते जो लंब पाडितात तो दोन पायांच्या मध्येंच पडतो. ह्मणजे मनुष्य सहज उभा राहिलेला आहे अशा स्थितींतील चित्र जर दाखवावयाचें आहे तर, त्याच्या शरीराच्या वरचा भाग तो अशा प्रकारें तोलून धरीत असतो कीं, त्याचा गुरुत्वमध्य, जो पाय सरळ दिसतो त्याजवर पडेल. हें रहस्य ज्या कारागिरास माहीत असेल, तो तशा स्थितींतल्या मनुष्याची एकंदर ठेवण व ते ते शरीराचे भाग जसे असावे तशा स्थितींत असलेले व ते तोलून धरलेले असेच दाखवील. किंवा स्वार बसला असतां घोडा दोन पायांवर उडाला आहे असें जर एखाद्यानें चित्र बनविलें तर तो स्वार घोड्याच्या मानेस चिकटून अगदीं सरळ बसला आहे असें दाखवील. आणि तेव्हांच या वर सांगितलेल्या नियमांच्या अनुरोधानें पहातां तें चित्र यथार्थ दिसणार आहे.

चित्रकलेंत तर शास्त्राभ्यासाची याहींपेक्षां अधिक जरूर आहे. आमच्या इकडे भिंतींवर घरोघर चितारी जीं चित्रें काढतात, तीं अगदीं अ-

यथार्थ व अस्वाभाविक दिसतात त्याचें कारण एवढेंच कीं, सृष्टींत पदार्थ जसे दिसतात तसे दाखविले नसतात. ह्मणजे ज्या ज्या बाजूनें चित्र पाहिलें असतां जसें दिसावें त्याप्रमाणें तें दाखविलेलें नसतें; त्याच्यांत प्रमाण नसतें; त्याचे उंचसखल भाग दिसत नाहींत; त्यांत छाया, हावभाव, वगैरे गोष्टींचा अभाव असतो. त्याचप्रमाणें त्या चित्राच्या सभोंवतालची स्थिति ह्मणजे वातावरण, आकाश, त्यांजमधील अंतर, हींही दाखविलेलीं नसतात. लहान मुलें जीं चित्रें काढीत असतात, त्यांजमध्यें जे दोष आढळतात ते कोणते तर त्यांत खरेपणाचा अभाव असतो; ह्मणजे यथार्थता नसते किंवा फारच कमी असते. याचें कारण पदार्थ दिसतात कसे, व ते दाखवावे कसे, वगैरे गोष्टींचें ज्ञान त्यांस नसतें.

हल्लीं युरोपियन् चित्रकारांचीं कामें पाहून आह्मी थक्क होतो. परंतु, आमच्या या भरतखंडांत एका काळीं चित्रकला फारच चांगल्या स्थितीस येऊन पोहोंचली होती असें दिसतें. अर्वाचीन काळीं आमचा **भिवासुतार** आमचे **रामवर्मा रविवर्मा** या चित्रकारांचीं कामें पाहून कोणास संतोष वाटणार नाहीं व त्यांच्या नैपुण्याचें कोण वर्णन करणार नाहीं ? ज्यांनीं त्यांच्या कृति पाहिल्या असतील त्यांचीं अंतःकरणें आह्मी ह्मणतों या गोष्टीची साक्ष देतील. पहिल्या चित्रकाराच्या अनेक कृतींपैकीं **पंतप्रतिनिधी** यांच्या **औंध** गांवीं श्रीमंतांच्या खुद्द वाड्यांत जें **रामपंचायतन** काढिलें आहे, तें आह्मीं स्वतःदोन वेळां पाहिलें; तथापि तें पुनः पुनः पहावें असें वाटतें. त्याच मूळ चित्रावरून आमच्या **पुण्यग्रामस्थचित्रशाळे**च्या मालकांनीं छापलेली **रामपंचायतना**ची नक्कल तयार करविली असेल असें आह्मांस वाटतें. त्याचप्रमाणें **मद्रास** येथें **रामवर्मा** व **रविवर्मा** असे दोघे भाऊ फारच कुशल चित्रकार आहेत. असें आमच्या ऐकण्यांत आहे. **कलकत्त्यांत** जें कांहीं दिवसांपूर्वी एक बडें प्रदर्शन झालें होतें, त्या ठिकाणीं सदर चित्रकारांच्या दोन उत्तम कृति ठेविल्या होत्या. त्यांत एक **शाकुंतल** नाटकांतील चौथ्या अंकाचें चित्र होतें; व दुसरें **भरतवियोगा**चें चित्र होतें. हीं दोन्ही चित्रें खणाखणाचीं होतीं, व माणसें जितकीं उंच असतात तितक्या भरपूर उंचीचीं चित्रें त्यांत काढिलीं होतीं. दोन्हीही प्रसंग वियोगाचे. करुणरस त्यांत इतका ओतप्रोत भरलेला होता कीं, प्रेक्षकांनीं त्या चित्रांकडे पाहिल्या बरोबर त्यांचीं अंतःकरणें सद्गदित होऊन

रडेंच कोसळावें ! अशी कर्तबगारी त्यांत होती. कवि व चित्रकार हीं जुळीं भावंडें आहेत. म्हणजे दोघांच्याही कृतीचा उद्देश एकच. दोघेही कवि किंवा दोघेही चित्रकार असें म्हणतां येईल. जें काम कवि शब्दांनीं करितो, तेंच काम चित्रकार रंगांनीं करितो ! दोन हजार वर्षांपूर्वी झालेला कविकुलगुरु **कालीदास** याला चित्रकर्माची अगदीं बरोबर कल्पना होती. हें त्याच्या अनेक कृतींवरून उघड दिसतें. परंतु विशेषतः **शाकुन्तल** नाटकावरून व **मेघदूता**वरून ही गोष्ट स्पष्ट होते. अभिज्ञान **शाकुंतला**च्या सहाव्या अंकांत राजास शकुंतलेचें स्मरण झाल्यानंतर करमेनासें होतें, तेव्हां शकुंतलेचें चित्र कर्मणुकीकरितां राजा स्वतांच काढीत आहे, त्या प्रसंगाचें वर्णन त्या कविश्रेष्ठानें किती तरी मनोहर व रसिकतेनें केलें आहे म्हणून सांगावें !! ज्याच्या भाग्यानें ज्याला जशी ग्राहकशक्ति असेल, त्या त्या मानानें त्या चित्राची मातब्बरी त्यास अधिक कळत जाते असा कांहीं गुण त्यांत आहे. उघडच आहे कारागीर कितीही निपुण असला, तरी निव्वळ कल्पनेचा जो भाग आहे, तो **ईश्वरदत्तच** आहे. रसिकता किंवा अभिज्ञता हा गुण देण्याचें सामर्थ्य कारागिरांत नसतें. तें स्वतःसिद्ध असलें पाहिजे. नाहीं तर कारागिराची कर्तबगारी व्यर्थ होतें. एका कवीनें ब्रह्मदेवास प्रार्थना करून म्हटलेंच आहे कीं, 'अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरसि मा लिख मा लिख मा लिख' असो. चित्रकलेस उद्देशून जो **शाकुन्तला**चा भाग आहे, तो आम्ही स्वतः मूल संस्कृतांतून भाषांतर करून प्रस्तुत स्थलीं देतों. स्वतः भाषांतर करून देण्याचें कारण एवढेंच कीं, मराठींत शाकुन्तल नाटकाचीं जितकीं भाषांतरें झालेलीं आहेत, तितकीं सारीं आम्हीं पाहिलीं. त्यांत-प्रस्तुत प्रसंगविषयक कविहृदत भाषांतरकारांस खचित कळलें नाहीं,-असें आम्हाला वाटतें.

चतुरिका नांवाची दासी, ज्याच्यावर शकुंतलेचें व तिच्या दोन सख्यांचें चित्र काढिलें आहे, असा चित्रफलक (चित्राची फळी) घेऊन येते.

चतुरिका—ही चित्रांत काढिलेली आमची यजमानीन पहा !

(असें म्हणून चित्रफलक दाखविते.)

विदूषक—शाबास गड्या शाबास काय मजेदार उभें रहाण्याची ऐट काढिली आहेस ! हावभाव जिथल्या तिथें कसें नामी वठलेत ! हे यांतले

उंचसखल भाग पाहून माझी तर नजर ठिकठिकाणीं जशी ठेंचच्च खाते !

सानुमती—किती तरी बाई हा राजर्षि निपुण आहे ! मला वाटतं, माझी सखी अगदीं माझ्या समोरच उभी आहे !

राजा—या चित्रांत जें जें अगदीं हुबेहूब उतरलें नाहीं, तें तें मी आपल्याकडून पुनः पुनः सुधारून जसें आहे तसें काढण्याचा यत्न करितों, तथापि तिच्या त्या अप्रतिम लावण्याची या चित्रांत उणीच कोठें झांक आली आहे !

विदूषक—गड्या, या पहा, या पाटीवर तिघीजणी काढिल्या आहेत, त्यांपैकीं माझ्या दृष्टीनें मला त्या तिघीही सुरेख दिसतात ! तेव्हां आतां यांत शकुंतला ती कोणती म्हणावी ?

सानुमती—अहारे इतकं कां कळत नाहीं ? किती तरी बाई हा जडबुद्धीचा आहे पहा ! असलं हें स्वरूप का याला ओळखतां येऊं नये ! !

राजा—मित्रा, तुला कोणती बरें वाटते ?

विदूषक—आपल्याला तर बोवा असं वाटतं कीं,—जिची वेणी सैल झाल्यामुळें त्यांतून फुलें गळतातच आहेत, जिच्या मुखावर घामाचे बिंदु झळकत आहेत व विशेषेंकरून जिचे बाहु श्रमामुळें गळून गेल्यासारखे दिसत आहेत, पाणी घातल्यामुळें ज्या आंब्याच्या झाडाची कोंवळी पालवी टवटवीत झाली आहे, अशा झाडाजवळ थोडीशी थकल्यासारखी झालेली उभी राहिली आहे ती—ती शकुंतला ! आणखी दुसऱ्या त्या दोघी त्या तिच्या सख्या असाव्या !

राजा—वः शाबास अगदीं बरोबर ओळखलंस तूं हुषारच आहेस ? ही पाहिलीस येथें माझ्या हृदयांतल्या दुःखाची निशाणी ! हीं माझीं सरदलेलीं बोटें ठेवल्यामुळें त्या चित्राचे कांहीं कांहीं भाग मलिन झाले आहेत ! त्याचप्रमाणें हा पहा ह्या ठिकाणचा रंग कसा पुसून गेला आहे, मी खालीं पाहून चित्र काढीत असतां दुःखाश्रु त्या चित्रावर पडून गालावरला रंग पसरला आहे हें स्पष्ट दिसत आहे ! चतुरिके, माझ्या जिवाला आतां करमणूक काय ती हें चित्रच. तर हें अर्धेच झालें आहे, तर जाऊन तेवढें कलम घेऊन ये बरें.....

विदूषक—गड्या, आणखी या चित्रांत काय काय काढावयाचें उरलें आहे ?

राजा—ऐक, काय काय काढावयाचें आहे तें? हें पहा, या ठिकाणीं **मालिनी** नदी काढून तिच्या वाळवंटावर हंसांचीं जोडपीं बसलीं आहेत असें दाखवावयाचें आहे. त्या नदीच्या जवळ **हिमालयाचा** पायथा काढून त्या पायथ्याजवळचीं एकावर एक चढत गेलेलीं पवित्र शिखरें काढावयाचीं आहेत; त्या शिखरांवर ठिकठिकाणीं हरिणें बसलीं आहेत असेंही दाखविलें पाहिजे. आणखी, त्या ठिकाणीं झाडांवर वल्कलें वाळत घातलीं आहेत, असें दाखवून त्या झाडांच्या खालीं एक काळा हरिण काढून त्याच्या शिंगाला हरिणी आपला डावा डोळा घांशीत आहे, इतके भाग अद्यापि काढायाचे राहिले आहेत!.....पण खरेंच गड्या, अजून एक राहिलें त्याची मला आठवणच राहिली नाहीं. **शकुन्तले**च्या आवडीचे कांहीं अलंकार काढावयाचे ते तसेच राहिले! तेही पण काढिलेच पाहिजेत.

विदूषक—ते कोणकोणते रे बोवा?

सानुमती—तिच्या त्या रानांतल्या स्थितीला व नाजूकपणाला शोभण्यासारखेच असतील!

राजा—मित्रा ऐक. ज्याचे केंसर तिच्या गालांवर लोंबत आहेत, असें शिरसाचें फूल तिच्या कानावर ठेवलेलें आहे, असें काढिलें नाहीं! त्याचप्रमाणें शरच्चंद्राच्या किरणांप्रमाणें कोमल अशी मृणालांची माळ तिच्या स्तनांवर पडलेली काढायाची आहे!

विदूषक—अरे, पण या **शकुंतला बाईसाहेब**, तांबड्या पाकळ्यांच्या कमलाप्रमाणें शोभिवंत अशा उजव्या हातानें आपलें तोंड झांकून घाबरल्यासारख्या व कावऱ्या बावऱ्या झालेल्या उभ्या राहिल्या आहेत! काय चमत्कार! (लक्षपूर्वक पाहून) अरे हा रांडलेक, फुलांतील मध लुटणारा दुष्ट भ्रमर या बाईसाहेबांच्या तोंडावर चाल करून किरे येत आहे!

याप्रमाणें हें समग्र चित्र किती मजेदार आहे! व त्या बरहुकूम एखादा चितारी चित्र काढील तर तें किती मोहक होईल; याची कल्पना ज्याची त्यानेंच केली पाहिजे. सदरीं लिहिलेलें हें कवीचें शब्दचित्र आहे त्यावरून दोन हजार वर्षांपूर्वी—ह्मणजे कालीदासाच्या वेळीं—चित्रकलेचें ज्ञान लोकांस होतें असें अनुमान निघतें. या शब्दचित्राला अनुसरून रविवर्म्या सारखा एखादा कुशल चितारी आपलें कसब दाखवील तर तें चित्र

किती मोहक होणार आहे.

आतां संगीतशास्त्र किंवा गाण्याची कला यालाही शास्त्राभ्यास लागतो किंवा इतर शास्त्रांची त्यास मदत लागते, हें ऐकून तर पुष्कळांसच आश्चर्य वाटेल. संगीतकला ह्मणजे मनुष्याच्या अंतःकरणामध्यें जे अनेक विकार उत्पन्न होतात, त्यांचें दर्शन होय. तेव्हां त्या तत्वाला अनुलक्षून जर संगीतकला असेल तर ती संगीतकला खरी. मनुष्याचे मनोविकार किंवा अंतःकरणांतील उद्गार जसे निरनिराळे असतील, व त्यांची तीव्रता कमजास्ती असेल, त्या मानानें कंठापासून निघणाऱ्या ध्वनीमध्येंही तीव्रता किंवा कोमलता असली पाहिजे. प्रस्तुत विषय समजण्यास सोपा व्हावा ह्मणून अलीकडे जो एक संगीत नाटक ह्मणून प्रकार निघाला आहे, त्याचा विचार केला असतां बरें होईल. प्राचीन संस्कृत कवींनीं जीं नाटकें केलीं आहेत, त्या नाटकांमधून श्लोक किंवा पद्यें असतात हें बहुतेकांस ठाऊक आहेच. हे श्लोक बहुधा पात्रें आपले मनोविकार दर्शित करीत असतां घातलेले आहेत; नाटक हें संसाराचें चित्र आहे अशी कल्पना केली असतां, त्यांतील माणसें बोलतात तीं गाण्याच्या सुरावर बोलत नाहींत, असा एक आक्षेप उत्पन्न होतो. तथापि, संगीत-शास्त्रांत जे राग ह्मणून सांगितलेले आहेत, त्यांची योजना अशी कांहीं दिसते कीं, त्या त्या मनोविकारांच्या प्रदर्शनास ते ते राग फारच उपयुक्त दिसतात. श्लोकांचीं जीं अनेक वृत्तें असतात, त्या वृत्तांत हरिणी वृत्तासारखीं अशीं कांहीं वृत्तें आहेत कीं, तीं करुणरसाच्या उपयोगीं पडतात. उत्तर रामचरितांत जानकीच्या वियोगानें विव्हल झालेला राम, शाकुंतलांत कन्यावियोगानें विव्हल झालेला कण्व, किंवा सौभद्रांतील अर्जुन-लालसेनें निराश होऊन दुःख करणारी सुभद्रा, इत्यादि पात्रें खरोखर उत्तम संगीत करून जर आपले मनोविकार प्रदर्शित करतील, तर तीं प्रेक्षकांच्या किंवा श्रोत्यांच्या अंतःकरणास द्रव आणितील, यांत काय संशय? ही गोष्ट, संगीत नाटकाचे कांहीं चांगले प्रयोग पाहून ज्यांनीं अनुभव घेतला असेल, त्यांसच कळणार आहे. आमच्या ह्मणण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, संगीताचा संबंध मुख्यत्वेंकरून मनुष्याच्या अंतःकरणाच्या धर्माशीं आहे. मधुर स्वर कानीं पडले असतां ते ते मनोविकार उत्पन्न होतात, एवढी गोष्ट खरी आहे, असें आह्मांस वाटतें. तथापि, अलीकडे जी संगीत

नाटकांची रेलचेल झालेली आहे, त्यावरून लोकांची समजूत या कामीं कांहीं चमत्कारिक झाली आहे असें दिसतें ! सर्वच प्रसंगीं संगीताचा उपयोग करणें, हा आमचे समजुतीनें निव्वळ मूर्खपणा आहे. वेणीसंहार नाटकासारखें वीररस-प्रधान नाटक संगीतांत गोड लागेल कीं काय, या विषयीं आह्मांस फारच संशय आहे. त्याचप्रमाणें, सारथी रथ हांकीत आहे, किंवा एखादा जासूद कांहीं निरोप मुख्य पात्रास सांगत आहे, किंवा एखादें घडलेलें वृत्त एक पात्र दुसऱ्या पात्रास कथन करीत आहे, अशा शुष्क प्रसंगींही संगीताचा उपयोग करणें, अयोग्य व उपहासास्पद आहे, असें आह्मांस वाटतें. मनुष्याचा कंठ हें एक प्रकारचें वाद्यच आहे ! या वाद्यांत किंवा इतर वाद्यांत संगीत-शास्त्राच्या नियमानुसार जे गोड सूर निघतात, त्यांच्या द्वारानें कांहीं जर उदात्त कल्पना किंवा उदात्त विचार प्रदर्शित करणें झालें तर त्यांचा अंतःकरण धर्मार्शी निकट संबंध पाहिजे. एकाद्या शास्त्राचें प्रतिपादन करणें, किंवा भूमितीचे सिद्धांत सोडविणें, न्यायासनापुढें वकिलानें एखादा बुद्धिवाद करणें, वगैरे गोष्टी जर आपण संगीतांत करूं लागलों तर, यापेक्षां हास्यास्पद ती गोष्ट कोणती ? यावरून संगीताला योग्य असा विषय पाहिजे, ही गोष्ट कोणीही समंजस मनुष्य कबूल करील.

कवित्वाचीही अशीच गोष्ट आहे. अंतःकरणांतील उद्गार शब्दांनीं व्यक्त करणें हें कवित्वाचें मुख्य अंग आहे. चित्रकार जें कर्म आपल्या रंगांनीं करितो तेंच कर्म कवि शब्दांनीं करितो. योग्य समयीं योग्य वृत्ति, वाचकांच्या अंतःकरणांत उत्पन्न करणें, हें मूळ बीज आहे. कांहीं विशिष्ट प्रसंगीं मनुष्याचे मनोधर्म विशेष प्रकारचा विकार पावतात, हा नियम लक्षांत ठेवून तो चमत्कार कवि हुबेहुब वर्णन करितात. या कामांतही सृष्टि नियमाचें उल्लंघन होतां कामाचें नाहीं. जसा प्रसंग असेल त्याच मानानें मनोविकारांचें स्वरूप दाखविलें पाहिजे. मनास रंजविणारी जी शब्दयोजना ती कविता होय. आणि ज्या अशा शब्दयोजनेच्या योगानें मनाचें रंजन पुष्कळ होतें आणि बोध चांगला ठसतो, ती चांगली कविता होय. मनाचें रंजन हा कवितेचा मुख्य हेतु आहे. तो साधण्यास कवीला असे प्रसंग व अशा कल्पना योजाव्या लागतात कीं तेणेंकरून वाचणाऱ्याचें मन रिझलें जावें. एका संस्कृत कवीनें सुंदर स्त्रीचें व सुंदर कवितेचें

लक्षण थोडक्यांत सांगितलें आहे तें असें:—" सा कविता सा वनिता यस्याः श्रवणेन दर्शनेनापि । कविहृदयं विटहृदयं सरलं तरलंच सत्वरं भवति ॥ " ज्या प्रसंगाचें वर्णन कवीनें केलें आहे तो प्रसंग अगदीं आपल्या डोळ्यांपुढें घडत आहे असें वाटलें पाहिजे. कालीदासाच्या शाकुंतलांतील तृतीय अंक वाचून तरुण जनाचें हृदय तरलित झाल्या खेरीज रहातच नाहीं! त्याचप्रमाणें चतुर्थ अंकांतील कन्याविरहाचा प्रसंग प्रत्येक मातापितरांची अंतकरणें विव्हल करून सोडतोच सोडतो ! असो. तात्पर्य, उत्कृष्ट कवितेचा उदात्त कल्पनांशीं अत्यंत निकट संबंध आहे. हा व असे जे कांहीं कवित्वाचे नियम आहेत त्यांचें उल्लंघन झालें असतां " गाईला शिंगें, ह्मशीला शिंगें, सगळ्या गुरांला शिंगें बा. " अशा प्रकारच्या शुष्क निरस, व हास्योत्पादक कविता होतात ! आपल्या मराठींत अत्यंत बीभत्स लावण्या वगैरे जे कांहीं कांहीं कवितेचे मासले आहेत तो सर्व प्रकार अशांतलाच समजावा. लावणी हा एक छंदाचा किंवा वृत्ताचा प्रकार आहे हें आह्मी विसरत नाहीं. व त्या वृत्ताचा कवीनें उपयोग करूं नये असें ही आह्मी ह्मणत नाहीं.

वर सांगितलेल्या प्रत्येक कामाच्या करागिरास जे चमत्कार दाखवावयाचे असतात, त्यांचे नियम त्यास अवगत असल्याखेरीज त्यांचें काम यथार्थ किंवा यथासांग होणार नाहीं एवढेंच नव्हे; परंतु त्या त्या कामाचे ते ते विवक्षित भाग पाहून प्रेक्षकांच्या किंवा श्रोत्यांच्या मनावर उत्तम ठसा वठेल हेंही त्यास कळलें पाहिजे. हा प्रश्न पडला मानसिक शास्त्राचा. या करितां त्यास मानसिकशास्त्रही अवगत असलें पाहिजे ! कोणतेंही कारागिरीचें काम तें पहाणाऱ्याच्या मनावर कसा परिणाम करील, ही गोष्ट त्याचे पहाणाऱ्याचे मनोधर्म किंवा त्याची मानसिकरचना, कळल्याखेरीज समजणार नाहीं. बहुतेकांच्या मानसिक रचनेंत कांहीं गोष्टी सारख्याच असतात. तेव्हां त्यांस अनुसरून कांहींएक सर्वसाधारण तत्त्वें किंवा अनुमानें काढण्यासारखीं असतात. त्यांच्या अनुरोधानें कारागिरीचीं कामें बनलीं पाहिजेत ! तीं सर्वसाधारण अनुमानें मनोधर्मापासून कसकशीं निघतात, हें कारागिरास पूर्णपणें कळल्याखेरीज त्यांची योजना करितां येणार नाहीं. समजा कीं, एक चित्र काढिलें आहे. त्याची एकंदर व्यवस्था किंवा रचना बरोबर उतरली आहे किंवा नाहीं हें पहाणें असेल व तें चित्र बरें किंवा वाईट

ठरविणें अशेल तर त्या चित्राच्या योगानें प्रेक्षकांच्या मनांवर ठसे कसे उमटतील, हें धोरण कळलें पाहिजे. उदाहरणार्थ, पूर्वी निर्दिष्ट केलेल्या शाकुंतलाच्या साहव्या अंकांतील विरहव्यथित राजाचें चित्र किंवा चवथ्या अंकांतील चित्र, जर एखाद्या चित्रकारानें काढिलें असलें तर त्या दोन्ही भागांत करुणरस प्रधान आहे. तेव्हां तीं चित्रें पाहून प्रेक्षकांचीं मनेंही कारुण्यानें भरून जाऊन विव्हल झालीं पाहिजेत. ह्मणजे, चित्रकाराचा हृद्गतभाव किंवा उद्देश ज्या मानांनीं न्यूनाधिक सिद्ध होईल, अथवा ते ते विकार प्रेक्षकांच्या हृत्पटलावर ज्या मानानें उत्पन्न होतील, त्या मानानें त्या चित्राची योग्यता ठरेल ! पुण्यामध्यें प्रसिद्ध मूर्तिकार बखतराम यानें केलेली खन्यामुरलीधराची जी मूर्ति आहे, ती इतकी सुंदर आहे कीं, जो जो मनुष्य ती पहाण्यास जातो, त्याला त्याला ती बाल्यावस्थेंत असलेली मनोहर मूर्ति पाहून कडेवरच घ्यावीशी वाटते ! त्याचप्रमाणें नाटकांची रचना चांगली झाली आहे किंवा नाहीं, हा जर विचार करणें आहे तर, ठिकठिकाणचे भागांची रचना, पात्रवैचित्र्य, वगैरे गोष्टींकडे सहृदय प्रेक्षकांचें लक्ष ज्या ज्या मानानें जाईल, व शृंगार, वीर, करुण, आदिकरून नवरसांनीं ज्या ज्या मानानें तें युक्त असेल, त्या त्या मानानें त्याची योग्यता कमी जास्त समजली जाईल. प्रत्येक कारागीर आपल्या विद्यार्थी स्थितींत व आपल्या पुढील आयुष्यांत ज्या गोष्टींचें ज्ञान प्राप्त करून घेतो, किंवा जो अनुभव संपादितो, त्यास अनुसरून तो आपलें काम करीत असतो. त्याच्या अनुभवाचा मूळ पाया पाहूं जातां मानसिकशास्त्राचीं मूलतत्त्वें होत. हीं मानसशास्त्राचीं मूलतत्त्वें व त्यापासून निघणारीं अनुमानें जर त्यास कळत असलीं, तरच त्यांस अनुसरून तो आपलें काम बजावील, हें उघडच आहे.

हीं वर निर्दिष्ट केलेलीं अनेक शास्त्रें जो शिकेल तोच उत्तम कवि, उत्तम चित्रकार वगैरे होईल; असें आमचें मुळींच ह्मणणें नाहीं. नैसर्गिक प्रतिभा अथवा स्वाभाविक स्फूर्ति हीं असल्या शिवाय त्या त्या शास्त्राचे ते ते नियम समजूनही कांहीं एक उपयोग होणार नाहीं. सृष्टींतील चमत्कार, किंवा सृष्टीचे नियम, उत्तम कारागिरांस ठाऊक असतात; व ज्या मानानें ते त्यांस अधिक ठाऊक असतील त्या मानानें त्यांची कृति अधिक चांगली होईल इतकेंच आमचें ह्मणणें आहे. कवि का-

य, चित्रकार काय, हरएक कारागीर काय, तो करून होत नसतो; तीं तीं माणसें ब्रह्मदेवानें घडवावीं लागतात. आमचें ह्मणणें इतकेंच कीं शास्त्र-विषयक-ज्ञानाची मदत स्वाभाविक बुद्धीला असल्या खेरीज त्या बुद्धीस परिपक्वता येत नाहीं, ह्मणजे ती नैसर्गिक बुद्धि पूर्णत्वेंकरून फलद्रूप होत नाहीं. तुकाराम, शिवाजी, वगैरे प्रासादिक माणसें आपल्या टांकसाळेंत बनवितां येणार नाहींत; अशीं रत्नें ईशसत्तेनेंच इहलोकीं अवतरतात; त्याच प्रमाणें कवि, चित्रकार, वगैरे कारागिरांची गोष्ट आहे. नैसर्गिक बुद्धि बऱ्याच गोष्टी करिते, परंतु सर्वच गोष्टी तिच्या हातून घडतील असें नाहीं; तिला अन्य साधनांची अपेक्षा असते. हीं अन्य साधनें ह्मणजे मुख्यत्वें करून शास्त्र-परिज्ञान व अलौकिक-बुद्धि यांच्या संयोगानेंच अलौकिक कामें व्हावयाचीं तीं होतात. यांचा ज्या कालीं संयोग होतो, तेव्हांच उत्तमोत्तम कामें बनलीं जातात. ह्मटलें आहेः—

शैलेशैले न माणिक्यं । मौक्तिकं न गजे गजे ॥
माधवी नहि सर्वत्र । चंदनं नवने वने ॥ १ ॥

प्रत्येक वनांत चंदनवृक्ष सांपडणार नाहीं, किंवा प्रत्येक डोंगरांत रत्न सांपडणार नाहीं, डोंगराचे पोटांत रत्नें सांपडतात व वनाचे ठिकाणींच चंदनवृक्षही वाढतात, परंतु, प्रत्येक डोंगरांत रत्न सांपडेलच व प्रत्येक वनांत चंदनवृक्ष आढळेलच असें नाहीं. तो जेथें कोठें उत्पन्न झाला असेल तेथेंच असेल. त्याचप्रमाणें उत्तम चित्रकार, उत्तम कवि, हे विश्वकर्म्याच्या लहरींत जेथें उत्पन्न होतात तेथेंच होतात! कांचेला कितीही संस्कार केला व पैलू पाडिले, तरी त्याचा कांहीं हिरा होणार नाहीं. कांच ती कांच व हिरा तो हिरा. "काचःकाचो मणिर्मणिः" ह्मणून पृथ्वींत सर्वत्रच हिरे नाहींत. असें जरी आहे तरी ते सांपडावयाचे पृथ्वींतच. जर कोणी असें ह्मणेल कीं, कांहो हिरे जर खाणींत सांपडतात तर जेथें आह्मी खणूं तेथें हिरे निघालेच पाहिजेत तर हें ह्मणणें किती शोभणार आहे; आमच्या ह्मणण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, शास्त्रप्रसार केला असतां अलौकिक-बुद्धिरूप हिरेच हिरे सर्वत्रच निघतील असें जरी नाहीं, तथापि शास्त्रप्रसाराच्या उद्योगानें एखादा हिरा सांपडून जाऊन त्याचा प्रकाश जगतावर पडेल! नाहीं असें तरी कोणी ह्मणावें?

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं०
ठाणे सन १८९

कीर्तितृष्णा.

१. वृत्तींचा परिवार बाजूला केला तर मन हें अगदीं लटकें पडणारें आहे. मग त्याची स्थिति एखाद्या गबाळ्याप्रमाणें किंवा अशक्ताप्रमाणें होणार, व निश्चयवृत्ति हीही अगदीं ढिली पडून त्याच्या हातून एकही काम होण्याचा संभव मुळींच नाहीं. तेव्हां, तें नेहमीं तरतरीत रहावें; त्याच्या हातून सदोदित कांहीं तरी कृत्यें घडत असावीं; बुद्धीचा दिवसानुदिवस जास्त जास्त विकास होत जावा; इच्छेची मातब्बरी चालवून प्रत्येक मनुष्यानें आपल्या मनोगतानुरूप प्रयत्न करण्यास कधीं कसर करूं नये; उलटी त्याबद्दल काळजी व मेहनतच जास्त घ्यावी; येवढ्याकरितांच ईश्वरानें वृत्तींचें लोढणें आपणा मानवी प्राण्यांच्या गळ्यांत अडकवून दिलें आहे. त्यांतही लोभ ही वृत्ति, जिलाच कधीं कधीं महत्वाकांक्षा ह्मणतात ती फारच प्रबळ आहे. कारण, मानमान्यता व कीर्ति मिळविण्याला मनुष्याच्या हातून जीं कृत्यें घडावीं लागतात तीं त्याच्या हातून घडण्यास हीच वृत्ति कारणीभूत होय. पण, आपल्या या विचाराचें तारूं आणखी जरा पलीकडे नेलें तर मानवी प्राण्यांना या वृत्तींच्या जाळ्यांत ईश्वरानें इतकें गुरफटून कां टाकलें आहे; याचीं आणखीही कांहीं निराळींच कारणें सांपडतात.

कलांचा शोध लागून त्यांत दिवसानुदिवस सुधारणा होत जावी; अनेक विषयांवर उपयुक्त ग्रंथरचना होऊन ती भावी काळीं लोकांच्या उपयोगीं पडावी; सुधारलेल्या देशांतील लोकांनीं अडाणी देशांत जाऊन त्यांची सर्व प्रकारची हमी आपल्या माथ्यावर घ्यावी; इत्यादि गोष्टी जगाच्या कल्याणाच्याच आहेत असें कोण ह्मणणार नाहीं? पण, अशा तऱ्हेचीं व अशींच इतर सत्कृत्यें करण्याचें शिरावर घेणारी सदाचारी मंडळी क्वचितच सांपडणार; आणि जगाचें कल्याण तर झालेंच पाहिजे. तेव्हां याच हेतूनें ईश्वरानें मानवी प्राण्यांमध्यें सर्वसाधारण अशा एका वृत्तीचें बीजारोपण करून ठेवलें असावें; व हीच वृत्ति वर सांगितलेली असावी. कारण, याच कीर्तीच्या लोभानें पुष्कळ मोठमोठीं कृत्यें अस्तित्वांत येऊन त्याचा या जगाला अलभ्य लाभ झाला आहे. व याच

ोभाच्या योगानें अत्यंत दुर्गुणी मनुष्यांच्या मनाचे स्वाभाविक जे कल तेही मुरडून जाऊन त्यांच्या हातूनही कधीं कधीं मोठमोठीं कृत्यें घडत असतात. किंवा निदान तशीं कृत्यें करण्याच्या नादांत ते गुंग तरी झालेले असतात. जे थोडे तरतरीत बुद्धीचे असतात त्यांच्या अंगीं ही वृत्ति फारच प्रबलत्वानें वास करीत असते. पण जे मतिमंद व क्षुद्र मनाचे असतात त्यांना ती थोडी भिऊन भिऊनच दूर असते. मग का आपल्या अंगीं तशा प्रकारचें सामर्थ्य नाहीं अशा समजुतीनें ते मुळीं निराश व हताशच झालेले असतात; का अशा कृत्यापासून आपल्या सोयीला व सुखाला चांगल्या प्रकारची भर पडणार आहे हें त्यांना कोत्या विचारामुळें दिसतच नाहीं; कां त्यांच्या हातून घडणाऱ्या कृत्यापासून जगाला कांहीं उपयोग न होतां उलटा त्यांना दुःखाचाच वांटा सोसावा लागण्याचा संभव विशेष अशा समजुतीनें प्रस्तुत प्रज्वलित वृत्तीचें बीजच ईश्वरानें त्यांच्या हृदयांत पेरलें नाहीं. काय असेल तें एक त्या ईश्वरासच माहीत !

२. वास्तविक पाहतां, ही कीर्तितृष्णा इतकी जर बळकट व जाज्वल्य नसती तर ती मिळविण्यास लागणारे अतिक्रान्त परिश्रम व मिळाल्यावरही ती हरपण्याची भीति यांच्यामुळें मनुष्यें खास स्वस्थच बसलीं असतीं. पण असें जरी आहे, तरी आपल्या कृत्यांच्या योगानें जगाच्या स्तुतीस पात्र होण्याची ज्यांच्या अंगीं योग्यता असते व तेणेंकरून ज्यांची कीर्ति सर्वांच्या कानीं गुणगुणत असते असे महात्मे पुरुष कितीक सांपडतात बरें ? ईश्वरानें आपणा मानवी प्राण्यांच्या अंगच्या गुणांमध्यें विलक्षण प्रकारची परिमितता ठेविली आहे. या नियमितपणाच्या बाहेर तो आपली बुद्धि कधींही जाऊं देत नाहीं. व याच नियमानें आपणामध्यें एक जर गुण पूर्णपणें असेल तर आपण इतर पुष्कळ गोष्टींत कमी असूं व आपणांत पुष्कळ प्रकारचे दोष असतील. येवढ्यावरून सर्व माणसें क्षुद्र व निर्गुणी असावीं असा ईश्वराचा हेतु नसेल; पण इतकें खरें कीं, एकाच्याच अंगीं पुष्कळ गुण नसावेत याबद्दल मात्र तो पुष्कळ खबरदारी घेतो यांत संशय नाहीं.*

---

* अशाच अर्थाचा एक **कालीदासाचा** श्लोक आठवतोः—

प्रायेण सामग्र्यविधौ गुणानां । पराङ्मुखी विश्वसृजः प्रवृत्तिः ॥

"सर्व गुण एके ठिकाणीं ठेवण्याविषयीं विधात्याची इच्छा दिसत नाहीं;—तर ...च्या उलट दिसते !"

बरें, इतकेंही असून ज्यांच्यामध्यें गुणाचा अल्पांशच असतो व जो त्यांनीं आपल्या परिश्रमानें व सतत व्यासंगानें बऱ्याच पूर्णत्वास आणलेला असतो तो तरी नांवालौकिकांस कितीशा अंशानें येतो बरें? कारण, एक तर त्या गुणाचे जे पोषक असायचे तेच कधीं बहुतेक अरसिक किंवा अज्ञानी असतात; कित्येक गुणग्राहक असूनही मनाच्या कलुषितपणामुळें किंवा मत्सरामुळें तिकडे ढुंकूनही पहात नाहींत; कांहींची नजर तिकडे जाऊनही ते त्या गुणाची प्रशंसा न करतां ते त्याच्या मूळ हेतूवरच कांहीं तरी भलत्याच वेड्यावांकड्या कल्पनांचा आरोप ठेवतात; व कित्येक असे बहादर असतात कीं, त्यांस गुण व दुर्गुण—किंवा चांगलें व वाईट याचाच मुळीं अर्थ कळत नसतो. तेव्हां मग एखाद्याच्या गुणाची चहा व्हावी कशी व तो बिचारा प्रसिद्धीस यावा कसा? मानवी स्वभावच असा कांहीं चमत्कारिक आहे कीं, कोणी कांहीं कृत्य करूं लागला कीं, त्यांत हजारों विघ्नें आणावयाचीं; व त्याच्या मनोगत बेताच्या आड येऊन त्याचे हेतु निर्फल होतील अशा प्रयत्नानें त्यास निरुत्साह करून सर्वस्वी त्यास तोंडघशी पाडावयाचें! शिवाय या कीर्तीची अशी कांहीं गंमत आहे कीं, ती मिळवायला जे झटत असतात, व त्यांचे प्रयत्न जों जों जास्त चाललेले असतात तों तों ती मागें मागेंच सरत असते. तेव्हां एखादा लोभी कीर्तितृष्णेनें कांही खटपट करूं लागला तर त्याची ती लोभी वृत्ति दडून मुळींच रहात नाहीं;—ती तर तेव्हांच उघडी पडते. आणि मग काय? लोक लगेच त्याच्या विरुद्ध प्रयत्न करण्यास आरंभ करतात. कोणी त्याची स्तुति करूं लागला तर ती त्यांना खपेनाशी होते. व ती त्याच्या गुणाला योग्य जरी असली तरी, त्याची स्तुति करणें ह्मणजे त्याजवर ही मोठी मेहेरबानी करणें आहे असें ते समजूं लागतात. जे कोणी थोड्या सढळ मनाचे असतात व ज्यांच्याठायीं मत्सरबुद्धि इतकी कडक बाणली गेली नसते तेही पण अशा मनुष्याविषयीं दोन चांगले शब्द क्वचितच उच्चारतात. कारण, ते असें मनांत आणतात कीं, आपल्या शब्दाला चार-चौघांत ज्या अर्थी थोडें वजन आहे त्या अर्थी आपण अगोदर उगीच तोंडाची वाफ दवडणें हेंच बरें नाहीं; शिवाय आपण त्याची स्तुति केलीच तर तो आपल्या स्वतःला बराच मोठेपणा देऊन आमच्यापेक्षांही आपण थोडे उच्च पदवीचे आहोंत असें मानूं लागेल.'

बरें, ही जनाची रीत सोडून द्या. खुद्द त्या गृहस्थाच्या स्वतःविषयींच समाधानकारक असें काय आहे. कीर्ति मिळविण्याच्या धुकट वावटळींत तो एकदां सांपडला कीं, तो ज्या ज्या मार्गाचें अवलंबन करतो ते मार्गच प्रत्यक्ष त्यास गोत्यांत आणून त्याच्या नांवाला उणेपणा आणीत असतात. तो आपल्या मनांत नेहमीं असें घोकीत असतो कीं, आपण जें जें काय चांगलें ह्मणून करतों तें गुह्य राहतां कामा नये! तर तें लोकांच्या नजरेस येईल तितकें चांगलें. पण त्याच्या या प्रबल इच्छेचा परिणाम असा होतो कीं, त्याच्या साधारण बोलण्यांतही वायफळ गप्पा व स्वतःची फुशारकी झळकूं लागते. आधीं त्याच्या बोलण्याचा रोख एका दिशेला असायचा आणि तशांत आत्मस्तुति व परनिंदा—किंवा दोहोंतून कांहीं तरी एक —यांची चंगळ मग अर्थात् त्याच्या एकंदर कृत्यांवर पाणी पडतें. कारण हा अहंपणाच महत्वाकांक्षेचा मोठा घोर शत्रु आहे. मनुष्य कितीही गुणी असो! किंवा त्याच्या हातून कशींही महत्कृत्यें होत असूंद्या ! पण त्याच्यांत 'ग'चें वारें जर यत्किंचितही खेळत असेल तर त्याच्या परिचयांतल्या मंडळींच्याही मनांत त्या विषयीं तिरस्कार व तुच्छपणा हीं गुप्तपणें वस्ति करून रहातील. मग हा त्याच्या त्या मनोदयावर मोठा व्याघातच नव्हे तर काय ? कारण, आत्मस्तुति किंवा वाचाळपणा हीं जात्याच लघुत्व आणणारीं आहेत. तीं मग प्रत्यक्ष इंद्राचीही परवा करीत नाहींत. आणि इकडे मनुष्यस्वभाव तर असा चमत्कारिक पडला कीं, दुसऱ्याचें उणें पडेल कोठें व तें आपण पकडूं केव्हां अशा इच्छेनें प्रत्येकजण डोळ्यांत तेल घालून टपलेला असतो.

शिवाय, महाजनांच्या ठिकाणीं कीर्तितृष्णा असणें ही गोष्ट थोडी हलकी मानली असून हा एक त्यांच्या इतर दोषांपैकीं मुख्य दोषच आहे असें सर्व समजतात. प्रगल्भ दशेस पावलेलें सुशिक्षित मन हें लोकस्तुति किंवा लोकनिंदा या दोन्हींकडेही सारख्याच तिरकस दृष्टीनें पहात असतें. व अशा रीतीनें आपल्या बऱ्या किंवा बुऱ्या मतांकडे बिलकुल लक्ष्य न देतां जो मोक्ष्या व्यवस्थितपणें सद्गुण प्रदेशांत निर्धास्त संचार करीत असतो त्याच्याविषयीं आपल्या मनांत एका प्रकारें गुप्त सभय आदरबुद्धीच उत्पन्न होत असते. पण तोच कोणी स्वकृत्यांबद्दल नसती फुशारकी किंवा पोकळ आत्मस्तुति करूं लागला कीं, त्याची टवाळी होण्यास सुर-

वात झालीच. बरें, अशा रीतीच्या थोड्या अश्लाघ्य आचरणास वाईटही ह्मणतां येत नाहीं. कारण लोभामुळें एखादें कसलें मसलें ढोंग करून तेवढ्यावरूनच आपल्याला लोक बरें ह्मणताहेत कीं नाहीं याची उघडपणें चौकशी करून आपली अन्तस्थ इच्छा स्पष्टपणें व्यक्त करणें कांहीं मोठ्या मनाचें लक्षण नाहीं; आणि मग अशा मनुष्याची त्याच्याच दोषामुळें कोणी अवहेलना केली तर त्यांत वाईट तें काय?—मानुष-स्वभावास तें अनुरूपच होय. असो;

तेव्हां सर्वांसच मिळेल इतका कांहीं कीर्ति हा पदार्थ स्वस्त नाहीं. व विशेषेंकरून तो मिळविण्याविषयीं जो जिवापाड श्रम व प्रयत्न करीत असतो त्यास तर तो फारच दुर्मिळ होय. कारण, अशा रीतीनें कीर्ति खरेदी करणाऱ्या अजागळ लोभ्याचा वृथाभिमान हा अत्यंत मृदु जरी असला तरी तो देखील रुतावा, असाच मानवी स्वभाव दुष्ट व हेकड आहे. शिवाय कीर्तितृष्णा ही जात्याच पडली विश्वासघातकी व दगलबाज. ती मनुष्याच्या हातून असलीं वेडींविद्रीं कृत्यें करविते कीं, तेणेंकरून तो चांगला गोत्यांतच येतो.

३. वृत्ति व मनाचे कल हे कांहीं विलक्षण अनिवार असतात. त्यांच्या योगानें दुसऱ्याचा कमीपणा काढण्यास मनुष्यें सहज प्रवृत्त होतात. प्रथम जे एकाच स्थितींत असतात त्यांच्यापैकीं एखाद्याचें डोकें वर होण्याची वेळ आली तर तें इतरांस सहन होत नाहीं. त्यांना वाटतें कीं आपण आणि हा एकाच दर्जाचे? आजच शिशाइतका जडपणा याच्यांत कशानें आला इतकें ह्मणूनच ते राहत नाहींत. त्याचे पूर्वीचे कांहीं दोष असल्यास ते बाहेर काढून त्याची कुचाळी करण्यास प्रारंभ करतात. कदाचित् तसे दोष नाहींच सांपडले तर दुसऱ्याही कांहीं अन्य रीतीनें त्याची निंदा करण्याचा ते प्रयत्न करतात; मनांत विचार हा कीं, हा आपल्याच माळेंतला मणी; यापेक्षां लोकांनीं याची किंमत जास्त समजूं नये. बरे, वरच्या दर्जाचे जे असतात त्यांच्या तरी मनांत अशाच तऱ्हेच्या कल्पना येऊं लागतात. सारांश जे एकवार त्याच्या बरोबरीचे असतात त्यांस तो आपल्यापेक्षां श्रेष्ठ बनला हें न खपून ते त्याचा दुर्लौकिक करण्यास प्रवृत्त होतात आणि एकवार जे श्रेष्ठ होते त्यांस तो आपल्या बरोबरीचा झालेला न साहून ते त्यास खालीं खालींच लोटूं पाहत असतात.

पुढें असें होतें कीं, अशा एखाद्या मनुष्याची कीर्ति नवीन कोठें गर्जूं लागली कीं, हजारों लोकांचे डोळे त्याजकडे लागतात. प्रत्येकजण त्याच्या बारीक सारीक कृतीचाही अगदीं कीस काढूं लागतो. बरें समजा, इतक्या बारीक निरीक्षणांन्तीं त्याच्यांत चांगुलपणाचा इवलासाही अंश सांपडला नाहीं. चारी बाजू खाशा नामी काळ्या कुळकुळीत दिसल्या तर मनाला थोडेंसें तरी गोड वाटावें कीं नाहीं ? पण इतक्यानेंही मनाची हौस पुरी होत नाहीं.—कित्येक असे असतात कीं, एखाद्याच्या कीर्तीची लकेर त्यांच्या कानीं आली पुरे, कीं त्याच्या विरुद्ध कांहीं तरी खोटें नाटें उठविण्यांतच त्यांस मौज वाटत असते. कित्येकांचा स्वभावच असा दुष्ट असतो कीं, मोठ्यांच्या संबंधानें त्यांनीं नेहेमीं गांवभर निंदात्मक शब्दांचाच दांडोरा पिटीत हिंडावें. किंवा त्यांचे जे दोष असतील तेवढेच घेऊन त्यावर मनसोक्त चर्चा चालवावी व मनाची कर्मणूक करून घ्यावी. इतकेंच नाहीं; तर ज्याच्याविषयीं इतर अनेक लोकांचा इतका जो चांगला ग्रह झाला आहे तो किती मूर्खपणाचा आहे; त्याच्या अंगीं इतक्या खोडी आहेत त्या लोकांना कशा दिसत नाहींत; व आम्ही बहादर, खरे परीक्षक म्हणून आम्हासच एखाद्याचें खरें व अंतस्थ स्वरूप कसें कळतें, इत्यादि गोष्टी मनांत आणून ते मोठा अभिमान मानतात व आपण तेवढ्यावरूनच मोठे धन्य आहोंत असें समजूं लागतात. कित्येकांचा आणखी असा एक हेतु असतो कीं, आपल्यांत जे दोष मुळीं नाहींत ते दुसऱ्यांत आहेत असें स्पष्ट व्हावें; व तेणेंकरून आपली उगीच मधल्यामध्यें प्रतिष्ठा वाढावी. बरें तसले दोष स्वतःमध्यें असलेच तर इकडूनही आपली बाजू संभाळण्याची त्यांची तयारी असतेच. काय ?—अहो तर तो अमका-तमका येवढा, पण त्यालाही या दोषांनीं सोडलें नाहीं; मग आम्ही हो कशांत जमा ! म्हणजे, अहं विशेषः—कोणीकडून आम्ही तरी बरे असें दाखविण्याचा मतलब ! ! बरें, हेंही असो. इतक्याही युक्ति-प्रयुक्तींतून एखादा सुटला तरी त्याची चांगली बाजू तर आहे कीं नाहीं. त्यावरच कांहीं थट्टेचा किंवा व्याज निंदेचा आरोप घालून कित्येक रंगेल मंडळी आपल्या परिवार जनास खूष करीत असतात. या कामांत आळस किंवा टाळाटाळ असा प्रकार मुळींच घडायचा नाहीं. आतां याचें कारण येवढा जो उच्च शिखरावर पोंचला आहे त्याची थट्टेनें म्हणा किंवा बुद्ध्या

ह्मणा. पण थोडीशी तरी त्याची आपण पायमल्ली केली ही एक आपली मोठीच करामत आहे अशी एक मनाची गोडशी समजूत होत असेल ह्मणा; किंवा, दोघेही माणसेंच असतां हाच येवढ्या शिखरावर कां व आह्मींच अशा हीनावस्थेंत कां, अशा कुत्सित बुद्धीनें आपण एका प्रकारचा त्यांचा सूडच उगवीत आहोंत अशी एक दुसरी समजूत ह्मणा.

अशा तऱ्हेचीं उदाहरणें क्षुद्र मनाचे व अर्ध बोबडे कवि, पोकळ ऐट मिरविणारे शिल्पकार, चित्रकार, वगैरे कारागीर, व इतर अर्धवट शास्त्रज्ञ यांच्यामध्यें अनेक आढळून येतील.

असो तेव्हां मुख्य गोष्ट येवढीच कीं अशा या अनेक कारणांनीं गुणाचे तेव्हांच तुकडे तुकडे होऊन अगदीं मातेरें होण्यास फारसा वेळ लागत नाहीं, आणि तशांत जर का कीर्तितृष्णेची दिशाच चुकलेली असेल, भलत्याच कांहीं तरी कृत्यांचें अवलंबन केलें गेलें असेल, तर मग बोलायलाच नको. कोऱ्या कागदावर पडलेल्या भसाड्या डागाप्रमाणेंच थेट अवस्था. एकंदरींत नांवाची बडेजावी टिकणें मोठें कठिण आहे, व कांहींएक अडथळे न येतां नांव उजगऱ्यास आलेंच तर शेवटपर्यंत तें तसेंच उज्वलावस्थेंत राहणें हें तर फारच दुर्घट होय. नांवलौकिक होण्यासारखीं जीं कृत्यें हातून घडावीं लागतात तीं एकदांच होऊन कांहीं उपयोग नाहीं. एकामागून एक अशीं तीं वरचेवर होत गेलीं पाहिजेत. नाहींतर मूळ ही विसरून जाऊन तें अगदीं मलीन होण्याचा संभव असतो. कारण आश्चर्यवृत्ति ही फार वेळ टिकणारी नसून अतिपरिचय झाल्यास तर मुळींच ती लोपून जाते. यासुळें अशा कृत्यांची रांगच नेहमीं कायम असावी लागते. शिवाय तीं कृत्यें तरी उगीच कांहीं तरी असतां उपयोगाचीं नाहींत. पहिल्याच्या योग्यतेचींच असावीं लागतात. नाहींतर सगळीच इमारत ढासळावयाची.

४ आतां कोणी असा आक्षेप घेतील कीं, ज्या अर्थी इतक्या यातायाती, इतके श्रम व पदोपदीं हृदयाला भेदणारे प्रसंग येत असतांही हजारों माणसें कीर्तीच्या पाठीमागें लागलेलीं असतात; त्या अर्थी तिच्यांत कांहीं तरी तशीच जादू भरून ठेवलेली असावी. पण तसें कांहींच नाहीं. कीर्तीच्या पाठीमागें सुखाचा भाग किती अत्यल्प असतोः व घोर व चिंता यांची केवढी जबरदस्त टुमणी पाठीमागें लागलेली असते यांचा जर

कोणी विचार करील तर कीर्तीसाठीं असें खंडोगणती उमेदवार कां हापापलेले असावेत याचें कोणालाही आश्चर्य वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

लोभ ह्मटला कीं हृदयामध्यें गडबड सुरू झालीच. मन बुभुक्षित होतें. विचार प्रचंड लाटांप्रमाणें अनिवार होतात. सारासार विचार व बुद्धीची क्षमता लयास जाते. दूरदृष्टि ही कोणीकडेच नाहींशी होते. बुद्धिवाद ऐकूं येईनासा होतो. मनाचा, विचारांचा व दृष्टीचा झोत कायतो एका क्षणभंगुर व काल्पनिक सुखाकडे ! कीर्तीशिवाय इतर पदार्थांच्या संबंधानें पाहिलें तर, मग कमीजास्त मेहनतीनें कां होईना.–ते आज नाहीं उद्यां मिळण्याचा बराच संभव असतो. पण कीर्तिसुख ह्मणजे परकीयांच्या हातून साम्राज्यसुखाचीच आशा धरणें होय !—शास्त्ररीत्या व अनुभवदृष्ट्या अगदींच असंभवनीय ! रक्त, मांस, स्नायु, इंद्रियें–शरीरांतील एकूण एक भाग घ्या, सर्वच बेटे अभागी, वरील सौख्य लाभ एकाच्याही नशीबीं नाहीं. नाहीं ह्मणायला मनाला मात्र या अशाश्वत सुखाचा लाभ कधीं काळीं घडत असेल. पण त्या तसल्याही सुखामागें काळजी, अस्वस्थपणा व तळमळ हीं थोडीं का लागलेलीं असतात ? शिवाय अशा वेळीं मनामध्यें नव्या नव्या इच्छांचा प्रादुर्भाव होऊन नव्या नव्या परिश्रमांचे डोंगर पुढें उभे रहातात, व हृदयाग्नि अधिकच पेट घेतो हें निराळेंच. उगीच एका गोष्टीचाच प्रत्यय पहा कीं, आजपर्यंत कोणत्याही लोभी मनुष्याच्या इच्छेच्या मानानें अगदीं तंतोतंत सुख असें कोणाला तरी मिळालें आहे का ? मुळीं देखील नाहीं. इतकेंच नाहीं, तर या कीर्ति मंदिराचा रस्ता हजारों पुरुषांनीं सोडून दिला आहे असेंच आपणास आढळून येईल. फार दिवसांच्या अनुभवानें ते तरी असेंच ह्मणतील कीं – अहो सौख्यलाभ एकीकडेच राहो पण क्षणोक्षणीं निराशा व मनोभंग यांचें दुःख कोठवर सोसावें? बरें तेवढी निराशाच असती तर पुरवली असती, मनांत चुरमुरे खात बसलों असतों, पण त्याबरोबर आणखीही आगांतुक त्रास व दगदग काय थोडी असते ? उगीच जे आळशी व हरि हरि ह्मणत बसणारे ते तरी पुष्कळ बरे–खरोखरीच सुखी ह्मणावे लागतात. अनेक प्रसंगीं आपली प्रशंसा होण्याचा संभव असून जर ते प्रसंग तसेच कोरडे निघून गेले तर ती का थोडी निराशा झाली ह्मणायची! तेंही राहो. एखाद्या कृत्याबद्दल लोक जी आपली स्तुति करितात तीच प्रत्यक्ष जर हृदय भेद करणारी

असेल तर तो केवढा कठिण प्रसंग! आपल्या स्वतःची आपणाला जेवढी मातब्बरी वाटत असते तेवढी दुसऱ्यांना मुळींच वाटत नाहीं. तेव्हां मिथ्या स्तुति किंवा हांजी हांजी यांचा भाग एकीकडे केला तर आपल्याला पाहिजे आहे तितकी स्तुति लोक कोठून करतील? मग जेथें स्तुतीच्या योगानेंच जर मनाला दुःख होण्याचा संभव, तर अत्यंत अप्रिय असे निंदात्मक व खोटसाळ उद्गार आपणास कितीसे मानवतील याचा विचार सहज होण्यासारखा आहे. ज्या मनाला स्तुतीची आवड असते त्याच मनाला निंदेची ह्मणजे बिलकूल क्षिती नसते असें क्वचित्—कधींच होत नाहीं ह्मटलें तरी चालेल. जगाची रीत आपणाला माहीत असतां व आपणामध्यें गुणांपेक्षां दोषच पुष्कळ असण्याचा संभव असतां जे कोणी मनांत कीर्तीचा लोभ धरून यत्किंचित् सुखाकरितां आपल्या मनाचें स्वाभाविक स्वास्थ्य व स्वातंत्र्य दुसऱ्याच्या स्वाधीन करितात त्यांच्यासारखे दुर्दैवी व हतभाग्य तेच असें ह्मणणें भाग पडतें.

बरे. इतक्याही गोष्टी राहोत. समजा कीं, कीर्तीचें पूर्ण वैभव एकदांचें नशीबीं आलें. पण तें नाहीं लाधलें; आणि कित्येक कारणांमुळें दुर्लौकिक होण्या इतकें कमनशीब असलें तर मग त्या दुःखाला पारावार कोठचा? कीर्तिसुख भोगणें सोपें आहे; अप्रसिद्ध स्थितींत नांव राहिलें काय व गेलें काय हें त्याहीपेक्षां सोपें—पण एक वेळ नांवाजलेल्या लौकिकास हरताळ लागण्याचा प्रसंग सहन करणें मोठें कठिण आहे. त्यापुढें प्रत्यक्ष मरणाचेंही दुःख क्षुल्लकसें वाटेल. किंबहुना मृत्यूच प्रत्यक्ष सुखसागर समजून हिरकण्यादिकरून जीं त्याचीं द्वारें आहेत त्याचा अंगीकार करणें भाग पडतें. कीर्तीच्या योगानें जितकें अत्यल्प सुख मिळण्याचा संभव तितकेंच अत्यंत नष्टचर्य किंवा अनिष्ट साडेसाती तिच्या अभावीं सांठवून ठेवलेली असते. मनाची समजूत मोठी विचित्र असते. सुखाची तुलना करते वेळीं वैभवाचें मान घ्यावयाचें व दुःख भोगण्याची पाळी आली कीं, त्याची सांगड त्याच वैभवाशीं न घालतां, तें आपल्या मानसिक व काल्पनिक वैभवाशीं तोलावयाचें; मग ती मानसिक तळमळ कशी दुःसह नसावी. व अशा हृद्रोगामुळें प्राणापेक्षां प्यार कांहीं नसतां तोही नकोसाच वाटावा हें अगदीं स्वाभाविकच आहे.

तेव्हां, अशा या भयंकर कीर्तितृष्णेला सुखदायिनी कसें ह्मणतां येईल?

९. येथवर प्रस्तुत विषयाचे चार भाग आटपले. प्रथम, ही वृत्ति ईश्वरानें आपणामध्यें कां ठेविली असावी हें पाहिलें. नंतर कीर्ति मिळणें कठिण असून ती टिकणें फारच दुर्घट आहे, हें सांगितलें; आणि ती मिळाल्यानेंही मोठीशी कांहीं सुखाची प्राप्ति होत नसून उलट अनेक प्रसंगीं निराशाच पतकरावी लागते—हेंही दाखविलें. आतां, शेवटीं इतकेंच सिद्ध करावयाचें आहे कीं, सर्व सुखांचें जें माहेर घर किंवा साऱ्याचें सार जें परलोक साधन किंवा मोक्षसुख तें मिळण्याला ही कीर्तितृष्णा मोठाच आडफाटा आणते.

असें होण्याचीं कारणें तीन आहेत. पहिलें कारण असें कीं, कीर्ति मिळविण्याच्या उत्कट इच्छेमुळें मनामध्यें अनेक दुर्गुणांच्या बीजांचा उद्भव होतो. दुसरें असें कीं, कीर्ति मिळविण्याच्या ज्या कांहीं साधनिका आहेत त्यांपैकीं कांहीं या परम-सौख्याला मुळींच पुष्टिवर्धक नसून उलट त्या विघातक मात्र होतात. आणि तिसरें असें आहे कीं, कित्येक प्रसंगीं कीर्ति मिळविण्याला ज्या साधनांचा आपण उपयोग करतों त्याच साधनांच्या योगानें मोक्षसुखही मिळावें अशी आपली दुहेरी छक्कल चालू असल्यामुळें दोन डगरीवर हात या न्यायानें दोहींचें ही ॐ फस् होत असतें, किंवा किर्ति लाभलीच तर मोक्ष तर कधींच लाधत नसतो.

हे तिन्ही सिद्धांत अगदीं स्वतःसिद्ध असून नीतिविषयक विचार करण्याची ज्यांना थोडीशीही संवय असेल त्यांस ते सहज समजण्यासारखे आहेत. तेव्हां त्यांवर कांहीं न लिहितां अशाच कांहीं मुद्यावर बरेंच विवेचन करितां येईल तिकडे वळूं.

प्रस्तुत विषयावर जें एकंदर विवरण केलें आहे त्यावरून वाचकांच्या ध्यानांत एक गोष्ट येऊन चुकलीच असेल कीं, आपले गुण किंवा कृत्यें हीं इतरांस पसंत पडावीं व त्याबद्दल लोकांनीं आपली स्तुति करावी अशी आशा धरणें हीच मुळीं आपली मोठी चूक आहे. ईश्वर—हाच एक सर्वसाक्षी व न्यायी असल्यामुळें व आपल्या गुणांचे बरोबर व तंतोतंत चीज करणें एक त्याच्याच हातीं असल्यामुळें मानवी प्राण्यांनीं आपल्या गुणांची वाहवा व स्तुति केली काय किंवा न केली काय दोन्ही सारखींच. मग त्याबद्दल खेद किंवा आनंद मानण्यांत काय अर्थ आहे ! मर्त्य प्राण्यांना बाह्य स्वरूप काय तें दिसत असतें. अंतर्यामांत त्याचा प्रवेश बिलकूल होत

नाहीं. कित्येक सद्‌गुण असे असतात कीं, ते नेहमीं दडूनच राहिलेले असावयाचे. कित्येक महात्मे असे असतात कीं, त्यांचें अंतःकरण कांहीं गुणविशेषांनीं अलंकृत झालेलें असूनही ते एका परमात्म्याशिवाय इतरांच्या चर्मचक्षूंस दिसत नसतात. तेव्हां मानवी प्रण्यांचें असलें अपुरें परीक्षण आपल्या काय उपयोगाचें.

सद्गुणी मनुष्याचें अंतर्याम मनोरम असतें ह्मणून कोठवर वर्णावें ? विचारांची शुद्धता, मनाचें स्वास्थ्य व समाधानवृत्ति, जगाचें बरें करण्याविषयींची आतुरता, कळकळ व त्याही योगें मनाला होणारा गुप्तानंद; इतरांस भरभराटीच्या अवस्थेंत पाहूनही मनास स्वाभाविक वाटणारा संतोष, हीं व अशींच आणखीं कित्येक;—प्रत्यक्ष सद्गुण सौंदर्यच होत. व तीं सर्वसाक्षित्वावांचून इतरांच्या दृष्टीला मुळीं अगम्यच होत. यांत बिलकूल शंका नाहीं. फिरून, गुणांचें पूर्ण प्रकाशन होण्यास प्रसंग लागतो. काळ, स्थळ, यांची अनुकूलता असावी लागते. दातृत्व व मनाचा उदारपणा यांचें दारिद्र्यावस्थेंत कांहीं चालत नाहीं. सर्वच जग जेव्हां नास्तिक बनून जातें, तेव्हां ज्याचें मन शुद्ध व पवित्र आहे व ईश्वराविषयीं ज्याची भक्ति व पूज्यभाव हीं अगदीं बाण्याचीं आहेत—तो जिवंत राहिला तर मोठेंच मिळविलें ह्मणायचें. दुःखाचा डोंगर कोसळला असतो अशाही वेळीं कांहीं गुणांचा विकास झालेला दिसतो. श्रीमंती आली असतां कांहीं उदयास येतात. कांहीं खाजगी प्रपंचाचा भार वहात असतां उजगाऱ्यास येतात व कांहीं सार्वजनिक कळकळीच्या वेळीं उपयोगीं पडतात. तेव्हां, अशा या सर्व गुणांचे बीज आपण काय केलें, काय करीत आहोंत किंवा काय केलें असतें–या सर्व खाब्याखुब्या एका जगन्नियंत्याशिवाय इतरांस कोठून कळणार ?

मानवी प्राण्यांच्या हातून आपल्या गुणांचें बरोबर परीक्षण होत नाहीं याचें आणखी एक कारण असें आहे कीं, एकाच कृतीचे हेतु अनेक असूं शकतील किंवा सर्वांच्या मनांत एकच हेतु असून प्रत्येकाच्या हातून निरनिराळीच एखादी कृति अगर कृत्यें घडतील. तसेंच आपल्या कृति कधीं कधीं मोठ्या गूढ व मिश्रस्थितींत असतात. त्यांबरोबर इतर अनेक होणारे व्यवसाय यांमध्येंही मोठी विचित्रता असते. इकडे लोकांचें अवलोकन, चौकसपणा व तारतम्य यांत अधिक उणेपणाचें प्रमाण असावया-

चेंच; तेव्हां येथें एक असा कोणताच सिद्धांत कायमचा धरतां येत नाहीं. एक मनुष्य कांहींना जर साधु वाटेल तर कांहींना तोच मोठा भोंदु आहे असें दिसेल. यावरून अंतर्याम व मूळ हेतु जाणण्याचें द्वार बाह्यस्वरूप किंवा कृति—हें मुळींच नव्हें, हें उघडच आहे.

दुसरें आणखी असें आहे कीं, बाह्यस्वरूपाच्या योगानें अंतःकरणांतील सद्धेतूंचें स्वरूप कळणें हें अगदींच अशक्य होय. कारण, ज्या तत्त्वांपासून हे हेतु मनांत उद्दङ्लेले असतात त्या तत्त्वांची खरी खरी योग्यता व सत्यता बाह्यस्वरूपावरून मुळींच दिसत नाहीं. त्याच्या योगानें सद्गुणविशेषांचें पूर्ण स्वरूप कधींच प्रत्ययास येत नाहीं. तसेंच हृदयांत सद्गुणांचें बीजारोपण प्रथमच केव्हां जाहलें; त्यांत पुढें केव्हां व कसकशी प्रगल्भता येत गेली; व शेवटीं तें एक सौंदर्यरत्न कसें बनलें—इत्यादि गोष्टी तरी मानवी प्राण्यांस कोठून कळणार? हेंच जर नाहीं तर, जरूर असें उत्तेजन देणें, योग्य असें गुणाचें अभिनंदन करणें या गोष्टी त्यांच्या हातून घडाव्या कशा? आणि त्या तशा घडल्या नाहींत, तर त्याबद्दल आपण विषाद कां मानावा? पण हेंही राहो.—विषाद मानणें व धैर्य खचणें हें कदाचित् स्वाभाविक आहे असें ह्मणतां येईल; पण अशा स्थितींत जर एखाद्यानें कशीमशी पोकळ प्रशंसा केली तर तेवढ्यावरूनच फुशारून जाणें हा आपला केवढा बरें अजागळपणा!—केवढें अज्ञान!!

असो. तेव्हां एकंदरींत,—

जगीं सर्वसाक्षी असे तोचि एक ॥
जगाचा नायक एकिएक ॥
तोचि जाणे सर्व हेतहि अमूचे ॥
खरें करी चीज तोचि त्यांचें ॥
तुका ह्मणे ठेवा भार त्याचेवरी ॥
करि कीर्ति तोचि परोपरी ॥ १ ॥

ठाणे सन १८९

एका स्त्रीचें मनोवेधक चरित्र.

मॅडेम आयडा फीफर (Madame Ida Pfeiffer) नांवाच्या एका आस्ट्रियन स्त्रीचें चरित्र आमच्या नुकतेंच वाचण्यांत आलें तें फारच चमत्कारिक व चित्तवेधक वाटल्यावरून आमच्या वाचकांस आज सादर करितों.

मॅडेम आयडा फीफर ही बाई आस्ट्रिया देशांत सन १८०६ त जन्मली. अगदीं लहान वयापासून तिला आपल्या वडील भावांशीं नाना तऱ्हेचे खेळ खेळून त्यांवर आपली सरशी करून दाखविण्याची फार हौस असे. ते जेवढे खेळ खेळत तेवढे सगळे खेळ ती त्यांशीं खेळे, व वयानें लहान असतांही त्यांत वहावा मिळवीत असे. आपल्या भावांप्रमाणें तीही बारावें वर्ष संपेतों पुरुषाचा पोषाक करी आणि प्रत्येक गोष्टींत ती आपल्या भावांबरोबर असे. अशा तऱ्हेची मुलीची वृत्ति पाहून तिच्या बापास फार कौतुक वाटे आणि तो थट्टेनें वारंवार असें ह्मणे कीं " आमच्या आयडाला शिपाइगिरीच्या शाळेंत पाठवून तिला जमादार बनवायची " आणि खरोखरच तिची बारावे वर्षीं असलेली लढाईविषयीं उत्कंठा विलक्षण होती. सन १८१८ त ह्मणजे आयडा अवघी बारा वर्षांची असतांना, नेपोलियन व त्याचीं प्रचंड सैन्यें ह्यांशीं टक्कर मारण्याची कडेकोट तयारी आस्ट्रियांत चालली होती, तेव्हां आयडाला एक प्रकारचें विलक्षण स्फुरण येत असे. दररोज लढाईची बातमी ऐकण्यास आयडा नेहमीं उत्सुक असे, व आपल्या देशास जय मिळाला हें वर्तमान जेव्हां तिनें ऐकलें तेव्हां तिला फार आनंद झाला. व जेव्हां कांहीं दिवसांनीं आपला मोड झाला असें कळलें तेव्हां तिला फार वाईट वाटलें. आपले शिपाई लोक लढाईला जातांना जेव्हां जेव्हां ती आपल्या खिडकींतून पाही तेव्हां तेव्हां आपल्या लहान वयाचा तिला फार राग येई, आणि ती नेहमीं ह्मणे कीं मी जर ह्याहून मोठी असतें तर खरोखरच ह्यांबरोबर लढाईला जाऊन आपल्या देशाचें रक्षण केलें असतें.

जसजशी आयडा मोठी होत चालली तसतशी तिला जगांतील रीति-

भाती जास्त कळूं लागल्या व तेराव्या वर्षी तिला पुरुषाच्या पोषाकाची लाज वाटूं लागली व पुष्कळ त्रास सोसून चौदाव्या वर्षी आपल्या स्त्री-जातीला योग्य असा पोषाख ती करूं लागली. ह्या वेळेपासून तिचा पोरकट स्वभाव व पुरुष होण्याची हौस वगैरे पोरपणांतील हूडपणा तिनें सोडून दिला. पण तो फक्त वरकांतीच होता. तिचें मन पहिल्याप्रमाणेंच हूड असे. तिनें लढायांचीं वर्णनें, कठिण प्रदेशांतून केलेल्या प्रवासांच्या गोष्टी, द्वंद्व युद्धांबद्दल गोष्टी वगैरे अनेक पुस्तकें नेहमीं वाचीत असावें. तिच्या बरोबरीच्या मुली नाना तऱ्हेचे पोषाख, नाटकें, बॉल वगैरे गोष्टींमध्यें पैसे खर्च करीत, पण असलें कांहींएक आयडास आवडत नसे. ती नेहमीं कांहींना कांहीं तरी मनाला चेतना आणणारीं पुस्तकें वाची. ह्याप्रमाणें जितकीं पुस्तकें तिच्या हातीं लागलीं तितकीं सगळीं तिला मुखोद्गत झालीं होतीं. अशा वाचण्याचा तिच्या मनावर असा परिणाम झाला कीं, दूर-दूरच्या देशांत जाऊन तेथले चमत्कार पहाण्याची तिला फार उत्कट इच्छा झाली. व ही इच्छा कशी तृप्त होईल या गोष्टीकडे तिचें चित्त लागलें.

आयडा १८२९ त तेवीस वर्षांची झाली. तेव्हां डाक्टर फीफर नांवाच्या एका मनुष्यावर तिची प्रीति जडली. डा. फीफर ह्याची पहिली बायको मरून बरेच दिवस झाले होते व तिजपासून झालेला एक मुलगाही आतां मोठा झाला होता. असें होतें तरी आयडानें डाक्टर फीफरशीं लग्न लाविलें. डाक्टर फीफर हा मनुष्य स्वभावानें चांगला व प्रामाणिक असे. परंतु त्याशीं लग्न लावून आयडाला सुख झालें नाहीं. कारण लग्न झाल्यावर कांहीं वर्षांनीं डाक्टर फीफर याचें उत्पन्न कमी कमी होत चाललें व तो अगदीं खालावला. नवीन लग्न झाल्याबरोबर त्याचा संसार वाढत चालला व डाक्टरीमध्यें हळूहळू मागें पाय आल्याकारणानें आयडाला व तिच्या दहा पोरांना एका खेडेगांवांत ठेवून तो एकटा शहरांत राहूं लागला. आपल्या संसारास आपल्या हातून होईल तेवढी मदत करावी ह्मणून आयडा स्वतः कांहीं शिवण काम करून कांहीं मुलींना रोज शिवणें, चित्रें काढणें वगैरे शिकवून पैसे मिळवी. पण इतक्या काटकसरीनें सुद्धां रोज पोटभर अन्न मिळण्याची पंचाईत अशी फार कठिण स्थिति तिला आली. अशा स्थितींत तिनें बरींच वर्षें काढल्यावर तिची

आई मृत्यु पावली. तिची लहानशी जिनगी व शेतवाडी आयडाला मिळाल्यामुळें आयडाला व तिच्या दहा पोरांना आतां जरा सुखाचे दिवस आले.

आपल्या मुलांना तिनें स्वतःच पुष्कळ शिक्षण दिलें होतें व तें जास्त करून त्यांना कांहीं तरी धंद्याला लावण्याच्या हेतूनें ती मुलांना घेऊन व्हायना शहरीं गेली. डाक्तर फीफरचीही ल्युनेबर्ग येथें जराशी चढती होऊं लागली होती म्हणून तो नेहमीं तेथेंच राहून कधीं कधीं आपल्या बायकापोरांस भेटण्याकरितां व्हायनास जात असे. ह्याप्रमाणें जराशी चांगली स्थिति आल्यावर मॅडेम फीफर हीस पुष्कळ वेळ सांपडूं लागला. आणि व्हायना येथें असल्यामुळें तिला नाना तऱ्हेचीं पुस्तकेंही वाचण्यास मिळूं लागलीं. तिची प्रवास करण्याची उत्कंठा पुन्हां जागृत झाली, पण मुलें लहान व डाक्तर फीफरचें वय झाल्यामुळें ती तशीच दाबून ठेवणें तिला भाग पडलें. ह्या वेळेस अशी गोष्ट घडली कीं, तिचा सगळ्यांत धाकटा मुलगा आजारी झाला व त्याला हवा बदलण्यास ती ट्रिस्टी ह्या गांवीं घेऊन गेली. ती त्यास दररोज समुद्रस्नान करण्यास नेत असे. ट्रिस्टी हें व्यापाराचें मोठें बंदर आहे व तेथें निरनिराळ्या देशाचीं जहाजें नेहमीं नांगरलेलीं असतात. समुद्राचा शांत व अफाट विस्तार, नानातऱ्हेचीं जहाजें वगैरे गोष्टींनीं तिचें मन आकर्षून गेलें व प्रवास करण्यास खास जाईन असा तिचा पक्का निश्चय झाला, मुलेंही आतां मोठीं झालीं, खाण्यापिण्याची टंचाई नाहींशी झाली व डाक्तर फीफरही घरीं येऊन स्वस्थ बसले तेव्हां आतां आपली मनीषा पूर्ण करण्यास ही संधि चांगली आहे अशी तिची खात्री झाली. पण प्रवासाला पुरण्यापुरते पैसे आपल्या जवळ नाहींत येवढाच कायतो विचार तिच्या मनाला त्रास देत होता. तरी पण मुळींच कांहीं न करण्यापेक्षां जेवढें करवेल तेवढें तरी करूं असें म्हणून, व आपल्या मागें आपल्या पोरांची व डा. फीफरची व्यवस्था लावून आयडा आपल्या मनाची तृप्ति करण्याकरितां सन १८४२ च्या मार्च महिन्यांत प्रवासास निघाली. त्यावेळीं तिचें वय छत्तीस वर्षांचें होतें!! पहा काय चमत्कार आहे तो! जन्मभर दारिद्र्य काढून व दहा मुलांचें ओझें बाळगून, छत्तिसावे वर्षीं ह्यातारीला प्रवास करण्याची जबर इच्छा व ती तृप्त करण्याची शक्ति!!

मॅडेम फीफर डान्यूब नदी उतरून, काळ्या समुद्रांतून कान्स्टँटिनो-

पल येथें गेली. तेथून एशिआमायनर, सीरिया, पॅलेस्टाईन हीं. पाहून मग ईजिप्ट, सिसिली मधून पुन्हां आपल्या गांवीं गेली. या प्रवासांत तिनें जे चमत्कार पाहिले ते सर्व तिनें लिहून ठेवले होते. व पुन्हां घरीं आल्यावर "व्हायना येथील एका बाईची पवित्र भूमीची यात्रा" ह्या नांवाच्या पुस्तकांत तिनें आपल्या यात्रेची साद्यंत हकीगत छापून प्रसिद्ध केली. तें पुस्तक इतकें मनोरंजक झालें होतें कीं, त्याच्या विक्रीपासून मॅडेम फीफरला पुष्कळ पैसे मिळाले. त्यामुळें पुन्हां प्रवास करण्याचा तिनें बेत केला. तिनें इंग्लिश व डॅनिश भाषांचा अभ्यास केला व यूरोपाच्या उत्तरेस असणाऱ्या आइसलंड नामक बेटांतील ज्वालामुखी पर्वत पाहण्याकरितां १८४९ त तेथें गेली. तेथील चमत्कार नीट बघून नार्वे, स्वीडन वगैरे देश बघून ती पुन्हां आपल्या गांवीं आली. पूर्वी प्रमाणेंच तिनें आपल्या प्रवासाचा वृत्तान्त लिहून प्रसिद्ध केला व तिसऱ्यानें प्रवास करण्यास पुरेसे पैसे मिळविले.

आपली इच्छा कांहींशी तृप्त झाली व प्रवासांतील अडचणींची साधारण माहिती झाली ह्मणून तिची प्रवास करण्याची इच्छा जास्त बळावत चालली, व त्याबरोबर ती तृप्त करण्याचाही मार्ग तिला दिसूं लागला. तिच्या मनांत आतां पृथ्वी-प्रदक्षिणेचे विचार येऊं लागले. "पुष्कळ पुरुषांनीं जर पृथ्वी-प्रदक्षिणा केली आहे तर मीं स्त्रीनें तरी कां करूं नये? मला जास्त अडचणी येतील कीं काय? किंवा कदाचित् मला स्त्रीत्वामुळें तो प्रवास सोपाही जाईल. पृथ्वी-प्रदक्षिणेंत पुष्कळ अडचणी व संकटें येतील हें जरी खरें, तरी ज्या गुणांनीं तीं पुरुषांनीं सोसलीं त्याच गुणांनीं तीं मलाही सोसतां येतील. असें जर मला वाटतें तर मग मीं कां ह्मणून मागें घ्यावें? लोक मला नांवें ठेवतील. ही बाई दुराचारी, हलकट, खुळी आहे असें नाना प्रकारानें हिणावतील हें उघड आहे. पण अशा रिकाम्या लोकनिंदेला भिऊन मागें सरण्यांत काय हंशील आहे? अशी कोणती गोष्ट आहे कीं, तिजकडे पहिल्यानें पाहून लोक नाक मुरडीत नाहींत!"

असा विचार करून ही साहसी बाई १८४६ सांत मेच्या पहिल्या तारखेस व्हायनाहून निघाली. ती एकदम दक्षिण अमेरिकेंत रायोडीजानीरोस गेली. ब्रेझिल देश पहात असतां एक दिवस एक पळून गेलेला

गुलाम सिद्धी तिच्या अंगावर तुटून पडला व त्यानें आपल्या सुरीनें दोन चारदां तिजवर वार केला. इतक्यांत दुसरे लोक येऊन त्यांनीं तिला सोडविलें. अशा भयंकर प्रसंगानें सुद्धां ती डगमगली नाहीं. कांहीं दिवसांनीं बरी झाल्यावर दक्षिण अमेरिकेच्या अगदीं दक्षिण भागाला ह्मणजे केप हॉर्नला वळसा घालून ती पॅसिफिक् महासागरांत आली व पॉलिनेशियन् बेटें बघून पुन्हां समुद्रांतून चायनास आली. नेहमींच्या रीतीप्रमाणें हिच्या गोऱ्या कातडीला चिनीलोकांनीं आपल्या देशांत येऊं दिलें नाहीं, ह्मणून ती सिंगापूर, सीलोन, मद्रास हीं शहरें बघून कलकत्यास गेली. नंतर गंगानदी चढून हिंदूंचें पवित्र स्थान काशी येथें तिनें कांहीं दिवस घालविले, व तेथून दिल्ली, आग्रा करून वेरूळचीं लेणीं पाहून मुंबईस आली व मुंबईचीं, घारापुरीचीं लेणीं तिनें पाहिलीं. पुष्कळ हिंदु गृहस्थांनीं तिची योग्यता जाणून तिला आपल्या घरीं नेऊन तिचा सत्कार केला, ही मोठी आनंदाची गोष्ट होय. हिंदुस्थानांतून ती इराणांत गेली, व बगदाद, बसरा ह्या वाटेनें बाबिलॉनचें पुराण प्रसिद्ध मैदान व तेथील मोडकीं घरें वगैरे तिनें पाहिलीं. इराण, तुर्कस्थान देशांतील अशिक्षित व बांडे लोकांच्या राज्यांतून एका स्त्रिती बाईनें एकटीनें प्रवास करणें ह्मणजे किती दुर्घट आहे हा विचार केला ह्मणजे फीफर बाईच्या धाडसाचें जेवढें आश्चर्य करावें तितकें थोडेंच! नंतर क्रिमीया, इजियन समुद्र वगैरे बघून ग्रीस देशांत ती गेली व इतिहास प्रसिद्ध अशीं सगळीं स्थलें पाहून ती परत व्हायनास जाऊन पोंचली. ह्मणजे समुद्रांतून तिनें पस्तीस हजार मैल व जमिनीवरून २८०० मैल इतका प्रवास करून ती परत आली.

परत आल्यावर तिनें आपल्या पृथ्वी प्रदक्षिणेचा इतिहास " a womans journey round the world " एका स्त्रीची पृथ्वी प्रदक्षिणा ह्या नांवानें छापून प्रसिद्ध केला. ह्या पुस्तकाच्या लाखों प्रति खपून सर्व युरोपांतील लोकांनीं मॅडेम फीफरची फार वहावा केली. येवढ्यानेंही ही बाई स्वस्थ राहिली नाहीं. एक वर्ष विश्रांति घेऊन ती पुन्हां यात्रा करण्याला निघाली. a womans' journey round the world पुस्तकाचे पैसे पुष्कळ उत्पन्न झाले होते, तेव्हां पैशाची आतां तिला फारशी काळजी नव्हती. यावेळेसही तिचा हेतु पुन्हां दुसऱ्या वाटेनें जाऊन पृथ्वी प्रदक्षिणा करण्याचा होता. व त्याप्रमाणें ती एकदम आफ्रिकेच्या दक्षिणेस

केप आफ गुड होपला जाऊन त्यास तिनें वळसा घातला. तेथून पुन्हां सिंगापूर, बोर्निओ सारख्या ओसाड व रानटी लोकांचीं बेटें पाहून जावा, सुमात्रा वगैरे बेटें तिनें पाहिलीं. (जुलै १८९२) जावा मध्यें तिला हिवताप लागून ती बरेच दिवस आजारी होती. बरी झाल्यावर पुन्हां पॅसिफिक महासागर वलांडून ती अमेरिकेंत सॅन् फ्रॅन्सिस्कोस गेली व तेथून पेरू वगैरेंस जाऊन सोन्याच्या खाणी तिनें पाहिल्या. मग अमेझॉन नदी उतरून पुन्हां ब्रेझील पहाण्याचा तिचा विचार होता. पण चांगले वाटाडे न मिळाल्यामुळें तिनें तो बेत रहित केला. व तेथून पनामा सामुद्रधुनींतून सेंट लुई, चिकागो, ह्या मार्गानें जाऊन नायगाराचा प्रचंड धबधबा तिनें पाहिला. मग कानडा देश बघून ती इंग्लंडला गेली व तेथें सहा महिने राहून परत व्हायनास गेली? येणेंप्रमाणें तिनें दुसऱ्यानें प्रदक्षिणा करण्याचा संकल्प शेवटास नेला. व पूर्वी प्रमाणेंच तिनें My second journey round the world ह्मणजे माझी दुसरी पृथ्वी प्रदक्षिणा ह्मणून पुस्तक लिहिलें. ह्या वेळेस तर तिची पहिल्यापेक्षां फारच वहावा झाली. प्रशियाच्या राजानें तिच्या सन्मानार्थ एक सोन्याचें पदक पाडून तिला बक्षिस दिलें. बर्लिन येथील रायल जीआग्रफिकल सोसायटीनें तिला आपले आनररी सभासद केलें. रिटर व हंबोल्ट सारख्या विद्वान गृहस्थांनीं तिची फार प्रशंसा केली!!

ह्याप्रमाणें दोनदां पृथ्वी प्रदक्षिणा करून पुन्हां प्रवास करण्याची बाईची हौस कायमच! दोन वर्षें विश्रांति घेऊन १८९६ त तिनें पुन्हांव्हायना सोडून हालंड, लंडन, पारिस, हीं पाहून रॉटर्डेम येथें पुन्हां जहाजांत बसून मॉरिशियसास गेली. व तेथून माडागास्कर नांवाच्या बेटांत जाऊन पोंचली. ह्यावेळीं तिला राजानें भेटावयास बोलाविलें. ह्यावेळीं मॅडॅगस्करच्या राजाचें व युरोपियन लोकांचें वांकडें होतें ह्मणून त्या राजानें फीफर बाईला व तिच्या बरोबरील आणखी कांहीं युरोपियन लोकांना कैदेंत टाकलें. तेथें त्यांना आपल्या जीवाची सुद्धां आशा राहिली नव्हती; पण फीफर बाईचें नशीब बळकट ह्मणून त्या राजाला दया येऊन त्यानें त्यांस पुन्हां मॅडॅगस्करांत पाऊल न टाकण्याची ताकीद करून व आपले लोक समुद्र किनाऱ्यापर्यंत पोंचविण्यास देऊन घालवून लाविलें. पण असें दिसतें कीं ह्या लोकांना देववेल तितका त्रास देण्याबद्दल त्यानें

आपल्या लोकांना गुप्तपणें हुकूम केला होता. कारण जो रस्ता आठ दिवसांत आटपायचा तो आटपण्यास त्यांनीं ९३ दिवस लावले. ह्यांचीं हांतरुणें पांघरुणें त्यांनीं हिसकावून घेतलीं तीं त्यांस मुळींच परत दिलीं नाहींत. ह्या प्रवासांत फीफर बाईचे फार हाल झाले. इतक्या लोकांस निजण्यास एक दोन चटया मात्र देत असत त्यांवरच तिला व त्यांना निजावें लागे. पांघरूण मूळींच नाहीं, वरून पाऊस धोधो पडत असे, तरी सुद्धां झाडाशिवाय दुसरी जागा ह्यांस उतरण्यास मिळत नसे. फीफर बाईनें जो एकदां झगा नेसला होता तो तिला बावन्न दिवसांत बदलतां आला नाहीं. स्नान करण्याची तर गोष्ट दूरच. अशा भयंकर प्रसंगामध्यें फीफर बाईला पुन्हां हिव यायला लागलें व अति जबर ताप येत असे. ती दोन दोन तास मूर्छित पडे पण; कोणीही तिच्याकडे लक्ष दिलें नाहीं. हें सर्व सोसून पुन्हां हे आपला जीव घेतात कीं काय ही काळजी रात्रं दिवस डोळ्यांपुढें असे ती वेगळीच!

आशा तन्हेनें मॅडेमफीफरची पक्की खात्री झाली. मॉरिशियस बेटांत पुन्हां आल्यावर डाक्तरांचें चांगलें औषध घेऊन महत्प्रायासानें ती वांचत्या पंधरा लागली, व तिला युरोपांत जाण्या इतकी शक्ति आली. ती लंडनच्या वाटेनें बर्लिनास गेली पण येथें ती दिवसें दिवस क्षीण होत चालली. ह्मणून हवा बादलण्यासाठीं क्राको येथें तिची एक मैत्रीण होती तिच्या येथें जाऊन राहिली. पण ईश्वरेच्छेनें हवा बदलण्यापासून तिला कांहीं फायदा न होतां ती ज्यास्त क्षीण होत चालली. तेव्हां आपल्या मुलामाणसांत जाऊन मरण्याच्या हेतूनें तिला व्हायना येथें आणलें व तेथें तिनें १८९८ त आक्टोबर महिन्याच्या २९ वे तारखेस प्राण सोडला.

येणें प्रमाणें फीफर बाईनें समुद्रावर एक लक्ष पन्नास हजार मैल व जमिनीवर वीस हजार मैल यात्रा केली. ह्या तिच्या कृतीवरून कदाचित् कोणास असें वाटेल कीं, ही बाई मनानें व अंतःकरणानें कठोर असून, शरीरानें पुरुषां प्रमाणें धष्टपुष्ट असावी. पण हा समज अगदीं चुकीचा होय. तिची मुद्रा इतकी शांत दिसे कीं, हिच्या अंगीं इतकें कर्तृत्व आहे असें कोणास सांगितलें असतां तें खरें सुद्धां वाटत नसे. कोणतीतरी एक गोष्ट करण्याचा पक्का निश्चय एकदां करून ती मिळ-

विण्याचा सतत व अश्रांत प्रयत्न करणें व तसें करीत असतां रिकाम्या लोकांच्या निंदेस न जुमानणें हा जो ह्या जगांत नांव मिळविण्यास अवश्य असा गुण तो मॅडेम फीफरच्या अंगीं पूर्णपणें वास करीत होता. व ह्या गुणापासून अति दुस्तर असें देखील कार्य कसें तडीस जातें हें मॅडेम फीफरच्या वरील चरित्रापासून शिकण्यासारखें आहे.

ग्रंथ संग्रहालय
नं.
दाणे सन १८८

एका अमेरिकन् कोट्याधीशाचे संपत्तीविषयीं उन्नत विचार *

अथवा.

संपत्तीचा सद्विनियम.

श्रीमंत आणि गरीब यांच्या मधील वैषम्य पाहून आजपर्यंत अनेक सत्पुरुषांचें मन द्रवलें आहे. व हें वैषम्य नाहींसें होऊन परस्परांशीं बंधुत्वानें वागण्याकडे मनुष्यांची प्रवृत्ति व्हावी ह्मणून त्यांनीं अनेक उपायही सुचविले आहेत. वरील उद्देश तडीस जाईल अशा रीतीनें संपत्तीची वांटणी करणें ह्मणजे मोठें कठिण काम आहे. आजपर्यंत सुचविलेल्या उपायांचा अनेकांनीं अनुभव घेऊन पाहिला आहे, पण त्यांत ह्मणण्यासारखें यश आलें नाहीं व मूळ प्रश्न तसाच अनिश्चित आहे. सदरहू प्रश्नाचा उलगडा करण्यापूर्वी हल्लीं मनुष्याची स्थिति काय आहे व त्याच्या मनोवृत्ति कशा आहेत याचा विचार करूं.

गेल्या थोड्या शतकांत मनुष्याच्या स्थितींत विलक्षण प्रकारचा फरक झाला आहे. एखाद्या लक्षाधीशाचा वाडा आणि गरिबाची झोंपडी ह्यांच्यांतील विरोधभाव आपल्या सुधारणेमुळें झालेल्या स्थित्यंतराचा मापक होय. ह्या स्थित्यंतराबद्दल विषाद मानण्याचें मुळींच कारण नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यापासून अत्यंत फायदा आहे ह्मणून त्याचें अभिनंदनच केलें पाहिजे. मनुष्य जातीची उन्नति जर इष्ट असेल तर कोणाच्याच घरीं कांहीं नसून एथून तेथून सर्व प्रकारें अठरा विश्वे दारिद्र्य असण्यापेक्षां कित्येक लोकांचीं घरें, विद्या, कला व इतर उपांगें ह्यांमधील जें जें कांहीं उत्कृष्ट ह्मणून असेल त्याचीं केवळ माहेरघरें होऊन राहणें अगदीं अगत्याचें आहे.

हें स्थित्यंतर कसें घडून आलें हें सहज समजण्यासारखें आहे. तें समजण्याकरितां मी एकच दाखला देतों तो असा कीं, त्यांत या प्रश्नाच्या सर्व बाजू सुरेखपणें दिसतील. आपले निर्वाहाचे पदार्थ तयार करण्याची

* ॲण्ड्रू कार्नेजी नांवाच्या एका अमेरिकन कोट्याधीशानें सदरहू निबंध प्रथम नार्थ अमेरिकन् रिव्हयूमध्यें लिहिला. तो ग्लॅड्स्टन् साहेबांचे शिफारशीवरून पालमाल ग्याझेट पत्रांत छापला व तेथून दुसऱ्याही कित्येक पत्रांत प्रसिद्ध झाला.

जी तऱ्हा आहे तींत ह्या सर्व प्रश्नांचें बीज आहे. निर्वाहाचे पदार्थ म्हणजे केवळ अन्नवस्त्र नव्हे, तर हल्लींच्या शास्त्रीय युगांत अनेकविध शोधांमुळें व युक्त्यांमुळें तयार होणाऱ्या ज्या अनेक उपयोगी वस्तु मिळूं लागल्या आहेत त्या सुद्धां घेतल्या पाहिजेत. पूर्वी उपयोगाचे पदार्थ घरांतच किंवा घराशेजारीं एकाद्या लहानशा कारखान्यांत अल्प प्रमणावर तयार करीत, कारखानदार आणि त्याच्या हाताखालीं काम शिकणारे लोक हे सर्व जवळ जवळ बसून काम करीत व एकाच ठिकाणीं रहात, ह्यामुळें त्या दोघांच्या स्थितींत फारसा फरक नसे. जेव्हां दुसऱ्याच्या हाताखालीं काम शिकणारे लोक स्वतंत्रपणें काम करूं लागून स्वतां कारखानदार बनत, तेव्हां त्यांच्या व ज्यांजवळ ते काम शिकले त्यांच्या काम करण्याच्या तऱ्हेंत फारसा भेद पडत नसे व ते पुनः त्याच रीतीनें आपल्या हाताखालीं लोक तयार करीत. त्यावेळीं सर्व कारागीर लोक सामाजिक स्थितींत व राजकीय स्थितींत सारख्याच योग्यतेचे असत. कारण त्या काळीं राज्यकारभारांत तशा लोकांचा बिलकूल शिरकाव नसे. हें उघडच आहे कीं, ह्या स्थितीमुळें माल तयार होई तो ओबड धोबड असून त्याला किंमत फार पडे. हल्लीं उत्कृष्ट तऱ्हेनें केलेले जिन्नस लोकांस इतक्या स्वल्प किमतीस मिळतात कीं, ही गोष्ट मागच्या पिढींतील लोकांना सुद्धां असंभवनीय वाटली असती. व्यापारावरही अशाच प्रकारच्या कारणांनीं असेच परिणाम झाले आहेत आणि त्यामुळें जगाचें फार हित झालें आहे. पूर्वी श्रीमंत लोकांना जे उपयोगाचे पदार्थ मिळत नव्हते ते आतां गरिबांनाही मिळूं लागले आहेत. पूर्वी जे चैनीचे पदार्थ म्हणून मानले जात होते ते आतां चरितार्थास अत्यावश्यक होऊन बसले आहेत. थोड्या पिढ्यांपूर्वी एखाद्या जमीनदाराला जें सुख मिळत असे त्याच्यापेक्षां आतां एखाद्या सामान्य मजुराला जास्त सुख मिळत आहे. पूर्वीच्या राजांना जीं सुखाचीं साधनें उपलब्ध नव्हतीं तीं आतां एखाद्या सरदाराला मिळत आहेत.

ह्या इष्ट सुधारणेबद्दल आह्मांला जो मोबदला द्यावा लागत आहे तो कांहीं लहानसहान नाहीं हें निःसंशय आहे. आपण हजारों काम करणारे लोक गिरण्यांत व खाणींत जमवितों, त्या लोकांबद्दल गिरण्यांच्या किंवा खाणींच्या मालकांना फारच थोडी माहिती असते. आणि आपला यजमान कोण ह्याची त्या लोकांना कल्पना सुद्धां नसते. धनी आणि चाकर ह्या प-

रस्परांचा कांहीं संबंध नसतो. निरनिराळें काम करणाऱ्या लोकांच्या निरनिराळ्या जाती होऊन जातात आणि त्यांचें परस्परांविषयीं अज्ञान असल्यामुळें सहजच एकमेकांचा एकमेकांवरील विश्वास उडून जातो. व्यापाराच्या चढाओढीमुळें कारखानदारांस करवेल तितकी काटकसर करावी लागते. व त्यामुळें अनेक वेळां धनी आणि चाकर, श्रीमंत आणि गरिब, भांडवलवाले आणि मजूर, ह्यांच्यामध्यें तंटे उत्पन्न होतात, व समाजांतील शांतता नाहींशी होऊन चळवळ उत्पन्न होते. मनुष्यसमाजांतील समधर्मता (Homogeneity) लय पावते.

सुखोपभोगाचे पदार्थ स्वल्प किंमतीस मिळविण्याकरितां समाजास जसें नुकसान सोसावें लागतें त्याप्रमाणेंच चढाओढीच्या स्वाभाविक परिणामामुळेंही समाजास बरेंच नुकसान सोसावें लागतें. पण चढाओढीमुळें होणाऱ्या नुकसानापेक्षां फायदा फार अधिक आहे. आज आपणास अनेकविध सुखें देणारी जी विलक्षण आधिभौतिक सुधारणा झालेली दिसते ती केवळ चढाओढीच्या नियमाचा परिणाम होय. परंतु जाऊंद्या. हा चढाओढीचा नियम हितकारक असो किंवा नसो. तें पाहण्याचें आपलें काम नाहीं. आपलें स्थित्यंतर झालें ही गोष्ट जशी आपणास नाकबूल करितां येत नाहीं, त्याप्रमाणेंच आपले सर्व व्यवहार चढाओढीच्या तत्त्वावर चालले आहेत, हें अगदीं निर्विवाद आहे. एवढें लक्ष्यांत धरलें ह्मणजे झालें. आतां ह्या तत्त्वाचे आह्मी दास होऊन राहिलों आहों, व त्यांतून सुटण्यास दुसरा एखादा श्रेयस्कर मार्ग कांहीं अद्यापि सांपडाला नाहीं. हा चढाओढीचा नियम कित्येक व्यक्तीच्या संबंधानें पाहिलें असतां अहितकारक असतो पण तोच समाजाचे संबंधानें हितकारक आहे. कारण त्याच्या योगानें कोणत्याही कामांत ज्यांच्या अंगांत विशेष योग्यता असते, तेच लोक पुढें येतात आणि त्यांच्या बुद्धीचा व कौशल्याचा समाजास लाभ होतो. ह्याकरितां समाजांत श्रीमंती आणि गरिबी असा विषमभाव असणें, उद्योग, कलाकौशल्य आणि व्यापारधंदे ह्यांचीं सूत्रें थोड्या लोकांच्याच हातीं असणें व तीं चढाओढीच्या नियमाला अनुसरून चालणें, ह्या गोष्टी पुढील उन्नतीला साधनीभूत आहेत इतकेंच नव्हे तर अत्यावश्यक आहेत असें जाणून आपण त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. इतकें कबूल केलें ह्मणजे मोठ्या प्रमाणावर काम करणारे जे कारखानदार व व्यापारी त्यांना ह्या कामांत आ-

पली सर्व बुद्धि खर्च करण्याचा मार्ग मोकळा ठेविला पाहिजे हेंही कबूल करावें लागतें. प्रचंड कारखाने उपस्थित करणें आणि ते सुयंत्र चालविणें हें अलौकिक बुद्धीचें काम आहे. आणि हें सिद्ध करण्यास आपला नेहमींचा अनुभव बस्स आहे. ज्याच्या अंगीं तें अलौकिक शहाणपण आहे, तो कोणच्या स्थितींत व कोठेंही आपल्या कर्तबगारीनें संपत्ति मिळवितो हेंच त्याचें प्रमाण. कोणत्याही धंद्यांत वापरलेले जे लोक असतात त्यांना एखादा भागीदार पसंत करावयाचा असल्यास ते त्याच्या भांडवलाची फारशी पर्वा करणार नाहींत; पण त्या कामांत त्याची बुद्धि कशी चालते ह्या गोष्टीकडे लक्ष देतील. कारण धंद्यांत वापरले असल्यामुळें भांडवल अधिक करणें त्यांस सोपें जातें. वाढविलेल्या भांडवलाची सुव्यवस्था लागणें हेंच काय तें अति कठिण. सुव्यवस्थित योजक नसला ह्मणजे असलेलें भांडवलही नाहींसें होईल. ज्या लोकांच्या अंगीं विशेष बुद्धिमत्ता असेल त्यांना अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांप्रमाणें आपल्या बुद्धींचा व्यय करण्यास मार्ग मिळाला ह्मणजे त्यांना नित्य निर्वाहाला पुरून उरण्याजोगी संपत्ति मिळणारच. वर जे कित्येक नियम सांगितले त्यांसारखाच हा एक आहे व त्यामुळें मनुष्यजातीचें हित झालें आहे.

जे सोशिअलिस्ट * अथवा ॲनर्किस्ट हल्लींची स्थिति समूळ नाहींशी करण्याचा प्रयत्न करीत आहेत, ते ज्या पायावर सुधारणेची इमारत बांधिली आहे तो पायाच ढासळूं पहात आहेत असें ह्मटलें पाहिजे. कारण ज्या दिवशीं उद्योगी व हुशार लोकांनीं आपल्या आळशी बांधवांस 'पेरशील तर खाशील' 'उद्योग करशील तर जगशील' 'आळशी रहाशील तर मरशील' असें सांगितलें त्या दिवसापासून

---

* "समाजांत श्रीमंती व गरिबी असा विषमभाव नसावा, ज्याला आहे त्याला रेलचेल, नाहीं त्याला कांहींच नाहीं, अशी स्थिति नसावी. ही स्थिति बदलून हा विषमभाव नाहींसा करून सर्वत्रांस होतां होईल तो सारखें सुख मिळावें" असा वाद करणारे कांहीं लोक आहेत. त्या लोकांस 'सोशिअलिस्ट' असें नांव आहे. त्यांचें मूळ ह्मणणें युक्तीस सोडून नाहीं हें कोणीही कबूल करील, परंतु ह्या पंथाच्या कित्येक धुरीणांनीं आपल्या अत्यंत उत्सुकतेच्या भरांत हा विषमभाव नाहींसा करण्याकरितां जे कित्येक वेडगळ उपाय सुचविले व त्यांचें प्रतिपादन अजूनही ते करीत आहेत, त्यावरून कित्येक अर्थ-शास्त्रज्ञांनीं व समाज-शास्त्रज्ञांनीं त्यांस 'अराजवादी' (Anarchist) 'झोटिंगबादशाहीचे तरफदार' अशीं नांवें दिलीं आहेत.

च सुधारणेला सुरुवात झाली. आणि उद्योगी व आळशी असे दोन वर्ग बनून पूर्वी जी सर्वत्र संमता होती ती नाहींशी झाली. ह्याविषयाचा जो थोडासा विचार करील त्याच्या लवकरच ध्यानांत येईल कीं, स्वकष्टार्जित मालमत्तेवर मनुष्याची सत्ता असणें हें सुधारणेला अत्यावश्यक आहे. गरीब मजुराच्या ट्यांकेंतील शंभर रुपयांवर जसा त्याचा सर्वस्वी हक्क आहे तसाच लक्षाधीशाचा त्याच्या लक्षांवर असला पाहिजे. जे *कॉम्युनिस्ट वगैरे लोक ह्या अत्यंत स्वार्थ परतेच्या तत्त्वाऐवजीं **सामान्य स्वामित्वाचें** तत्त्व स्थापूं पहातात, त्यांना उत्तर येणेंप्रमाणें दिलें पाहिजे. जगाच्या बाल्यावस्थेंत त्या तत्त्वाचा अंमल लोकांवर होता. त्याचा अनुभव येऊन चुकला आहे. आणि आज हल्लीं जी सुधारणा दिसत आहे ती त्या तत्त्वाला फांटा दिल्याचाच परिणाम होय. ज्या लोकांच्या अंगीं करामत व धाडस आहे त्यांच्याजवळ वित्तसंचय झाल्यानें मनुष्य-जातीचें नुकसान न होतां फायदाच झालेला आहे. स्वार्थपरता, स्वकष्टार्जित जिनगीवर स्वतांचा हक्क असणें, वित्तसंचयाचा नियम व चढाओढीचा नियम, या चतुष्टयामुळें आपल्याला पाहिजे तसे फायदे होत नाहींत ह्मणून त्याचा नाश केला पाहिजे, असें ह्मणावयाचें, तर हल्लींच्या काळीं सर्वांत श्रेष्ठ मनुष्य असेल तो आपल्या कल्पनेप्रमाणें श्रेष्ठ नाहीं ह्मणून त्याचाही नाश केला पाहिजे असाही आग्रह कां धरूं नये ? पण हें रास्त नव्हे.

सध्यांचा आपला अनुभव तरी असा आहे कीं, वरील चार गोष्टींमुळेंच जगाला प्रस्तुतची इष्ट स्थिति प्राप्त झाली आहे. ह्या गोष्टींपासून क्वचित् विषमता किंवा अन्याय होण्याचा जरी संभव असला व केवळ कल्पना सृष्टींत तरंगणाऱ्यास जरी त्या अपूर्ण दिसत असल्या तरी अनेक ट्यंगें असून सर्व प्राणी-कोटींत ज्याप्रमाणें मनुष्य श्रेष्ठ त्याप्रमाणेंच मनुष्यकृत ह्मणून जें जें कांहीं आहे त्या सर्वांत त्या उत्कृष्ट व अमोलिक होत. ह्यांत संशय नाहीं.

तेव्हां ज्या स्थितींत मनुष्य-जातीचें विशेष कल्याण होण्याचा संभव

---

* सर्व मालमत्तेचें (जमीन वगैरे) स्वामित्व समाजाकडे असून सर्वांना सारखें सुख मिळावें असा वाद करणारे लोक. या निरनिराळ्या वादांविषयीं थोडक्यांत माहिती हवी असल्यास Principles of Political Economy by J. S. Mill, Bk II, chapter 1&11 पहा.

आहे; परंतु जींत थोड्या लोकांजवळ वित्तसंचय झाल्यावांचून गत्यंतर नाहीं, अशी स्थिति इष्ट धरून चाललें पाहिजे. एवढ्या संबंधानेंच ह्मटलें तर हल्लींची स्थिति समाधानकारक आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पण पुढें असा प्रश्न उत्पन्न होतो—आणि वर लिहिलेले विचार खरे असतील तर तेवढ्याच प्रश्नाचा विचार आपणास कर्तव्य आहे—कीं सुधारणेच्या तत्त्वांना अनुसरून थोड्या लोकांच्या हातांत जी संपत्ति जाईल तिचा त्यांनीं व्यय कसा करावा? आज ह्या महत्त्वाच्या प्रश्नाचें मी आपल्या समजुतीप्रमाणें योग्य असें उत्तर देत आहें. प्रथम हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, अनेक वर्षेपर्यंत सतत श्रम करून मध्यम स्थितींतले लोक जो थोडा बहुत पैसा मागें टाकितात व ज्यावरील किफायतीवर त्यांच्या कुटुंबाचें पोषण व शिक्षण अवलंबून असतें तो पैसा ह्मणजे वित्तसंचय नव्हे. अशा रीतीनें पैसा मागें टाकून आपल्या कुटुंबाची साधारण संस्था करून ठेवणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होय.

वित्तसंचय ह्मणजे कुटुंबाची प्रस्तुत व भावी उत्कृष्ट तऱ्हेची व्यवस्था होऊनही जें वित्त एखाद्याच्या जवळ असतें तो. कुटुंबाच्या चालू व भावी निर्वाहाला पुरून उरणाऱ्या पैशाचा व्यय करण्याच्या काय त्या तीन तऱ्हा आहेत. मरणोत्तर पुत्रपौत्रादिकांना उपभोगासाठीं पैसा ठेवणें; मरणोत्तर सार्वजनिक उपयोगाच्या कामाकरितां देणें, किंवा जिवंतपणीं त्याचा सद्व्यय करणें. पहिली तऱ्हा फार अन्यायाची आहे. राजसत्ताक देशांतून संपत्तीचा बहुतेक भाग वडील मुलास मिळतो. आणि आपलें नांव व पदव्या पुत्रपौत्रादिकांकडे जाऊन चिरकाल रहातात, ह्या गोष्टींतच त्या लोकांना प्रतिष्ठा वाटत असते. ह्या लोकांचे हेतु कितपत सफल होतात हें युरोपांतील ह्या वर्गांतल्या लोकांची जी सध्यां स्थिति आहे तीवरून तेव्हांच दिसून येईल. कित्येक बडे लोकांची संतति आपल्या मूर्खपणामुळें किंवा जमिनीची किंमत उतरल्यामुळें आतां दरिद्रावस्थेस येऊन पोंचली आहे. नातू किंवा पणतू यांजकडेच इस्टेट जावयाची असे खडतर कायदे असतांही ग्रेटब्रिटनांत सुद्धां पुत्रपौत्रादिक सारखें वैभव राहणें कठिण पडतें व जमिनी परक्याच्या हातांत जातात. अनुभवावरून आपणास असें दिसून येतें कीं, अशा रीतीनें पुत्रपौत्रादिकांना संपत्ति ठेविल्यापासून त्यांचें फारसें हित होत नाहीं. व राष्ट्रालाही तें हितकारक

नाहीं. बायकोची आणि मुलींची आपल्या स्थितीप्रमाणें बेतापुरती तरतूद करून ठेवल्यानंतर मुलांना पैसा ठेवते वेळीं बापानें चांगला विचार केला पाहिजे. व ठेवणें झालें तर फारच बाताबेतानें ठेविला पाहिजे. कारण श्रीमंतांच्या मुलांचीं बापानें ठेविलेल्या व ह्मणून फुकट मिळालेल्या पैशानें दुर्दशा झाल्याचीं उदाहारणें अनेक सांपडतील. आपल्या कुटुंबाचें व आपल्या राष्ट्राचें कल्याण जर इष्ट असेल तर अशा प्रकारचा संपत्तीचा विनियोग अगदीं अप्रशस्त होय असें विचारी मनुष्यास वाटल्यावांचून राहणार नाहीं.

आतां दुसरा प्रकार मरणोत्तर लोकोपयोगाकडे खर्चाकरितां लावून देण्याचा. अशा प्रकारच्या सद्व्ययापासून होणारा आनंद मरणापर्यंत तहकुब ठेवण्यास कोणी तयार असला तर ठीकच. पण पुनः अशा रीतीनें ठेवलेल्या पैशाचा उपयोग कसा होतो ह्याबद्दल आपल्या डोळ्यांपुढें जीं उदाहारणें असतील त्यांवरून विचार केला असतां बहुतकरून आपल्या मनाचें समाधन होणार नाहीं. मालकाच्या मनांतील उद्देश ऐकीकडेच राहून पैशाची अव्यवस्था झाल्याचीं उदाहरणें थोडीं थोडकीं मिळतील असें नाहीं.

बड्या बड्या श्रीमंत लोकांच्या मरणोत्तर मागें राहिलेल्या प्रचंड संपत्तीवर अधिकाधिक कर बसविण्याकडे समाजाची जी सध्या विशेष प्रवृत्ति होत आहे तिच्यावरून लोकमताला किती चांगलें वळण लागत आहे हें ध्यानांत येईल. पेनसिलव्हानिया संस्थानांत तर कित्येक अपवाद वजा करून बाकी अशा रीतीनें ठेविलेल्या संपत्तीचा एक दशांश सरकारांत जातो. परवांच्या इंग्लंडांतील पार्लमेंटांतील बजेटांत सुद्धां अशा प्रकारच्या इस्टेटीवरील कर वाढविण्याविषयीं सूचना आहे. आणि विशेष महत्त्वाची गोष्ट ही कीं, हा कर इस्टेटीच्या मानानें अधिक उणा असावयाचा आहे. कराच्या अनेक प्रकारांत हा प्रकार सर्वोत्कृष्ट होय. आजन्म पैशाच्या राशीच्या राशी मिळविण्याकडे ज्यांस आपलें कांहीं कर्तव्य वाटत नाहीं, अशा लोकांना चांगलें समजूं दिलें पाहिजे कीं, तुमच्या पैशाचा सार्वजनिक कामांकडे उपयोग केला असतां त्यापासून समाजाचें किती तरी हित

आहे व तो तुमचा तुम्ही न कराल तर त्याचा योग्य हिस्सा सरकार म्हणजे समाजच *कराच्या रूपानें घेतल्यावांचून कधीं सोडणार नाहीं. मरणोत्तर ठेवलेल्या इस्टेटीवर जबर कर बसविल्यानें केवळ स्वार्थपरतेनें पैशाचा संचय करणें राष्ट्रास संमत नाहीं असें व्यक्त होतें. ह्या संबंधानें लोकमत अधिकाधिक प्रबल होत गेलें पाहिजे, व हळूहळूंच्या किती पटीनें तरी ह्या तत्त्वाचा अंमल बसला पाहिजे. आतां, श्रीमंतांनीं मरणोत्तर ठेविलेल्या इस्टेटीचा कितवा हिस्सा कराच्या रूपानें राष्ट्राच्या तिजोरींत जावा ह्याची इयत्ता ठरविणें कठिण काम आहे, पण असे कर प्रमाणानें वाढत जावे. म्हणजे अमुक एक रक्कम अगदीं माफ असून त्याच्या पुढें जसजशा रकमा वाढत जातील तसतसें प्रमाण वाढत जाऊन शेवटीं †शायलॉकसारखे जे कोट्याधीश असतील त्यांच्या संपत्तीचा निदान अर्धा भाग तरी राष्ट्राच्या तिजोरींत जावा. ह्या योगानें श्रीमंतांना जीवंतपणींच आपल्या पैशाचा योग्य तऱ्हेनें विनियोग करण्याची बुद्धि होईल. व हीच गोष्ट समाजानें आपल्या डोळ्यापुढें नेहमीं ठेविली पाहिजे, कारण तीपासून समाजाचें फार हित आहे.

आतां राहिलेला जो तिसरा प्रकार त्याच्या योगानेंच श्रीमंत आणि

---

*'The community in the form of the State' असे शब्द मुळांत आहेत हे वाचकांनीं पक्के ध्यानांत धरावे. कारण ज्या आमच्या सारख्या देशांत राजे परकी आहेत, त्या ठिकाणीं अशा तऱ्हेची व्यवस्था होणें अशक्यच आहे. उदाहरण शोधण्यास फार लांब जावयास नको. 'Famine Insurance Fund' 'भावी दुष्काळ निवारणार्थ फंड' उभारला, त्याचा व्यय कसा व कोठें झाला याबद्दल विचार करावा म्हणजे झालें! या संबंधानें ता० २७ आगस्ट १८८९ रोजीं हाऊसआफ् कामन्स समेत Charles Bradlaugh यांचें जें भाषण झालें तें पहावें.

†ऑन्टोनिओ नांवाच्या, व्हेनिस्शहरांतील प्रामाणिक व्यापाऱ्यास प्रसंगांत गांठून त्याच्या उराचें अच्छेर मांस मागून घेणारा हावरा ज्यूसावकार शायलॉक आन्टोनिओच्या मित्राच्या बायकोकडून भर कोर्टांत फजिती पावून आपल्या मालमत्तेला मुकला. ही गोष्ट 'मर्चेन्ट आफ् व्हेनिस' या शेक्सपिअरच्या नाटकांत आहे. त्यास वर उल्लेख केला आहे.

गरीब ह्यांच्या मधलें वैषम्य नाहींसें होऊन त्यांच्यांत प्रेमभाव उत्पन्न होईल. उच्चनीच भाव नाहींसा करून टाकून श्रीमंत आणि गरीब ह्यांच्यांत समता करण्याचाच हा एक उपाय आहे. मात्र हा काम्युनिस्ट वगैरे लोकांच्या उपायांहून अगदीं भिन्न आहे. हा उपाय म्हटला म्हणजे हल्लींच्या सुधारलेल्या स्थितीचेंच उत्क्रांत स्वरूप होय. काम्युनिस्ट लोकांचा उपाय हल्लींच्या स्थितीचा समूळ नाशक होय. जगांत हल्लीं जी अत्यंत स्वार्थपरता दिसून येते तिला अनुसरूनच ह्या उपायांची योजना केलेली आहे. व तो हळू हळू अमलांत आणण्या इतकीही जगाची स्थिति आलेली आहे. ह्या तत्त्वाच्या अमलानें थोड्या लोकांजवळ जी वाजवीपेक्षां अधिक संपत्ति असेल ती राष्ट्राच्या तिजोरींत जाईल आणि तेथून सार्वजनिक हिताकडे तिचा विनियोग होईल. आणि अशा रीतीनें जितकी राष्ट्राची उन्नति होण्याचा संभव आहे तितकी तोच पैसा सर्व लोकांकडे अर्थातच थोडा थोडा विभागून गेला असतां होण्याची शक्यता नाहीं हें उघड आहे. आपल्या कित्येक बांधवांनीं जमविलेला पैसा सार्वजनिक कामाकडे खर्चिला असतां त्यापासून जितका आपल्याला उपयोग होईल तितका तो सर्व लोकांना वर्षानुवर्ष हळू हळू विभागून दिल्यानें होणार नाहीं. हें तत्त्व एखाद्या गरीब मनुष्याला सुद्धां नीट समजावून देतां येईल. व तें त्यास पसंत पडेल.

ह्या जगांत उदयास येण्याचे मार्ग महाबिकट आहेत. आमची दृष्टि फार कोती आहे. आमचीं उत्कृष्ट कामें अगदीं कवडीच्या मोलाचीं आहेत. तेव्हां अशा अडचणींतून जे डोकें वर काढितात त्यांस आपल्या संपत्तीचा उपभोग करूं देण्यास कोणी कुरकुरणें रास्त नाहीं. पण श्रीमंतांनीं एका गोष्टीबद्दल मात्र नेहमीं आभारी असलें पाहिजे. आपल्या जिवंतपणीं लोक कल्याणाचीं पाहिजे तीं कामें करून आपल्या गरीब बांधवांचें हित करणें व त्यांजकडून आशीर्वाद घेणें आणि आपल्या जीविताचें साफल्य करणें हें त्यांच्या अगदीं हातांत राहील. श्रीमंतांची कर्तव्यें म्हटलीं म्हणजे खालीं लिहिल्याप्रमाणें होत. प्रथमतः डामडौल किंवा चैन हीं ध्यानीं मनींही न आणितां साधेपणानें आपला चरितार्थ चालविण्यांत लोकांना कित्ता घालून देणें. नंतर आपल्या आप्तांची व आश्रितां-

ची बेताबातानें सोय करून देणें. इतकें करून जें द्रव्य शिलक राहील तें केवळ लोकांनीं त्याजवळ ठेवलेली ठेव होय असें समजलें पाहिजे. आणि तो पैसा त्याच्या समजुतीप्रमाणें जो मार्ग उत्तम असेल त्या मार्गानें त्यानें केवळ लोक-हिताच्याच कामीं खर्च केला पाहिजे. ह्याप्रमाणें श्रीमंत मनुष्य ह्मटला ह्मणजे गरीब लोकांचा केवळ मुकृत्यार किंवा मुनीम होऊन राहतो. व जें काम त्यांना बरोबर करितां येणार नाहीं तें ह्यानें आपल्या विशेष ज्ञानाचा, अनुभवाचा व बुद्धीचा उपयोग करून करावें अशी आणखी जबाबदारी त्याजवर येते.

ह्या ठिकाणीं मोठे बिकट प्रश्न उत्पन्न होतात. आप्तांना व आश्रितांना किती पैसा ठेवावा ? साधेपणा ह्मणजे काय ? व डामडौल ह्मणजे काय? उधळेपणाचें लक्षण कोणतें ? निरनिराळ्या स्थितींतील लोकांस निरनिराळ्या इयत्ता पाहिजेत. ह्या संबंधानें जरी कांहीं विशेष उत्तर देतां येणार नाहीं तरी एक सामान्य उत्तर देतां येईल. तें हें कीं, समाजाला ह्या गोष्टीचा न्याय तावडतोब करतां येतो. आणि समाजाचा न्याय बहुधा वावगा असत नाहीं.

ज्या लोकांवर शहाणपणानें पैशाचा व्यय करण्याची जबाबदारी आली आहे ते लोक स्वतः शहाणे असले पाहिजेत. कारण मनुष्य-जातीच्या उन्नतीला एक मोठा अडथळा ह्मटला ह्मणजे हल्लीं अव्यवस्थित व मूर्खपणाचा दानधर्म करण्याचा जो प्रकार आहे तो होय. श्रीमंतांचे लाखों रुपये आळशी, व्यसनी व अयोग्य लोकांना उत्तेजन देण्यांत खर्च होण्यापेक्षां केवळ समुद्रांत जाऊन पडल्यानेंही मनुष्य-जातीचें अधिक कल्याण होईल. हल्लीं ज्याला दानधर्म ह्मणतात त्यांत जर हजार रुपये खर्च झाले असले तर त्यांपैकीं ९९० रुपये बहुतकरून निवळ मूर्खपणानें खर्च झालेले असतात. खरोखर ह्या पैशाचा व्यय अशा रीतीनें होतो कीं, जीं दुःखें नाहींशीं करण्याच्या हेतूनें तो केला असतो तीं दुःखें वाढविण्याला मात्र तो कारणीभूत होतो. धर्म करितांना पहिला मुद्दा हा ध्यानांत ठेविला पाहिजे कीं, जे लोक स्वतःउद्योगी आहेत त्यांना मदत करावयाची.ज्यांना आपली स्थिति सुधारावी अशी इच्छा असेल त्यांस साध-

नांची अनुकूलता करून द्यावयाची. अशा रीतीनें मिळालेल्या मदतीचें त्यांनीं चीज करून दाखवावें. व आपणाला ज्याप्रमाणें आज मदत मिळत आहे त्याप्रमाणें पुढें आपण तशा स्थितींतील लोकांस मदत करूं अशा रीतीचे विचार त्यांच्या मनांत यावे. त्यांना फक्त मदत द्यावयाची. त्यांच्याकरितां आपणच सर्व कांहीं करावयाचें नाहीं. हल्लीं जगांत चालला आहे, अशा दानधर्मानें व्यक्तीचाही फायदा होत नाहीं व समाजाचाही फायदा होत नाहीं. कांहीं अपवाद शिवाय करून जे सत्पात्र असतात त्यांना बहुधा मदतीची जरूरच लागत नाहीं. ते आपल्या तेजोविशेषानेंच प्रकाशमान होतात. आतां अपघात किंवा आकस्मिक स्थित्यंतर झालें तर गोष्ट निराळी, मग त्यांस मदत लागेल. सत्पात्रीं दान करण्याविषयीं जितकी दक्षता आहे तितकीच कुपात्रीं दान न होण्याविषयीं ज्याच्या ठायीं दक्षता असेल तोच मनुष्य खरा सुधारक समजला पाहिजे. कुपात्रीं दान न व्हावें ह्याबद्दल थोडीशी अधिक दक्षता असणेंही जरूर आहे. कारण हल्लींच्या दानधर्मानें दुर्गुणाला उत्तेजन मिळून नुकसान होत आहे तें सद्गुणाला बक्षीस मिळून होणाऱ्या फायद्याच्या किती तरी पट आहे. तेव्हां श्रीमंतांनीं आपल्या पैशाचा व्यय करावयाचा तो ह्या विषयाचा ज्यांनीं गहन विचार केला आहे अशा थोर पुरुषांचें अनुकरण करूनच केला पाहिजे. ह्या पुरुषांचें मत असें आहे कीं, लोकांच्या कल्याणाचा उत्कृष्ट मार्ग म्हटला म्हणजे त्यांना शिड्या आणून द्यावयाच्या म्हणजे ज्यांच्या अगांत हिंमत असेल ते त्यांच्यावर चढतील. सार्वजनिक बागा व विश्रांतीचीं साधनें तयार करून ठेऊन लोकांचीं शरीरें व मनें आनंदित करावीं. कला कौशल्याचीं कामें करावीं, कीं ज्यांच्या योगानें लोकांना आनंद होऊन त्यांना त्या कामाची रुचि लागावी. आणि लोकांची सामान्य स्थिति ज्यांच्या योगानें सुधारेल अशा नाना प्रकारच्या सार्वजनिक संस्था उभाराव्या आणि अशा रीतीनें लोकांचेंच चिरकालिक कल्याण जेणेंकरून होईल अशा उपायांनीं लोकांची संपत्ति त्यांची त्यांस परत करावी.

श्रीमंत आणि गरीब ह्यांच्या मधील भेद ह्या रीतीनें नाहींसा केला पाहिजे. संपत्तीचा संचय व वांटणी ह्यांबद्दल जे नियम आहेत त्यांत ह्या रीतीनें बिलकूल फरक होत नाहीं. स्वार्थपरता तशीच कायम राहते. पण

लक्षाधीश मात्र लोकांचा केवळ विश्वासु मुनीम बनून राहतो. समाजाची संपत्ति कांहीं वेळपर्यंत त्याच्या हातांत राहील. पण ती केवळ समाजाला स्वहितासाठीं ज्या रीतीनें तिचा उपयोग करितां आला नसता, त्या रीतीनें त्यानें उपयोग करावा एवढ्याकरितांच वर्षानुवर्ष चरितार्थाला पुरून उरणाऱ्या संपत्तीचा सार्वजनिक हिताकडे व्यय करणें ह्यासारखा थोरपणाचा सूचक व मनुष्याला भूषणास्पद असा दुसरा सद्विनियोग नाहीं असें विचारी पुरुषांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. व येणेंप्रमाणें माझ्या मतें श्रीमंत आणि गरीब ह्यांच्या मध्यें प्रेमभाव उत्पन्न होऊन आपणास सत्ययुगाची प्राप्ति होईल.

धों. के. करवे. बी. ए.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
आणे सन १८

पुस्तकावर अभिप्राय.

युनाइटेड् स्टेटस्‌ची लोकस्थिति व प्रवासवृत्त. भाग १ या नांवाचें पंडिता रमाबाईनीं नुक्तेंच एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. तें प्रसिद्ध होतांच त्यांनीं मला वाचावयास दिलें, याबद्दल मी त्यांची फार आभारी आहें. ह्या पुस्तकांत सर्व प्रकारची—राजकीय, सामाजिक, धर्म संबंधाची, गृहस्थिति संबंधाची, स्त्रियांच्या स्थिति संबंधाची----माहिती फार खुलाशानें आणि सर्व बाजूंचा विचार करून दिली आहे. पुस्तकांत युनाइटेड् स्टेट्‌सचा थोडासा इतिहासही दिला आहे. त्यामुळें अमेरिकाखंड पूर्वी होतें कसें व कोणाच्या ताब्यांत, आणि हल्लीं आहे कसें याची माहिती होते. तेथें मूळचे जे रहिवासी आहेत त्यांची कशी काय स्थिति आहे हें सर्व कळून येतें. पुस्तकाची भाषा फारच सुंदर आहे. वाक्यें लहान लहान असून शब्द सोपे घातले आहेत. त्या संस्कृता असूनही त्यांत होतां होईल तितका संस्कृत शब्द न योजितां मराठीचीच योजना केली आहे. हें पुस्तक प्रत्येक कुटुंबवत्सलानें व देशहितेच्छूनें आपल्या संग्रहीं ठेवावें. व स्त्रीशिक्षणेच्छूनें त्यांतलीं कांहीं, (विशेषेंकरून स्त्रियांच्या संबंधाचीं) पानें आपल्या स्त्रिया, लेकी, सुना भावजया, बहिणी वगैरे कडून भगवद्गीतेप्रमाणें वाचवावीं. प्रत्येक देशहितेच्छूनें आपल्या मुलांकडूनही त्याचा पाठ घेत जावा, आणि आमच्या कर्तव्य पराङ्मुख ग्रामव्यवस्थापक मंडळीनें तेथल्या शासनपद्धति वगैरे वाचून आपणाला जो येवढासा श्री रिपन मूर्तीनें दिलेला अधिकार तो, उत्तमोत्तम चालवून आपण ज्यास्त जोखमीच्या अधिकारास योग्य आहों असें दाखविलें तर आह्मी हिंदुस्थानवासी लोकही (पुस्तकांत वर्णन केलेल्या) लोकांप्रमाणेंच आहों असें सिद्ध होईल.

हें पुस्तक लहान मुलापासून तों मोठ्या राजकार्यकुशल मुत्सद्यापर्यंत व नांगऱ्यापासून महामहोपाध्यापर्यंत, सगळ्यांना वाचण्यासारखें आहे. आजपर्यंत अमेरिकेंत जेवढी मंडळी गेली त्यांनीं आपल्या डोळ्यांचें सार्थक करून घेतलें परंतु तें त्यांचें करणें अप्पलपोटेपणासारखें होतें

आपल्या मनाला आनंद व्हावा, व मीं अमेरिका पाहिली अशी फुशारकी मारण्यास मिळावें येवढाच कायतो त्यांचा हेतु, पण अशा सुधारलेल्या राष्ट्रापासून त्यांनीं आपल्या देशाला कांहींच फायदा करून दिला नाहीं. त्या मंडळींत ज्या दोन स्त्रिया गेल्या, त्यांनीं आपल्या कृतीनें दहा पुरुषांपेक्षां एका स्त्रीची योग्यता जास्त आहे असें दाखविलें. या स्त्रिया कोण हें या ठिकाणीं सांगायलाच पाहिजे असें नाहीं. कै० वा० सौ० डा० आनंदीबाईनीं आपला देह स्वदेश--भगिनींकरितां झिजविला. व पंडिता रमाबाई रात्रंदिवस झिजवीत आहेत. त्या फक्त स्त्रियांच्याच सुखार्थ झटतात असें नाहीं, तर या पुस्तकावरून त्या आपल्या देशांतल्या प्रत्येक व्यक्तीची सुधारणा व्हावी याकरितां झटतात हें सिद्ध होतें. युनाइटेड्स्टेट्स्च्या, लोकस्थितीचें वर्णन करून त्यांनीं आपली स्वदेश-प्रीति व्यक्त करून दाखविली. आजपर्यंत जे जे पुरुष तिकडे गेले त्यांनीं कोठें कोठें वर्तमान पत्रांतून थोड थोडे लेख प्रसिद्ध केले, परंतु या पुस्तकासारखें सविस्तर सर्व बाजूंचा निःपक्षपात बुद्धीनें विचार करून लिहिलेलें पुस्तक प्रसिद्ध झालें नव्हतें. एका स्त्रीनें ती वाण दूर केल्याबद्दल आह्मां स्त्रीवर्गास अभिमान वाटणें स्वाभाविक आहे व तो वाटतो.

पंडिता रमाबाईंसारख्या स्त्रिया (मग एकच कां होईना) आमच्या देशांत आहेत आणि त्यांच्या सारखें जर स्त्रियांना स्वातंत्र्य आणि शिक्षण आहेत. तर पुरुषवर्गाला मोठें साहाय्य होईल, याचें त्या मूर्तिमंत उदाहरण आहेत. असें त्यांनीं आपल्या कृतीतें सिद्ध करून दाखविलें. हें कोणाच्यानेंही नाकबूल करवणार नाहीं.

या पुस्तकामुळें (प्रवासवृत्तामुळें) पुस्तक--संग्रहांत जी जागा रिकामी पडलेली होती ती त्यांनीं उत्तम प्रकारें भरून काढल्याबद्दल पुस्तक-संग्रहावर ह्यांचे फार फार उपकार झाले आहेत असें सांगण्यास मला फार आनंद होत आहे.

सर्व राष्ट्राच्या मागून निर्माण झाल्यामुळें, प्रत्येकांत जे जे ह्मणून दोष होते ते सर्व सुधारून " सुधारून छापलेली आवृत्ति " प्रमाणें या राष्ट्रानें आपले सर्व दोष काढून टाकले कीं काय असें त्यांचें वर्णन वाचून मनांत ाल्याशिवाय रहात नाहीं. स्वतःचें लोकसत्ताक राज्य असल्यावर ती फायदे असतात, किती प्रकारच्या सुधारणा करण्यास सांपडतात व-

गैरे गोष्टी या पुस्तकावरून चांगल्या समजतात. पुस्तकांत कोठेंही पक्षपात आढळत नाहीं. जशी चांगली बाजू दाखविली आहे तशी वाईटही दाखविली आहे. अमेरिकन् लोकांच्या चांगल्या गुणांबरोबर वाईट गुण छापविण्याचा प्रयत्न कोठेंही केलेला आढळत नाहीं. जसा त्यांच्या उद्योगाचा महिमा गाइला आहे, तसाच त्यांनीं इंडीअन् लोकांचा कपटानें,क्रूरपणानें व फसवणुकीनें जो छल केला, आणि पीडलेल्या अमेरिकन् लोकांच्या उज्वळ कीर्तीला कायमचा जो भला मोठा डाग लागलेला आहे त्याचेवर पांघरूणही पण घातलें नाहीं.

या पुस्तकापासून आमच्या देशीं लोकांना पुष्कळ शिकण्यासारख्या गोष्टी आहेत. त्या ज्याच्या ते पहातीलच, परंतु मला जी गोष्ट सर्वांत महत्त्वाची वाटली ती, स्त्रीशिक्षणापासून त्या देशाला झालेले फायदे ही होय.

"स्त्रियांनीं अमुक पावलेंच नित्य चालावें, त्यांनीं अमुक घांस अन्न खावें, अमुक घोट पाणी प्यावें, आणि अमुक मिनिटें झोंप घ्यावी, इत्यादि सारख्या शुष्क वादांत आमचे पुरुष आज कित्येक दिवस अगदीं चूर होऊन गेले आहेत. ते जर या (अमेरिकन्) स्त्रियांच्या शौर्याचा व कर्तृत्वाचा विचार करतील तर आमचे डोक्यावर त्यांचें उपकाराचें भलें प्रचंड गाठोंडें होईल. आणि आम्ही तें जन्मजन्मांतरीं विसरणार नाहीं.

एखाद्या स्त्रीनें हातांत एखादा कागद घेतला कीं, आमच्या वडील माणसांची अमर्यादा होते. जणु का तिनें अत्यंत लाजीरवाणी एखादी गोष्ट केली. एखादें आप्तइष्टाकडून तिचे नांवावर टपालांतून पत्र आलें कीं, सर्व घरच्या माणसांना आपली अब्रू गेलीसें वाटतें, एखाद्या वर्तमानपत्रांत एखादीचें नांव प्रसिद्ध झालें, एखाद्या स्त्रीचा लेख प्रसिद्ध झाला, एखाद्या स्त्रीसमाजांत तुटपुंजे दोन शब्द तिचे मुखांतून निघाले कीं, घराची अब्रू कमी केल्याचा डोंगरा येवढा आरोप तिचे माथीं बसला म्हणून समजावें !! कोणी स्त्री एखादी शाळा पहाण्यास किंवा समाज पहाण्यास गेली, तर तिचे संबंधानें पराचे कावळे करून लोक आख्याइका रचतात. आणि येवढेंच करून ते जर शांत होते तर बरें होतें. पण याहीपेक्षां भयंकर आरोपाला ती अधिकारिणी होते. या दुराग्रही लोकांची अब्रू या शब्दाची व्याख्या करणें मोठें कठिण आहे. अशा लोकांनीं अमेरिकेतल्या

स्त्रियांची स्थिति एकवेळ तरी वाचण्याची तसदी घ्यावी.

समाज–भीतिरूप तुरुंगांत आह्मां स्त्रियांना कोंडून ठेवून त्याच्या दरवाजाला कडीकुलूप लावून त्याचेवर सक्त पहारा करण्याचें काम आमचे लोक मोठ्या एकनिष्ठपणानें बजावतात. व त्याबद्दल त्यांना मोठा अभिमान वाटतो, परंतु वास्तविक अभिमान बाळगण्यासारखीं कोणचीं कामें याचें त्यांना भान न राहतां, एकाच गोष्टीच्या मागें ते लागले आहेत. आपल्याला कठिण प्रसंग आलेला आहे, त्यांत होईल तितकें करून मनुष्यबळ मिळविण्याचें टाकून उगीच कोरड्या अभिमानाला चढण्यांत विचारी माणसें कशीं पडलीं कोण जाणे!! एखाद्या गरीब शेतकऱ्याचें घर बांधावयाचें असलें आणि त्याला मजुरी देण्यास सामर्थ्य नसलें तर तो जसा आपली बायको मुलें मदतीला घेऊन आपलें कार्य तडीस नेतो, त्याचप्रमाणें आमच्या लोकांनीं मार्ग धरल्यास चांगलें होईल. विनाकारण तुरुंगाचा दरवाजा संभाळीत बसण्यांत ते आपल्या व ज्याचेवर ते पहारा करितात त्या व्यक्तीच्या आयुष्याचा फुकट नाश करितात. असें ह्मणण्यास बिलकुल शंका वाटत नाहीं. आतां कित्येक आपलीं जुनीं नासून कुजून सडून गेलेलीं उदाहरणें पुढें आणतील व त्यांचे योगें बायकांसारखा सुखी प्राणी जगांत नाहीं असें सिद्ध करूं पहातील; परंतु ते जीं कारणें पुढें आणणार तीं वर ह्मटल्याप्रमाणें जुनीं असल्यामुळें कितपतशीं टिकाव धरतील? आजकाल कोणताही स्त्रियांच्या तर्फेचा प्रश्न निघाला कीं, आलें आमच्या लोकांचें जुनें भारूड पुढें! ते आपल्यापुर्ती सुधारणा पाहिजे तशी करूं शकतील पण आमच्या संबंधाची गोष्ट निघाली कीं पुरे, यांनीं विचारावर ढकललीच ह्मणून समजावी.

संकटकाळीं स्त्रीवर्गाकडून, त्या सुशिक्षित असल्या तर कसें साहाय्य होतें हें अमेरिकन् लोकांची इंग्लिशांशीं लढाई झाली त्या वेळीं अमेरिकन् स्त्रियांनीं व्यक्त करून दाखविलें आहे. यावरून तरी आमच्या लोकांची खात्री होईल तर देवानें गाऱ्हाणें ऐकलें ह्मणावयाचें!

सुशिक्षीत स्त्रियांचे हातून पुरुषांच्यापेक्षां चांगलीं कामें होतात, आमच्यांत पुरुषांपेक्षां एकी जास्त असते, आह्मी स्वाभाविक कोंवळ्या मनाच्या व दयाभूत अंतःकरणाच्या आहों; त्यामुळें चांगलीं कामें करून वळण लाववूं. हें अमेरिकेंतल्या मद्यनिषेधक राष्ट्रसभा, जुटी वगैरेवरून

व्यक्त होत आहे. त्याचप्रमाणें आमचीं कोंवळीं बालकें, आह्मी अक्षरशत्रु असल्यामुळें निर्दय, कठोर, अविचारी, पंतोजीच्या हातांत आह्मांला द्यावीं लागतात. आणि त्यांच्या पाठीवर, गालांवर, हातांवर वठलेले वळ व सुजलेले शरीराचे भाग आह्मांला मुकाट्यानें पहावे लागतात; व त्यांवर हळदबोळ उगाळून घालतांना त्या कोंवळ्या बालकांना होणाऱ्या यातना डोळ्यांनीं पहाव्या लागतात; व त्यामुळें आह्मांला अश्रु ढाळावे लागतात. परंतु उपाय काय? ह्या गोष्टी जर पुरुष–वर्गाच्या काळजाला झोंबून ते आह्मांला शिक्षण देऊन शाळा चालविण्याची परवानगी देतील तर!! पण ते आपआपणांतच मुळीं, स्त्रिया अमुक कामाला योग्य आणि अमुक कामाला अयोग्य असा वाद घालीत आहेत. परंतु खरोखर आह्मी योग्य कीं अयोग्य? अमुक गोष्ट आमचे हातून होईल कीं नाहीं, वगैरे आमच्या संबंधाच्या गोष्टींत आह्मांला बोलण्याचा मुळीं अधिकारच नाहीं!!! तेच शंका प्रतिशंका व प्रश्न करतात व आमच्याबद्दलचीं उत्तरेंही देतात. तेव्हां वरील सारखीं कामें आह्मांला जरी तीं आमच्या आटोक्यांत आहेत असें वाटलें तरी तें त्यांना खरें वाटणार कसें? हिंदु लोक मोठमोठ्या जागांवर रहाण्यास व हुद्यांचीं कामें चोख रीतीनें करण्यास जरी योग्य असले तरी त्यांची जशी मायबाप सरकाराला खात्री नाहीं त्याचप्रमाणें हें एक आहे.

अमेरिकेंतल्या बायकांना थोडथोडें लिहितां वाचतां तरी येत होतें. पण आह्मांला त्याची सुद्धां मनाई. कोणाला येत असलें तर तें मुद्दाम येत नाहीं असें सांगावें लागतें. कारण न जाणो लोक काय ह्मणतील? त्याचप्रमाणें बायकांच्या आवडी निवडी सर्व कांहीं दुसऱ्याच्या आवडी निवडीवर अवलंबून असणार. तिला एखादी चांगली गोष्ट करावीशी वाटली तरी घरच्या माणसांकरितां ती तिची इच्छा मरेपर्यंत जागच्या जागींच रहाते. करावयाचें काय?

प्रत्येक मनुष्याला आपले हातून एखादें तरी चांगलें कृत्य व्हावें, आपल्या पाठीमागें आपलें नांव रहावें; आपणास स्वतंत्रता असावी, आपला देह परोपकारांत थोडा तरी झिजावा अशी आवड असते. बाकी त्याप्रमाणें कृति कितीकांचे हातून होत असेल हा प्रश्न वेगळा. आपल्याला जी बुद्धि प्राप्त झाली आहे तिचा सद्व्यय व्हावा असें कोणाला वाटत

नाहीं ? आह्मां हिंदु स्त्रियांना ह्मणजे अमेझान स्त्रियांचे सारखी युद्ध करण्याची आवड थोडीच आहे ? आह्मी जें गृहकृत्य करीत आहों तेंच यापेक्षां शहाणपणानें करण्याचें सामर्थ्य विद्येच्या योगानें यावें व पुरुष–वर्गाचा गृहसंबंधीं त्रास अंशतः तरी चुकावा ही इच्छा. आह्मी विद्या शिकल्यावर संसार टाकून जाणार नाहीं. हीं अगदीं खात्री असावी. अमेरिकन स्त्रियांनाही तिकडच्या अदूरदृष्टी पुरुषांकडून थोडा त्रास झाला नाहीं. पण त्यांना थोडी तरी पांढऱ्यावर काळी रेघ ओढतां येत होती, आमच्या सारखी एकादशीच्या दिवशीं तुळशीबागेंत जाण्याला परवानगी मागावी लागत नव्हती, घरांत भाजींत टाकण्याला कोथिंबीर हवी असली तर तिचेकरितां टोलीच्या कवड्या मागून आणावयाला तोंड वेंगाडावें लागत नव्हतें, ह्मणून त्यांनीं थोडें तरी आपलें धैर्य प्रकट केलें. आह्मांला कसला बाई असा सोन्याचा दिवस येणार! असे निराशेचे शब्द प्रत्येक देशभगिनीच्या मुखांतून हें पुस्तक वाचल्यावर निघाले तर मोठेंसें आश्चर्य नाहीं. व आमच्या लोकांवर जशी सरकार संबंधीं कांहीं गोष्टी बोलतांना राजद्रोहाची भीति तशी आह्मांला पुरुषद्रोहाची भीति असल्यामुळें, ते उच्चारलेले शब्द कोणी ऐकले न ऐकले तोंच गिळून जावे लागतील. हें जरी खरें आहे, तरी वरच्या सत्याला आणखी एखाद्या सत्याची पुरवणी नको.

या पुस्तकांत स्त्रियांना वरिष्ठ प्रतीचें शिक्षण दिलें असतां कोणत्याही रीतीनें तोटा होत नाहीं.अशीं पुष्कळशीं उदाहरणें आहेत त्यांपैकीं कांहींचा मासला येथें सादर करितें.

"वरिष्ठ–विद्याशिक्षणानें स्त्रियांच्या शरीर—संपत्तीची किंवा सौंदर्याची हानि झालेली कोठें दिसून येत नाहीं. लहान व मध्यम प्रतीच्या विद्यालयांची गोष्ट सांगायाला नकोच; पण कोर्णेल्, व्यासर, वेल्सले, स्मिथ, ब्रिन्मार इत्यादि विद्यालयांतून हजारों तरुण स्त्रिया वरिष्ठ विद्येचें अध्ययन करीत आहेत. तेथें जाऊन प्रत्येक ठिकाणीं कांहीं दिवस राहून, मी ह्या व इतर गोष्टींचा तपास केला; त्यावरून मला खात्रीपूर्वक समजलें कीं, वरिष्ठविद्या—शिक्षण स्त्रियांस चांगलें मानवतें. त्यापासून त्यांच्या रूपलावण्याची हानि होत नाहीं. त्यांचा कोमल मर्यादशील स्वभाव बदलून, त्या अस्वाभाविक होत नाहींत. ह्या विद्यालयांतून

पदव्या मिळवून गेलेल्या पुष्कळ स्त्रिया विवाहित होऊन, उत्तम रीतीनें संसार चालवीत आहेत. त्या शिक्षित झाल्या ह्मणून मुलाबाळांचा, गृहकृत्यांचा वगरे अव्हेर करीत नाहींत. बायका शिक्षित असल्या कारणानें त्यांच्या नवऱ्यांस दुःखें भोगून वैताग घेण्याचा प्रसंग आला नसून, त्यांच्या संसाराची वाताहातही झाली नाहीं ! सदरील विद्यालयांतून शिकून आलेल्या पुष्कळ स्त्रियांच्या घरीं जाऊन मी त्यांच्या घरादारांची व्यवस्था पाहिली, व त्यांच्या नवऱ्यांचा समाचार पुसून घेतला. तेव्हां त्यांच्या नवऱ्यांनीं स्त्रियांस उत्तम शिक्षण असावें असें वारंवार बोलून दाखविलें, हें पाहून मला समाधान वाटलें. दोन वर्षांपूर्वी मिस् आलिस् फ्रीमन् ही बाई वेल्स्ले कालेजाची अध्यक्ष होती. ती त्या पदावर काम करूं लागण्यापूर्वी वरिष्ठ–विद्यालयाच्या तर नाहींच, पण लहानशा शाळेच्या देखील अध्यक्ष बनून तेथें चांगली व्यवस्था ठेवणें, हें बायकांला कधींच साधावयाचें नाहीं, असा जगाचा समज होता. पण आलिस् फ्रीमन्नें सहाशें तरुण होतकरू विद्यार्थिनी ज्यांत वरिष्ठ विद्या शिकत होत्या, असल्या जंगी विद्यालयाचें अध्यक्षपद घेऊन आपलें काम फार उत्तम रीतीनें चालवून जगास आश्चर्य चकित केलें. तिच्या विद्वत्तेला योग्य मान देऊन कलंबिया विश्वविद्यालयाच्या चालकांनीं (तिची परीक्षा घेऊन) आलिस् फ्रीमन्ला PH.D. ची पदवी दिली. (ही पदवी विश्वविद्यालयांच्या सगळ्या पदव्यांत श्रेष्ठ आहे.) तिजविषयीं कोणा संशयात्म्यास अशी काळजी पडली होती कीं, " ह्या जंगी विद्यालयाच्या अध्यक्षिणीला विद्याध्ययनांत जन्म (तीस वर्षे) घालावावा लागल्यामुळें, गृहकृत्य कसें करावें ह्याचें ज्ञान मुळींच नसेल; तिला कोठें नवरा मिळेल कीं नाहीं, याचा संशयच आहे. तिला एकाद्या विद्यालयाची व जंगी सभांची उत्तम व्यवस्था ठेवतां येते, विद्या शिकवितां येते, शास्त्रीयविषय घेऊन वादांत मोठ्या गजपंडितांशीं टक्कर मारतां येते, तें सगळें खरें; पण त्याचा उपयोग काय ? ती बायको झाली तशी तिला नवऱ्याचा संसार चालवितां आला नाहीं, तर विद्याध्ययनाचें फळ काय झालें ? " पण बाबांनों, अंमळ दमाखालीं घ्या. आलिस्फ्रीमन्सारख्या विदुषीलासुद्धां नवरा मिळेल आणि मिळाला, तोही सामान्य विद्वान् आहे असें नाहीं. आलिस्फ्रीमन् ही जंगी PH.D आतां उत्तम रीतीनें संसार चालवीत आहे. तिला थोरल्या विद्यालयासंबंधी गोष्टींप्रमाणेंच लहा-

नशा घरगुती प्रकरणांचीही माहिती आहे. तिला सहाशें विद्यार्थिनींच्या विद्यालयाप्रमाणेंच आपल्या घराचाही सांभाळ करतां येतो, ह्या गोष्टींत आतां तिळमात्र संशय नाहीं ! असो. आतां आमच्या पुरोभागीं (दोष शोधून काढणारा) मित्राचा शेवट काय झाला ह्मणून विचाराल तर, "संशयात्मा विनश्यति । नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥" इतकें ह्मणून हा भाग पुरा करितें. "

शिक्षकाचें काम स्त्रियांवर सोपविलें असतां, किती फायदे होतात ते रमाबाईनीं दाखविले आहेत ते असे,

"ह्या सगळ्या शंका कितपत खऱ्या किंवा काल्पनिक होत्या, हें सांगत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. शंभर वर्षांपूर्वी युनाइटेड् स्टेट्समध्यें स्त्रियांना सरकारी शाळांतून शिक्षकिणींचें काम करतां येत नव्हतें; कारण शाळेंत दांडग्या मुलांना आज्ञेंत ठेवून चांगलें वळण लावून देण्यापुरतें बळ स्त्रियांच्या अंगीं नाहीं, असें पुरुषांस वाटत होतें. पण इ० स० १७८९ त मासचूसेट्सच्या कायदे करणाऱ्या पुरुषमंडळीनें–स्त्रियांस शाळांतून शिकवितां येतें कीं नाहीं ह्याची उगीच परीक्षा पाहण्याकरितां ह्मणा किंवा कमी पगार देऊन काम उरकून नेण्याकरतां ह्मणा, कसेंही असो,–एक नवीन कायदा करून बायकांना संस्थानिक सरकाराच्या सार्वजनिक शाळांतून साधारण शिक्षण देतां यावें, असा नियम केला. त्या काळीं स्त्रियांना " क, ख, ग, " आणि " एक, एक, एक, " ह्या शिवाय दुसरें कांहीं शिकवितां येत नसे. कारण विद्वान्, विचारी, कनवाळू पुरुषांना, बायका फार शिकल्यानें त्यांची प्रकृतिविकृति बिघडेल, असें भय वाटून, त्यांनीं मोठ्या सावधगिरीनें एक स्त्रियांचा अभ्यासक्रम " तयार केला होता. ह्या पठनक्रमाचा ज्यांनीं अभ्यास केला, त्यांस व्याकरणशुद्ध भाषेंत लहानसें पत्रसुद्धां लिहितां येत असेल किंवा नसेल, हें निश्चयें करून सांगतां येत नाहीं. मग त्यांनीं मुलांना वरिष्ठविद्या शिकण्यास तयार करणें, किंवा स्वतःवरिष्ठ शिक्षण देणें, हें तर लांबच राहिलें. पुढें कालक्रमें करून स्त्रियांनीं पर्वतप्राय विघ्नें व विरुद्धलोकमतरूपी उंच चिनी कोट आपल्या आड आला असतांही, त्याच्या भीतीनें हायहुय करून हातपाय गुंडाळून न बसतां,.घरीं राहूनच आपलें ज्ञान वाढवून घेतलें. शिक्षकिणींची योग्यता, वजन आणि साधारण शिक्षण देण्यांत त्यांचा केवढा उपयोग आहे, हें

लोकांस कळून येऊं लागलें तेव्हां, ह्या शिक्षकिणींस आपलें काम उत्तम रीतीनें करतां यावें, ह्मणून त्यांस "स्त्रियांच्या पठणक्रमा" पेक्षां कांहींशी उंची प्रतीची विद्या मिळावी, असें सुज्ञजनांस वाटूं लागलें. पुढें स्त्रियांना वरिष्ठ-शिक्षण मिळूं लागल्यावरही, त्यांस सर्वत्र सर्वप्रकारच्या वरिष्ठ विद्यालयांतील अध्यापकांच्या पदावर आरूढ होण्याचा मार्ग खुला झाला नव्हता; पण मिशिगन् युनिवर्सिटीनें आपल्या सरस्वतीमंदिराचें सुवर्णद्वार उघडून, स्त्रियांस पुरुषांच्या बरोबरीनें सरस्वती देवीच्या सिंहासनाशीं बसून तिची आराधना करण्यास बोलावलें. तेव्हांपासून बायकांना आपल्या योग्यतेनुरूप शिक्षक, अध्यापक, विद्यालयाध्यक्ष, इत्यादि (पूर्वी केवळ पुरुषांकरतां राखून ठेवलेल्या) पदांवर आरूढ होऊन, उत्तम रीतीनें काम करून, आपली कर्तृत्वशक्ति व बुद्धिशक्ति केवढी आहे, हें सप्रमाण सिद्ध करून देण्याची संधि सांपडूं लागली. आतां बायकांस शाळेची व्यवस्था ठेवतां आणि मुलांस चांगलें वळण लावून देतां देईल किंवा नाहीं, असा संशय कोणाच्या मनांत येत नाहीं. युनाइटेड् स्टेट्सच्या स्थानिक, संस्थानिक आणि राष्ट्रीय ह्या सरकार त्रिकुटास स्त्रियांचें काम इतकें कांहीं पसंतीस आलें आहे कीं, त्यांनीं बहुतेक सगळ्या मुलांचें प्राथमिक व मध्यम शिक्षण स्त्रियांच्या हातीं सोंपून दिलें आहे. आतां शिक्षकिणी वरिष्ठ शिक्षणही आपल्या हातीं घेऊं लागल्या आहेत. राष्ट्राच्या सार्वजनिक (ह्म० वरिष्ठ, मध्यम व खालच्या वर्गांतील शाळा आणि विश्वविद्यालयें ह्या) विद्या शाळांतून एकंदर दोन लक्ष त्र्याहात्तर हजार शिक्षक विद्यादान करीत आहेत; ह्या शिक्षकांपैकीं एक लक्ष चौपन्न हजार तीनशें पंचाहात्तरजणी बायका आहेत. ह्याशिवाय पुष्कळ वरिष्ठ प्रतीच्या स्वतंत्र व सार्वजनिक शाळांतून स्त्रिया गणित, रसायन, वनस्पति, ज्योतिष, शारीर, दर्शनानुशासन, सिद्धपदार्थविज्ञान, इत्यादि गहन शास्त्रीय आणि तत्त्वज्ञानसंबंधीं विषयांच्या अध्यापिका झाल्या असून, उत्तम रीतीनें आपलें काम करीत आहेत. कोणी विद्यालयांच्या अध्यक्ष, कोणी उपाध्यक्ष, कोणी सगळ्या शहरांतील शाळांच्या वरिष्ठ, कोणी वरिष्ठ शिक्षकिणी, कोणी "डीन्" आणि कोणी नीत्युपदेशक झाल्या आहेत. कोणी राजनीति, तत्त्वज्ञान, इतिहास, व्यवहार, शास्त्रीय, इत्यादि गहन विषयांवर सुबोध ग्रंथ लिहीत आहेत. कोणी विदुषी केवळ युनाइटेड् स्टेट्समध्येंच नव्हे, तर युरोपाच्या प्राचीन विद्यापिठांतूनही अध्ययन करून,

तेथील विद्यादिग्गजांची शाबासकी मिळवीत आहेत. व्यासर् कालेज्ची ज्योतिषशास्त्राध्यापिका प्रोफेसर मेरिया मिचेल् ह्या बाईनें क्यास्लाइन् हर्शेल् ह्या विदुषीप्रमाणें ज्योतिःशास्त्रांत उत्तम प्रवीणता संपादून, नव्या नक्षत्रग्रहांचा शोध लावून, रशिया सरकारची शाबासकी व त्याजकडून उत्तम बक्षीस मिळविलें; आणि पाश्चात्य ज्योतिःशास्त्रज्ञ मंडळांत आपलें नांव अजरामर करून ठेवलें. प्रोफेसर जेन्. एम्. व्यांक्राफ्ट् हिणें "पार्लमेंट्स् ऑफ् प्यारिस्" नामें फ्रान्सच्या राजनीतीच्या वर्णनाचा ग्रंथ लिहिला आहे. तो ग्रंथ आज जान्स् हापकिन्स्, कोर्नेल इत्यादि विश्वविद्यालयांतील महापंडितांच्या मतें राजनीतिविषयक अत्युत्तम ग्रंथ ठरला आहे. मिशिगन् युनिवर्सिटीची प्रोफेसर लुईजा रीड् स्टोवेल् ह्या प्रख्यात बाईनें सूक्ष्मदर्शनविद्येंत इतकी कांहीं प्रवीणता संपादिली आहे कीं, लंडनच्या "रायल् माइक्रस्कोपिकल् सोसाइटी" नांवाच्या महासभेच्या सदस्यांनीं तिला आपल्या सभेची सदस्या केली. हल्लीं अमेरिकेंत जितक्या ह्मणून प्रसिद्ध वजनदार शास्त्रज्ञांच्या सभा आहेत, त्यांतून विदुषी स्त्रियांस पुरुष विद्वानांच्या बरोबरीनें सदस्यपद मिळत आहे. साठ वर्षांखालीं न्यूयार्कच्या विद्वान्–पण कांहींशा अधू दृष्टीच्या–कायदे करणाऱ्या मंडळीस 'पुढील अध्यो शतकांत स्त्रिया विद्यांगणामध्यें येऊन एवढाले पराक्रम करतील; युनाइटेड् स्टेट्स्च्या लक्षावधि पुत्रांचें शिक्षण व त्यांस नीत्युपदेश देण्याचें काम अर्धे अधिक स्त्रियांच्या हातीं सोंपवून देण्यांत येईल;' इत्यादि गोष्टींचें भाकित करून सांगितलें असतें तर, तें केवळ न्यूयार्कच्या राज्यकार्यधुरंधरांसच नव्हे; तर सर्व जगास केवळ शशविषाणवत् असंभवनीय आहे, असें वाटलें असतें. शिक्षित स्त्रियांनीं विद्याखात्यांत आल्यापासून युनाइटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रीय शिक्षणाला किती उन्नतदशेस आणलें, ह्याचें वर्णन आणि प्रशंसा केली तितकी थोडी होणार आहे. आज ज्या किंडर गार्टन् ऊर्फ बालोद्यानशिक्षणपद्धतीच्या योगानें हजारों किंबहुना लक्षावधि मुलांचें हित होत आहे, व ज्याच्या योगानें कोंवळ्या लेंकरांच्या पाठीवर, हातांवर आणि तोंडावर मार बसण्याचें नाहींसें झालें, तें युनाइटेड् स्टेट्समध्यें महत्प्रयासानें चालू करण्याचें यश स्त्रियांनींच घेतलें. इलिझबेथ पीबड्डीनें व तिच्या शिष्यांनीं किंडर गार्टन् पद्धति हजारों स्त्रियांना शिकविली, आणि मिसेस् पो, व मिसेस् टाम्सन् ह्यांसारख्या धनिक स्त्रियांनीं इ-

लिझ्बेथ् पीबडीसारख्या शिक्षक बायांस धनाचें साहाय्य देऊन, किंडर गार्टन् शिक्षणपद्धति प्रचारांत आणण्यास योग्य साधनें मिळवून दिलीं. बोस्टन्चें स्थानिक सरकार आपल्या सार्वजनिक विद्याखात्यांत किंडर गार्टन् शिक्षणाला जागा आणि खर्चही देईना; तेव्हां बोस्टन्ची महापरोपकारी धनिक बाई मिसेस् क्विन्सी षो, इणें आपल्या शहरांत किंडर गार्टन् शिक्षण प्रचारांत आणण्यास मदत देण्याचा निश्चय केला. तिणें बोस्टन्मध्यें पुष्कळ किंडर गार्टन् शाळा धर्मार्थ स्थापून, त्यांच्या उन्नतीकरतां दरवर्षी छत्तीस हजार डालर (ह्मणजे सुमारें एक लक्ष आठ हजार रुपये) खर्च करण्याचा क्रम आज बारा वर्षें सतत चालू ठेवला. आतां ह्या शिक्षणक्रमाची योग्यता केवढी आहे, ती सरकारास कळून, त्यानें किंडर गार्टन्पद्धति सार्वजनिक शाळांत चालू करण्याची परवानगी दिली आहे. न्यूयार्कची प्रसिद्ध परोपकारिणी मिसेस् इलिझ्बेथ् टाम्सन् ही दरवर्षी दीड दोन लक्ष रुपये बालशिक्षणाच्या व उद्योगशिक्षणाच्या कामीं खर्च करिते. तिचें उत्पन्न बहुतेक सगळें मुलांच्या शिक्षणाकडे खर्च होत असून, ती स्वतः अगदीं सन्न्यासिणीसारख्या साध्या रीतीनें कालक्षेप करिते. इलिझ्बेथ् पीबडी, मिसेस् षो, मिसेस् टाम्सन् इत्यादि शिक्षित बायांनीं आपलें तन, मन, धन, ह्या सत्कर्मी खर्च केलें ह्मणूनच युनाइटेड् स्टेट्सचें विद्याखातें इतकें उन्नतदशेस आलें आहे."

शिक्षित स्त्रियांपासून वर्त्तमानपत्राच्या व सामाजिक नीतीच्या संबंधानें स्त्रियांपासून कसकसे फायदे झाले हें या पुस्तकावरून आपले लक्षांत चांगलें येईल. आणि आमच्या इकडे जर तसा प्रसंग आला तर अलिकडच्या वेड्या वांकड्या जाहिरातींची वगैरे उचलबांगडी होईल तर फार चांगलें होईल.

"युनाइटेड् स्टेट्सच्या शिक्षित स्त्रिया शिक्षकिणीचें काम दोन प्रकारें करीत आहेत. त्यांतिल एक प्रकार विद्याशाळांतून शिकविणें, व दुसरा प्रकार वर्तमानपत्रांच्या द्वारें लोकसमाजाला नीतिशिक्षण देऊन, त्यांची बुद्धि सुधारणें, हा होय. सुमारें पंचवीस वर्षांपासून स्त्रियांनीं वर्तमानपत्रकाराचा धंदा पतकरला आहे. त्याच्या पूर्वी वर्तमानपत्रांत ज्याला जें वाटेल त्यानें तें लिहावें, अशी बहुतेक चाल होती. वर्तमानपत्रांतून अश्लील भाषा घालण्यास फारसा प्रतिबंध नव्हता. हें शिक्षित स्त्रियांस आवडलें नाहीं; कारण तीं पत्रें लहान मुलांच्या आणि मुलींच्याही वाचण्यांत

असत, यास्तव त्यांणीं हळूहळू वर्तमानपत्रांमधील एकेक भाग आपल्याकडे घेण्याचें आरंभिलें. ही चाल अद्यापि चालू असून तिजपासून पुष्कळ हित होत आहे. ज्या ज्या वर्तमानपत्रांतून स्त्रियांचे भाग असतात त्यांत स्त्रियाच्या विरुद्ध अन्याय्यगोष्टी, अथवा नीतिविरुद्ध लेख न यावे, ह्मणून फार काळजी घेतली जाते. याशिवाय त्या पत्रांना स्त्रियांची गोड भाषा व लेखनसरणी, यांच्यामुळें फार मनोरंजकत्व प्राप्त होतें. 'न्यूयार्क हेरल्ड' 'फिलाडेल्फियालेजर' 'बोस्टन् ट्रान्स्क्रिप्ट्' 'बोस्टन् हेरल्ड' आणि 'शिकागो इंटर ओशन्' अशा प्रकारच्या जंगी वर्तमानपत्रांना स्त्रीलेखकांचें पुष्कळ पाठबळ आहे. प्रत्येक प्रसिद्ध वर्तमानपत्रांत स्त्रीलेखकांचा भाग असतोच. आतां वर्तमानपत्रांतून अश्लील भाषा बहुतकरून येत नाहीं. आपल्या आणि मुलांच्या काय काय उणीवी आहेत, मुलांच्या आणि समाजाच्या हिताकरितां काय केलें पाहिजे; व कोणच्या चालींत फेरबदल झाला पाहिजे; पाठशाळांतून शिक्षणक्रम कोणत्या रीतीचा असावा व स्त्रीपुरुषांस सारखा न्याय मिळण्याकरितां कोणत्या प्रकारचे कायदे असावे; इत्यादि गोष्टींचें विवेचन स्त्रियांस वर्तमानपत्रांतून करितां येतें. सृष्टीच्या आरंभापासून जोरदार पुरुषांनीं आपल्या शारीरिक बळाच्या घमंडींत कर्तव्यज्ञानशून्य होऊन, स्त्रियांचीं तोंडें बंद करून ठेविलीं होतीं, तीं आतां उघडलीं आहेत; तीं लोकसमाजाच्या वाईटाकरितां नव्हे, तर हिताकरितां उघडलीं आहेत, अशी प्रतीतिही येत आहे. आतां स्त्रिया एकाद्या मोठ्या वर्तमानपत्राचा भागच घेऊन संतुष्ट न राहतां, त्या स्वतंत्र वर्तमानपत्रें काढूं लागल्या आहेत. बायकांनींच ज्यांचें सर्व काम चालविलें आहे, अशीं वर्तमानपत्रें शेंकडों आहेत. 'बोस्टन् वोमन्स् जर्नल्' 'शिकागो जस्टिशिया' आणि 'यूनियन् सिग्नल्' 'बिआट्रिस् वुईमेन्स् ट्रिब्यून्' 'वुइमेन्स् वर्क् फॉर वुइमेन्' 'चिल्ड्रन्स् वर्क् फॉर चिल्ड्रन्' 'सेन्टनिकल्स' 'वुइमेन्स् म्यागझीन्' अशीं पुष्कळ पत्रें आणि मासिकपुस्कें सामाजिक आणि राजकीयव्यवहार आणि सार्वजनिक-शिक्षण ह्यांच्या सुधारणेच्या कामांत फार उपयोगीं पडत आहेत. 'युनियन् सिग्नल्' नांवाच्या साप्ताहिक पत्राची वाढ फार चमत्कारिक रीतीनें झाली. सहा सात वर्षांपूर्वी पांच सहा बायकांनीं अडीच हजार डालरांचें भांडवल घेऊन, हें पत्र काढिलें. त्या वेळेस मद्यपाननिषेध हा विषय लो-

कांचा आवडता नव्हता, आणि आतांही नाहीं. हें पत्र स्त्रियांच्या मद्यनिषेधक मंडळीच्या चालकांनीं काढलेलें असून, हें चालेल कीं नाहीं याचा संशयच होता. तरी आतां तें पत्र लोकप्रिय झालें आहे, असें दिसतें. त्याचें भांडवल आतां पन्नास हजार डालरांइतकें असून, त्याचे वर्गणीदार चाळीस हजारांवर आहेत. हें वर्तमानपत्र चालविणाऱ्या बायकांच्या मंडळीनें मद्यनिषेधक मताच्या प्रसारार्थ आणखी चारपांच वर्तमानपत्रें काढलीं आहेत. सन १८८८ त या मंडळीनें पांच कोटि वीस लक्ष पृष्ठांइतका छापील मजकूर प्रसिद्ध करून, युनाइटेड् स्टेट्समध्यें मद्यनिषेधाच्या कामीं फार साहाय्य केलें. याच वर्षी छापील कामाबद्दल त्यांस त्र्याण्णव हजार डालर मिळाले. 'बोस्टन् वोमन्स् जर्नल्' हें पत्र सुद्धां चालण्याची पंचाईतच वाटत होती. कारण तें पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांस राजकीय हक्क मिळावे, या मताचें प्रतिपादक आहे. तीस वर्षांपूर्वी युनाइटेड् स्टेट्सचे लोक जसे स्त्रीशिक्षणाच्या विरुद्ध होते तसेच ते आज स्त्रियांस राजकीय हक्क मिळण्याच्या विरुद्ध आहेत. परंतु स्त्रियांनीं अविश्रांत उद्योग करून जसें शिक्षणाच्या संबंधानें लोकमत फिरविलें, तसेंच त्यांनीं ह्या गोष्टीच्या संबंधानेंही लोकमत फिरविण्याचा निश्चय केला आहे; आणि तो तडीस जाईल अशीं चिन्हें दिसत आहेत. कोठें कोठें वर्तमानपत्रकाराच्या धंद्यांत स्त्रिया पुरुषांहूनही अधिक योग्य आहेत, असें दिसून येतें. आतां निर्मळ मनाच्या स्त्रीपुरुषांना आणि मुलांना दुसरीं वर्तमानपत्रें नाहींत, ह्मणून निरुपायास्तव, गचाळ वर्तमानपत्रें वाचण्याची जरुरी राहिली नाहीं."

या वरील सर्व उताऱ्यांवरून वाचकाच्या लक्षांत येईलच कीं, स्त्रीशिक्षणापासून किती फायदे आहेत. हें एक रमाबाईंनीं पुस्तक लिहिलें यावरून तर स्त्रीशिक्षणाचे फायदे सिद्ध होतातच, परंतु अमेरिकेंतील स्त्रियांच्या कृत्यावरून जास्त खात्री होईल. या संबंधानें उदाहरणास्तव पुस्तकाचा चांगुलपणा व्यक्त होण्याकरितां आणखी एक दोन उतारे देऊन मी वाचकांचा निरोप घेतें. व अशा चांगल्या पुस्तकाची पुस्तक संग्रहाला पंडिता रमाबाईंनीं जोड करून दिली याबद्दल त्यांचे आभार मानतें. रमाबाईंना जसे अमेरिकेंत त्या लोकांच्या अंगीं गुणच दिसले व दोष फारच थोडे त्याचप्रमाणें मी हें पुस्तक वाचीत असतां, माझा हेतु गुण ग्रहण करण्याचाच असल्यामुळें मला गुण तेव्हढेच दिसले. याबद-

ल पक्षपातीपणाचा आरोप आला तर त्याला माझा नाइलाज आहे.

बायकांना हुद्याचीं कामें सुद्धां चांगलीं बजावतां येतील यांचें उदाहरण खालच्या उताऱ्यावरून लक्षांत येईल.

"क्यान्ससच्या स्त्रियांस जेव्हां कित्येक राजकारणी हक्क मिळाले, तेव्हां त्या संस्थानांतील एका गांवच्या कांहीं कुचेष्टेखोर पुरुषांनीं--(स्त्रियांस राजकारणी हक्क देणें बरोबर नाहीं? त्यांस राजकारणी महत्त्वांचीं कामें करतां येणार नाहींत, असें सोदाहरण सिद्ध करून दाखविण्याकरितां)-- आपल्या गांवांतील एका घराणदार लेंकुरवाळ्या बाईला आपल्या गांवची मेयर (Mayor, ह्मणजे एकाद्या शहरांत संस्थानाचे कायदे अमलांत आणून गांवचा राज्यकारभार चालविणारा मुख्याधिकारी) केली. ह्या बाईला मेयर करणाऱ्या मनुष्यांस ती बाई पदारूढ झाल्याच्या दुसऱ्याच दिवशीं असें कळून आलें कीं, स्त्रियांस राज्यकारभार चालवितां आणि कायदे अमलांत आणितां येणार नाहींत, असें आपलें अनुमान चुकीचें होतें. त्या बाईनें मेयरचा अधिकार घेतल्याबरोबर गांवांतलीं लहान मोठीं मद्यविक्रयाचीं ठिकाणें, जुगाराचीं ठाणीं व अशाच प्रकारचीं बेकायदेशीर कृत्यें करण्याचीं ठिकाणें शोधून, बंद करून टाकलीं. गांवांतील स्त्रियांनीं आणि सज्जन पुरुषांनीं तिला गुप्त ठिकाणें शोधून काढण्यांत पुष्कळ मदत केली. तिचा कारभार त्या गांवांतील लोकांस फारच पसंत पडत असून, ती फार व्यवस्थित आणि उत्तम रीतीनें आपला अधिकार चालवीत आहे."

" गतवर्षाच्या (१८८७ च्या) नवेंबर महिन्यांत टेनसी संस्थानांतील न्याषविल् नांवाच्या गांवीं, युनाइटेड् स्टेट्सच्या स्त्रियांच्या राष्ट्रीय मद्यनिषेधक मंडळीचा चवदावा वार्षिक महोत्सव झाला. त्या प्रसंगीं तेथें जाण्याकरितां मला ह्या मंडळीच्या अध्यक्षांनीं निमंत्रण केलें होतें. तो मोठा उत्सव आणि सर्व संस्थानांतील प्रमुख स्त्रियांचा समागम पाहाण्याकरतां मी मुद्दाम दोन हजार मैलां इतक्या लांबून न्याषविल् मुक्कामीं गेलें. त्या गांवांत एक आठवड्यापर्यंत स्त्रियांची एकच गर्दी झालेली होती. तेथें ह्या राष्ट्राच्या सर्व संस्थानांतील स्त्रियांच्या मद्यनिषेधक मंडळ्यांच्या प्रतिनिधी होऊन सुमारें तीनशें प्रमुख स्त्रिया आल्या होत्या. ह्याशिवाय तो समारंभ पाहण्याकरतां इतर पुष्कळ स्त्रीपुरुष तेथें आले होते.

टेनसी संस्थान हें ह्या राष्ट्राच्या दक्षिणभागांत मोडत असून, त्या भा-

गांत उत्तरभागांत आहे तितकें स्वातंत्र्य, विद्वत्त्व आणि उद्योगीपणा स्त्रीवर्गांत असलेला कोठें दृष्टीस पडत नाहीं. कांहीं वर्षांपूर्वी त्या भागांत स्त्रियांनीं सभेंत भाषण करणें हें कोणाला पसंत नव्हतें, आणि स्त्रियांच्या सभा हे शब्द कोणाच्या स्वप्नींही आलेले नव्हते. तिकडे अद्यापि असावा तसा स्त्रीजातीचा उत्कर्ष झालेला नसून, तीस वरिष्ठ प्रतीचें शिक्षण मिळण्याचीं साधनेंही नाहींत. न्याष्विल्ला जातांना मध्यें केंटकी संस्थानांतील लूइविल् नांवाच्या शहरीं राहून, तेथील लोकांच्या आग्रहावरून मला एका सभेंत भाषण करण्याचा प्रसंग आला; त्या प्रसंगीं मी ज्या देवळांत भाषण करणार होतें त्याच्या आचार्यांनीं मला वेदीवर बसण्याचा आग्रह केला. मी तेथें बसणार तर, मजबरोबर त्या गांवांतील कित्येक प्रमुख स्त्रियांनीं वेदीवर येऊन बसावें असा माझा मनोदय होता, परंतु त्या बाया ह्मणाल्या, "अहो आह्मी जन्मांत कधीं असें कृत्य केलें नाहीं, तें आतां आमच्यानें कसें करवेल?" मीं ह्मटलें, बायांनों, ह्यापूर्वी कधीं तुह्मी वेदीवर बसलां नाहीं, तर आतां, तसें करण्यास प्रारंभ करायला काय बाध आहे? तुह्मीं एकदां माझ्याबरोबर येऊन तेथें बसा तर खऱ्या; मग त्यापासून तुह्मांस कांहीं अपाय झाला, तर पुढें तसें करूं नका ह्मणजे झालें." तेव्हां होय नाहीं ह्मणतां, पांच सहा बाया वेदीवर बसण्यास कबूल झाल्या; आणि माझें भाषण संपेतोंपर्यंत त्या तेथेंच बसल्या होत्या; तरी त्यांस कांहीं अपाय झाला नाहीं हें सांगायला नको. त्या दक्षिणभागांत बायका जरी पडदपोशी नाहींत, तरी त्यांपैकीं ह्यांच्याच अंगीं असावें तसें स्वातंत्र्य आणि सभाधृष्टपणा असलेला [illegible] येतो.

वर सांगितल्याप्रमाणें न्याष्विल् मुक्कामीं [illegible]टेड् स्टेट्सच्या स्त्रियांच्या राष्ट्रीय मद्यनिषेधक मंडळीचा वार्षिक [illegible]पव होणार असें ऐकून, त्याविषयीं तेथील पुष्कळ मनुष्यांनीं पुष्कळ प्रकारचे तर्क केले. ही मंडळी काय आणि कशी आहे, हें कोणास चांगलेंसें माहीत नव्हतें. पुष्कळांस असें वाटलें कीं, हा कांहीं तरी लुडबुडीचा खेळ व अर्ध्या वेड्या, अर्ध्या शहाण्या अशा बायकांच्या युक्तिशून्य कल्पनेचें हें एक सोंग असेल. कित्येक देवळांचे आचार्य 'हें कांहीं तरी अधार्मिक कृत्य असून, ह्या बायका बायबलाची आज्ञा उल्लंघन करून स्त्रीजातीस न शोभणारीं अशीं कृत्यें करीत आहेत,' ह्मणून आपल्या देवळांत त्यांस सभा भरवि-

ल पक्षपातीपणाचा आरोप आला तर त्याला माझा नाइलाज आहे.

बायकांना हुद्याचीं कामें सुद्धां चांगलीं बजावतां येतील यांचें उदाहरण खालच्या उताऱ्यावरून लक्षांत येईल.

"क्यान्ससच्या स्त्रियांस जेव्हां कित्येक राजकारणी हक्क मिळाले, तेव्हां त्या संस्थानांतील एका गांवच्या कांहीं कुचेष्टेखोर पुरुषांनीं--(स्त्रियांस राजकारणी हक्क देणें बरोबर नाहीं? त्यांस राजकारणी महत्त्वांचीं कामें करतां येणार नाहींत, असें सोदाहरण सिद्ध करून दाखविण्याकरितां)-- आपल्या गांवांतील एका घराणदार लेंकुरवाळ्या बाईला आपल्या गांवची मेयर (Mayor, ह्मणजे एकाद्या शहरांत संस्थानाचे कायदे अमलांत आणून गांवचा राज्यकारभार चालविणारा मुख्याधिकारी) केली. ह्या बाईला मेयर करणाऱ्या मनुष्यांस ती बाई पदारूढ झाल्याच्या दुसऱ्याच दिवशीं असें कळून आलें कीं, स्त्रियांस राज्यकारभार चालवितां आणि कायदे अमलांत आणितां येणार नाहींत, असें आपलें अनुमान चुकीचें होतें. त्या बाईनें मेयरचा अधिकार घेतल्याबरोबर गांवांतलीं लहान मोठीं मद्यविक्रयाचीं ठिकाणें, जुगाराचीं ठाणीं व अशाच प्रकारचीं बेकायदेशीर कृत्यें करण्याचीं ठिकाणें शोधून, बंद करून टाकलीं. गांवांतील स्त्रियांनीं आणि सज्जन पुरुषांनीं तिला गुप्त ठिकाणें शोधून काढण्यांत पुष्कळ मदत केली. तिचा कारभार त्या गांवांतील लोकांस फारच पसंत पडत असून, ती फार व्यवस्थित आणि उत्तम रीतीनें आपला अधिकार चालवीत आहे."

" गतवर्षाच्या (१८८७ च्या) नवेंबर महिन्यांत टेनसी संस्थानांतील न्याषविल् नांवाच्या गांवीं, युनाइटेड् स्टेट्सच्या स्त्रियांच्या राष्ट्रीय मद्यनिषेधक मंडळीचा चवदावा वार्षिक महोत्सव झाला. त्या प्रसंगीं तेथें जाण्याकरितां मला ह्या मंडळीच्या अध्यक्षांनीं निमंत्रण केलें होतें. तो मोठा उत्सव आणि सर्व संस्थानांतील प्रमुख स्त्रियांचा समागम पाहाण्याकरतां मी मुद्दाम दोन हजार मैलां इतक्या लांबून न्याषविल् मुक्कामीं गेलें. त्या गांवांत एक आठवड्यापर्यंत स्त्रियांची एकच गर्दी झालेली होती. तेथें ह्या राष्ट्राच्या सर्व संस्थानांतील स्त्रियांच्या मद्यनिषेधक मंडळ्यांच्या प्रतिनिधी होऊन सुमारें तीनशें प्रमुख स्त्रिया आल्या होत्या. ह्याशिवाय तो समारंभ पाहण्याकरतां इतर पुष्कळ स्त्रीपुरुष तेथें आले होते.

टेनसी संस्थान हें ह्या राष्ट्राच्या दक्षिणभागांत मोडत असून, त्या भा-

गांत उत्तरभागांत आहे तितकें स्वातंत्र्य, विद्वत्त्व आणि उद्योगीपणा स्त्रीवर्गांत असलेला कोठें दृष्टीस पडत नाहीं. कांहीं वर्षांपूर्वी त्या भागांत स्त्रियांनीं सभेंत भाषण करणें हें कोणाला पसंत नव्हतें, आणि स्त्रियांच्या सभा हे शब्द कोणाच्या स्वप्नींही आलेले नव्हते. तिकडे अद्यापि असावा तसा स्त्रीजातीचा उत्कर्ष झालेला नसून, तीस वरिष्ठ प्रतीचें शिक्षण मिळण्याचीं साधनेंही नाहींत. न्याष्विल्ला जातांना मध्यें केंटकी संस्थानांतील लूइविल् नांवाच्या शहरीं राहून, तेथील लोकांच्या आग्रहावरून मला एका सभेंत भाषण करण्याचा प्रसंग आला; त्या प्रसंगीं मी ज्या देवळांत भाषण करणार होतें त्याच्या आचार्यांनीं मला वेदीवर बसण्याचा आग्रह केला. मी तेथें बसणार तर, मजबरोबर त्या गांवांतील कित्येक प्रमुख स्त्रियांनीं वेदीवर येऊन बसावें असा माझा मनोदय होता, परंतु त्या बाया ह्मणाल्या, "अहो आह्मी जन्मांत कधीं असें कृत्य केलें नाहीं, तें आतां आमच्यानें कसें करवेल?" मीं ह्मटलें, बायांनों, ह्यापूर्वी कधीं तुह्मी वेदीवर बसलां नाहीं, तर आतां, तसें करण्यास प्रारंभ करायला काय बाध आहे? तुह्मीं एकदां माझ्याबरोबर येऊन तेथें बसा तर खऱ्या; मग त्यापासून तुह्मांस कांहीं अपाय झाला, तर पुढें तसें करूं नका ह्मणजे झालें." तेव्हां होय नाहीं ह्मणतां, पांच सहा बाया वेदीवर बसण्यास कबूल झाल्या; आणि माझें भाषण संपेतोंपर्यंत त्या तेथेंच बसल्या होत्या; तरी त्यांस कांहीं अपाय झाला नाहीं हें सांगायला नकोच. त्या दक्षिणभागांत बायका जरी पडदपोशी नाहींत, तरी त्यांपैकीं थोड्यांच्याच अंगीं असावें तसें स्वातंत्र्य आणि सभाधृष्टपणा असलेला दिसून येतो.

वर सांगितल्याप्रमाणें न्याष्विल् मुक्कामीं युनायटेड् स्टेट्सच्या स्त्रियांच्या राष्ट्रीय मद्यनिषेधक मंडळीचा वार्षिक महोत्सव होणार असें ऐकून, त्याविषयीं तेथील पुष्कळ मनुष्यांनीं पुष्कळ प्रकारचे तर्क केले. ही मंडळी काय आणि कशी आहे, हें कोणास चांगलेसें माहीत नव्हतें. पुष्कळांस असें वाटलें कीं, हा कांहीं तरी लुटुपुटीचा खेळ व अर्ध्या वेड्या, अर्ध्या शहाण्या अशा बायकांच्या युक्तिशून्य कल्पनेचें हें एक सोंग असेल. कित्येक देवळांचे आचार्य 'हें कांहीं तरी अधार्मिक कृत्य असून, ह्या बायका बायबलाची आज्ञा उल्लंघन करून स्त्रीजातीस न शोभणारीं अशीं कृत्यें करीत आहेत,' ह्मणून आपल्या देवळांत त्यांस सभा भरवि-

ण्याची परवानगी देईनात. शेवटीं तेथील एका सार्वजनिक पुस्तकालयाच्या सभामंडपांत सदरील स्त्रियांची सभा भरविण्याचा निश्चय झाला. न्याष्विलच्या स्थानिक स्त्रियांच्या मद्यनिषेधक मंडळीनें भगीरथ प्रयत्न करून, तेथील बायकांस ह्या महोत्सवांत मदत करण्यास रिझवून आणलें. त्या उदार मनाच्या बायांनीं दुरून आलेल्या बायकांस आपल्या घरीं उतरण्यास बोलावून, उत्तम प्रकारें त्यांचा आदरसत्कार केला.

नवेंबर महिन्याच्या सोळाव्या तारखेस सकाळीं त्या अद्भुत महोत्सवास प्रारंभ झाला. सभामंडपांत सातशें खुर्च्या अर्धचंद्राकार ओळींनीं मांडल्या होत्या. अधिक खुर्च्या मांडायाला त्या सभागृहांत जागा नव्हती. मंडपाच्या सभोंवतीं भितीवर निरनिराळ्या संस्थानांच्या पताका, व प्रत्येक संस्थानांतील स्त्रियांच्या मद्यनिषेधक मंडळीचें पालवपद लिहून काशिदा काढून शिवलेलीं, नानारंगाचीं निशाणें लावून, आरास केली होती. जेथें अध्यक्ष आणि इतर प्रमुख स्त्रिया बसावयाच्या तेथें व त्या भोंवतालीं युनाटेड्स्टेट्सची नक्षत्रांक पताका, सुवासिक पुष्पें व नानाप्रकारच्या झाडांच्या पानांचीं तोरणें लावून, वेदी शृंगारण्यांत आली होती.

सकाळच्या नऊ वाजण्याच्या सुमारास सभा मंडप स्त्रियांच्या मंडळीनें भरून गेला. तेथें प्रेक्षक समुदायांत पुष्कळ पुरुषही आले होते. मग अध्यक्ष फ्रान्सेस् इ० विलर्ड यांणीं सर्वांस एकाग्र होण्याविषयीं इशारत देऊन, सभाकार्यास प्रारंभ केला. त्या प्रसंगीं कांहीं प्रमुख स्त्रियांनीं ज्या उत्तम चित्तवेधक प्रार्थना केल्या, जीं मधुर संगीतें गाइलीं, जे हृदयद्रावक उपदेश केले, आणि फ्रान्सेस् बाईंनीं जें अप्रतिम, सारयुक्त, चित्तवेधक, महार्थसंपन्न आणि सर्वांगसुंदर असें भाषण केलें, त्या सर्वांचें योग्य वर्णन करण्यास एक महाकवि तेथें हजर असण्याची आवश्यकता होती.

ही पहिल्या दिवसाची पहिली सभा विसर्जन होण्यापूर्वी त्या गांवांतील पुष्कळ आचार्यांचीं मतें फिरून, त्यांनीं " आमच्या मंदिरांत येऊन सभा भरवा, भाषणें करा, आमच्यावर एवढी मेहेरबानगी कराच, " ह्मणून आग्रह करून ह्या अपूर्व स्त्रियांच्या मंडळीस आमंत्रणें धाडलीं. प्रेक्षकमंडळींत असलेल्या पुरुषांनीं ह्या मंडळींची थट्टामस्करी करण्याचें सोडून, तिच्याविषयीं आपली पूज्यबुद्धि प्रदर्शित करण्यास सुरवात केली. पुढें तो आठवडा संपेतोंपर्यंत त्या मंडळींतील प्रमुख स्त्रियांनीं दररोज सहा सात

ठिकाणीं जाऊन सकाळीं, संध्याकाळीं व दुपारून भाषणें करावीं, उपदेश करावे, तरी तेथील लोकांची तृप्ति होईना. त्या आठवड्यांत ह्या समाजांत जे ठराव करण्यांत आले; मागच्या वर्षांत घडून आलेल्या कृत्यांचे जे वृत्तांत वाचण्यांत आले व जी सर्वोत्कृष्ट सभाकार्याची पद्धत लोकांच्या पहाण्यांत आली, तिचें सर्वांगसौंदर्य व सर्वोत्तम व्यवस्था पाहून, इंग्रजी पार्लमेंट् आणि युनाइटेड् स्टेट्स्ची कांग्रेस् ह्यांस सुद्धां ह्या मद्यनिषेधक मंडळीचा हेवा वाटल्यावांचून राहिला नसता. त्या प्रसंगीं फ्रान्सेस् इ० विलर्ड् ह्या बाईंचें सभापांडित्य, नेतृत्वशक्ति, सभाचालकपणा, उत्कृष्ट व्यवस्था ठेवण्याचें शहाणपण व पार्लमेंटच्या प्राचीन नियमांचें असाधारण ज्ञान, हीं ज्यांच्या पाहण्यांत आलीं, त्यांस ही बाई सरस्वती, राजनीति आणि शासनशक्ति ह्या तीन देवींची एक मूर्ति आहे, असें वाटल्यावांचून राहिलें नसेल!

स्त्रियांस व्यवस्थापूर्वक कोणतेंही काम करतां येत नाहीं, असें पुष्कळ अहंकारी पुरुषांस वाटत असेल; परंतु न्याषविल् मुक्कामीं ह्या स्त्रीमंडळीचा समाज व त्याचीं व्यवस्थेशीर कार्यें ज्यांनीं पाहिलीं असतील, त्यांना कांग्रेस् किंवा पार्लमेंटांतील गडबड व पुष्कळ वेळां घडून येणारी अव्यवस्था ध्यानांत आणून ह्या दोन जगप्रसिद्ध राजकारणी सभांनीं सदरील मंडळीचा कित्ता वळविल्यास वाईट नाहीं, असेंही वाटल्यावांचून राहिलें नसेल.

नवेंबरच्या चोविसाव्या तारखेस सायंकाळीं ह्या महोत्सवाची समाप्ति झाली. त्या प्रसंगीं तेथें आलेल्या स्त्रीसमाजास निरोप देतांना न्याष्विलच्या प्रमुख पुरुषांनीं व आचार्यांनीं स्त्रियांविषयीं आपलीं मतें कशीं पालटलीं, आणि ह्या मंडळीचें सभाकार्य व उत्तम व्यवस्था, तिचे सदुद्देश आणि सर्वोपकारी नीति पाहून आपल्यास केवढें सानंदाश्चर्य वाटलें, हें सांगून फार स्तुति करून, मोठ्या सन्मानानें ह्या युनाइटेड् स्टेट्स्च्या स्त्रियांच्या राष्ट्रीय मद्यनिषेधक मंडळीस निरोप दिला; व पुढच्या वर्षी पुनः ह्या मंडळीनें तेथें यावें ह्मणून आग्रह केला.

एकंदरींत हा उत्सव सर्वांस मोठा आनंदाचा झाला. असा अद्भुत, मनोरम आणि भव्य देखावा मीं जन्मांत कधीं पाहिला नव्हता, तो पाहून, माझ्या जन्माचें सार्थक्य झालें, असें मला वाटलें. गेल्या मार्च महिन्याच्या शेवटीं वाशिंग्टन् शहरीं जमलेल्या सार्वराष्ट्रीय स्त्रियांच्या समाजावांचू

दुसऱ्या कोणत्याही मंडळीच्यानें किंवा उत्सवाच्यानें ह्या महोत्सवाची व महत्समाजाची बरोबरी करवणार नाहीं."

उद्योग, सद्सद्विचारबुद्धि, दुर्गुणाचा अव्हेर, सद्गुणाची आवड, व्यसनाचा तिटकारा, उदारबुद्धीचा झरा, प्रेमळपणाची खाण, अंग मोडून काम करण्याचें जणूं यंत्र, अंगच्या गुणानें व सरळपणानें काम तडीस नेण्याचें केवळ मूर्तिमंत उदाहरण, अशी जी स्त्री-जाति तिचा जगानें असा कां बरें अव्हेर करावा? आपल्या पडत्या काळीं मिळेल तिकडून मदत मिळवून आपला इच्छित अर्थ साधावा आणि इतर राष्ट्रांच्या उच्चत्वाच्या मानानें आपलें डोकें अगदींच खालीं रसातळाला पोंचलें आहे, याकडे लक्ष देऊन आपणही त्यांची होईल तितकीच कां होईना बरोबरी करण्याचा व त्यांच्या इतकाच आपलाही प्रत्येक गोष्टींत सारखा मानमान्यतेचा, शहाणपणाचा वगैरे हक्क शाबीत करण्याचें टाकून कां बरें आमचे लोक उगाच कांहीं तरी भांडण व मतविरोध करीत बसले आहेत? असे विचार वरील उतारे वाचून माझे मनांत आले. स्त्रियांच्या संबंधानेंच तेवढे माझे मनांत विचार येण्यास कारण उघडच आहे, ज्याला त्याला स्वजातीचा अभिमान असतोच. आणि पुरुषांना, आपली उन्नति व्हावी असें वाटत असून ते आपल्या आपल्यांत हालचाल करीत आहेत, फक्त बायकांना मात्र त्यांच्या उद्योगाचे दरवाजे बंद आहेत. आणि पुरुष चांगले जागे आहेत त्यांना जागें काय करावयाचें! ते जागे असून झोंपेचें सोंग घेऊं लागले तर त्याला लोकांनीं काय करावें? आज असा प्रसंग आह्मावर येऊन ठेपला आहे कीं, कोणीकडून कां होईना आपलें अस्तित्व आहे असें सिद्ध झालें पाहिजे. हें जर खरें आहे तर लोक असे जिकडे तिकडे उदास कां? युनाइस्टेड्स्टेट्सची लोकव्यवस्था नुस्ती वाचूनच जर आपल्याला इतका चमत्कार वाटतो आहे तर खरोखर ती किती चमत्कारिक असेल! ज्यांनीं केवळ शंभर वर्षांत आपला देश केवळ इंद्रभुवन बनविलें त्यांचें वृत्त वाचून आणि कर्तव्यशक्ति ऐकून आह्मा वृद्ध राष्ट्रवाशांना त्यानें खालीं मान घालावयाला लावावें हें केवढें आश्चर्य! आमचा काळ वेळ सर्व आपसांत विचार व वादविवाद करण्यांतच खर्च होत आहे. परंतु प्रसंगच गुदरला त्याला काय उपाय!


REFBK-0019186